
ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

एप्रिल ते जून २०२४
जुलै ते सप्टेंबर २०२४ (जोडअंक)



प्रसिद्ध कवी गुलज़ार यांना
२०२४ सालातील ५८ वा ज्ञानपीठ पुरस्कार
मिळाल्याबद्दल अभिनंदन!

येणें वाग्यज्ञें तोषावें

महाराष्ट्र
साहित्य
परिषद

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

**अंक क्र. ३८५**

**एप्रिल ते जून २०२४**

**जुलै ते सप्टेंबर २०२४ (जोडअंक)**

संपादक । **सुरेश देशपांडे**

प्रकाशक । **सुनिताराजे पवार** प्रमुख कार्यवाह

**महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे**

४९६ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ४११०३०.

दूरभाष । ०२०–२४४७५९६३

संकेतस्थळ । www.sahityaparishad.org

ई–मेल । masaparishad@gmail.com

कार्यालयाची वेळ ।
सकाळी ९.०० दुपारी १२.३०
दुपारी ५.०० ते रात्री ८.००

येणें वाग्यज्ञें तोषावें
महाराष्ट्र
साहित्य
परिषद

# मसाप पत्रिका

**एप्रिल ते जून २०२४**
**जुलै ते सप्टेंबर २०२४ (जोडअंक)**
**अंक ३८५**

संपादक । **सुरेश देशपांडे**

मुद्रक–प्रकाशक
**सुनिताराजे पवार**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

अक्षरजुळणी व सजावट
**लक कलाकल्य**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुखपृष्ठ छायाचित्र सौजन्य
**विवेक रानडे**

मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**

मूल्य : **४० रुपये**

---

या अंकात व्यक्त झालेल्या
विचारांशी संपादक, संपादन समिती,
सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक
सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग

**मसाप पत्रिका । एप्रिल ते जून २०२४ जुलै ते सप्टेंबर २०२४ (जोडअंक)**


संपादकीय । **सुरेश देशपांडे । ६**

या वाटेवरून जाताना... गुलज़ार यांची मुलाखत । **डॉ. दामोदर खडसे । ७**

'संत बसवेश्वरांच्या मानवमुक्ती चळवळीचे
इहवादी आकलन' । **प्रा. डॉ. कैलास देवराम सलादे । १९**

सुनीताबाई तोलामोलाचं जगणं । **वंदना बोकील-कुलकर्णी । २९**

खाणमाती : आधुनिकतेच्या अतिरेकाचे दशावतार... । **प्रा. डॉ. सुधाकर शेलार । ३२**

पुंडलिक नायक यांच्या 'अच्छेव' कादंबरीतील निसर्ग आणि संस्कृती । **डॉ. चिन्मय मधू घैसास । ३६**

कुरूप : मराठी साहित्याला नव्या प्रवाहाची ओळख
करून देणारा कवितासंग्रह । **कु. ऐश्वर्या बाळकृष्ण शेवाळे । ४३**

कासरा : कृषिसंस्कृतीचं भेदक चित्रण । **डॉ. सुरेश सावंत । ४९**

एकांकिका : वाटचाल आणि वैशिष्ट्ये । **डॉ. विजयकुमार अंबादास जोशी । ५२**

जाणीवनिष्ठ अंतरंगाचा प्रवास : 'या तहानेला तळ नाही' । **डॉ. प्रिया निघोजकर । ५५**

देवदान पावलं । **डॉ. शैला जगदंबे । ५९**

कार्यवृत्त । **६७**


येथें वाग्यज्ञे तोषावे
महाराष्ट्र
साहित्य
परिषद

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
## कार्यकारी मंडळ (२०२१–२०२६)

### विश्वस्त मंडळ

**प्रा. डॉ. शिवाजीराव कदम** **डॉ. पी. डी. पाटील** **यशवंतराव गडाख**

### पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

अध्यक्ष । **डॉ. रावसाहेब कसबे**

उपाध्यक्ष । **विद्याधर अनास्कर** उपाध्यक्ष । **डॉ. तानाजीराव चोरगे** उपाध्यक्ष । **राजीव बर्वे**

कार्याध्यक्ष । **प्रा. मिलिंद जोशी** प्रमुख कार्यवाह । **सुनिताराजे पवार**

कोषाध्यक्ष । **विनोद कुलकर्णी** पत्रिका संपादक । **सुरेश देशपांडे**

### स्थानिक कार्यवाह

व्याख्याने व स्मृतिदिन । **शिरीष चिटणीस**

विशेष पारितोषिके । **मृणालिनी कानिटकर–जोशी**

वार्षिक ग्रंथ पारितोषिके । **अंजली कुलकर्णी**

परीक्षा विभाग । **माधव राजगुरू**

ग्रंथालय विभाग । **वि. दा. पिंगळे**

अतिथीनिवास–वास्तू देखभाल । **ॲड. प्रमोद आडकर**

### सदस्य

**डॉ. आशुतोष जावडेकर** (पुणे शहर)
**डॉ. सतीश देसाई** (पुणे शहर)
**ज्योत्स्ना चांदगुडे** (पुणे शहर)
**रावसाहेब पवार** (पुणे जिल्हा)
**राजन लाखे** (पुणे जिल्हा)
**डॉ. पुरुषोत्तम काळे** (पुणे जिल्हा)
**रवींद्र बेडकिहाळ** (सातारा जिल्हा)
**सोपानराव चव्हाण** (सातारा जिल्हा)
**पद्माकर कुलकर्णी** (सोलापूर जिल्हा)
**ॲड.जे.जे.कुलकर्णी** (सोलापूर जि.)
**कल्याण शिंदे** (सोलापूर जिल्हा
)**राजन मुठाणे** (कोल्हापूर जिल्हा)
**प्रकाश देशपांडे** (कोकण)
**राजीव जोशी** (ठाणे जिल्हा)
**पद्माकर शिरवाडकर** (ठाणे जिल्हा)
**सुरेश देशपांडे** (ठाणे जिल्हा)
**प्रकाश होळकर** (नाशिक जिल्हा)
**ॲड. नितीन ठाकरे** (नाशिक जिल्हा)
**चंद्रकांत पालवे** (अहमदनगर जिल्हा)
**जयंत येलूलकर** (अहमदनगर जिल्हा)
**प्राचार्य तानसेन जगताप**(जळगाव जिल्हा)
**डॉ. शशिकला पवार** (धुळे जिल्हा)
**प्रा. दशरथ पाटील** (सांगली जिल्हा)

# संपादकीय

एप्रिल ते जून आणि जुलै ते सप्टेंबर २०२४ जोड अंक वाचकांच्या हातात देताना मनात आनंदाची भावना आहे याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या जोड अंकात डॉ. दामोदर खडसे यांनी, रसिकांचे आवडते कवी गुलज़ार यांची घेतलेली प्रदीर्घ मुलाखत आहे. या मुलाखतीतून गुलज़ार यांचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व उलगडत तर जातेच; पण एक सजग साहित्यिक म्हणून त्यांचे विचार वाचणे हा मनस्वी आनंद आहे.

या संपूर्ण मुलाखतीतून जीवनविषयक आणि साहित्यविषयक असा एक सकारात्मक स्वर सतत जाणवत राहतो. जीवनाच्या सर्वच अंगांवर भाष्य करणारा विचारवंत आणि मनस्वी कवी त्यांच्या वाक्यावाक्यातून डोकावत राहतो. 'संस्कारांचे कधीच भाषांतर होत नाही, ज्या भाषेशी आपली नाळ जोडली गेली आहे ती भाषा विसरता कामा नये, भाषा आणि संस्कृती यांच्यात अतूट संबंध आहे, असे असले तरी भाषेचा दुराग्रह नको,' असे बोलत ते खंत व्यक्त करतात की, म्हणजे आज आपल्या भाषेतील अनेक शब्द लोप पावत आहेत.. नजरेआड होत आहेत. 'पुरस्कार म्हणजे सर्जनशील प्रवासातील मैलाचे दगड आहेत.' असे ते मानतात. त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वासारखीच त्यांची मुलाखतही प्रसन्न करणारी आहे.

मराठी साहित्यावर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवणाऱ्या आणि दुर्गाबाई भागवत यांच्यासारखा धाक वाटावा अशा सुनीताबाई देशपांडे यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत आहे, त्यानिमित्ताने त्यांच्यावरील 'मनोहर' लेख वंदना बोकील कुलकर्णी यांनी लिहिला आहे. तोही सुजाण वाचकांना आवडेल.

साहित्याच्या नवीन विचारांचा आणि प्रवाहांचा मागोवा घेणे हे तर म. सा. पत्रिकेचे वैशिष्ट्य... त्यालाच अनुसरून काही महत्त्वपूर्ण पुस्तकांच्या परिचयासह एका अनोख्या कवितासंग्रहाची ओळख या अंकात आहे.

पारलिंगी समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आणि युवा कार्यकर्त्या कवयित्री दिशा पिंकी शेख यांच्या 'कुरूप' या कविता संग्रहावरील परिचयात्मक लेख म्हणजे कवितेतील नवीन प्रवाहाची ओळखच म्हणावी लागेल. पारलिंगी समाजातील व्यक्तींना समाज कशा प्रकारे असहिष्णुतेची वागणूक देतो याचे शल्य या कविता संग्रहातून उजागर होते.

तसेच १२ व्या शतकातील संत बसवेश्वर यांच्या मानवतावादी विचारांचा परिचय आणि आता अस्तंगत होत चाललेल्या 'वासुदेव' या परंपरेविषयीचा लेख, 'एकांकिका' या रंगमंचीय आविष्काराविषयीचा लेख शिवाय काही महत्त्वपूर्ण पुस्तकांचा वेधक परिचय असा भरगच्च मजकूर असलेला हा अंक वाचकांच्या पसंतीस उतरेल अशी खात्री आहे.

**सुरेश देशपांडे**



# या वाटेवरून जाताना...
## गुलज़ार यांची मुलाखत

**डॉ. दामोदर खडसे**

गीत संगीत, सिनेमा आणि साहित्य-शायरी अशा विविध क्षेत्रांत गुलज़ार यांच्या योगदानाच्या तेजाचा एक विशिष्ट प्रकारचा प्रभाव दिसून येतो. त्यांची गीतं कानांना फक्त मधुरच नव्हे तर सरळ हृदयाचाच ठाव घेतात. साहजिकच व्यक्ती त्यांच्या गीतांमध्ये आपले प्रतिबिंब पाहते. कळत-नकळत, गुणगुणत ती आपल्या जीवनातील सुख-दु:खाची अभिव्यक्ती स्वत:शीच करत राहते. गुलज़ार हे गीतकार, निर्माता, लेखक या रूपात सर्वसमावेशक असे अत्यंत प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व आहे. वर्ष २००२ मध्ये उर्दू साहित्यातील उत्कृष्ट अशा साहित्यकृतीसाठी त्यांच्या 'धुआँ' नावाच्या कथासंग्रहाला केंद्रीय साहित्य अकादमीकडून सन्मानित करण्यात आले. तसेच २००४ मध्ये त्यांना माजी राष्ट्रपती मा. श्री. अब्दुल कलाम यांच्या हस्ते 'पद्मभूषण' हा मानाचा पुरस्कार दिला गेला. त्यांनी हिंदी, मराठी आणि इंग्रजी साहित्यात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. यामध्ये- 'चौरस रात', 'जानम', 'एक बूँद चाँद', 'कुछ और नज़्में', 'दस्तख़त', 'पुखराज साइलेंस', 'धुआँ', 'रावी पार', 'ऑटम मून', 'कायदा', 'त्रिवेणी', 'एक मेंदी', 'रात पशमीने की', 'हबू की आग व अन्य कहानियाँ', 'खौफ और अन्य कहानियाँ', 'रात, चाँद और में', 'राधा एण्ड अदर स्टोरीज', व 'सीमा एण्ड अदर स्टोरीज' यांचा समावेश आहे. मराठीमध्ये श्री. अनंत दीक्षित यांनी त्यांच्या मुलाखतीवर 'धागे' हे पुस्तक व त्यांच्या मुलीने- मेघना गुलज़ार यांनी त्यांचे चरित्र 'बिकॉज ही इज' या पुस्तकातून रसिकांच्या पुढे मांडलेले आहे. मानवी संवेदनांची कोमल स्पंदने गुलज़ार यांनी आपल्या लेखणीतून मांडलेली आहेत. छोट्या-छोट्या गोष्टींना सरळ आणि सोप्या शब्दांची गुंफण करून त्यांनी वाचकांच्या हवाली केले आहे व ती प्रत्येकाला आपली वाटते, आणि म्हणूनच गुलज़ार यांच्या कविता किंवा गीते सुख-दु:खाची साक्षीदार होतात. एका नात्याला शब्दांकित करताना ते लिहितात- 'सुई व दोऱ्याचे एक वेगळेच नातं आहे/ सुई टोचते आणि जोडतेदेखील... मी तर फक्त तुमचा पाठलाग करत राहिलो. जेथे तुम्ही थांबलात तेथे तुम्हाला फक्त जोडत गेलो!' शक्यतो, गुलज़ार ही अशी पहिलीच व्यक्ती असावी की त्यांनी सिनेमा, दूरदर्शन इ. माध्यमांमध्ये आपली एक वेगळीच छाप

पाडलेली आहे आणि साहित्याच्या दुनियेमध्ये आपले विशिष्ट स्थान निर्माण केलेले आहे. साहित्यातील अनेक प्रसिद्ध व नामांकित लेखक सिनेमाच्या मायानगरीचे आपले आकर्षण थोपवू शकले नाहीत; परंतु ते एकतर निराशा घेऊन किंवा आपल्यातील लेखकाला हरवून परतले. गुलज़ार यांनी आपले व्यक्तिमत्त्व, विचारशैली आणि विशेष गोष्टींची छाप सिनेमांमधून दाखवून दिली आणि विशिष्ट रस असणाऱ्या दर्शकांचा व्यापक असा एक वर्ग निर्माण केला, तसेच सुसंस्कृत लोकांची साहित्याची तहान आपल्या सिनेमांच्या माध्यमातून पूर्ण केली. अत्यंत सुरुवातीला त्यांनी विमल रॉय यांचे मदतनीस म्हणून सिनेमाक्षेत्रात प्रवेश केला. हृषिकेश मुखर्जी यांचे बरोबरही काम केले. गुलज़ार यांनी बिमल हा यांच्या 'बंदिनी' सिनेमातून 'मेरा गोरा अंग लेले' या गाण्याने सुरुवात केली आणि ते खूप प्रसिद्ध झाले. त्यांचा 'काबुलीवाला' हा पहिला सिनेमा प्रदर्शित झाला. त्यानंतर 'सन्नाटा', 'बीवी और मकान', 'दो दूनी चार', 'मेरे अपने', 'माचिस', 'परिचय', 'कोशिश', 'अचानक', 'खुशबू', 'आँधी', 'मौसम', 'किनारा', 'किताब', 'अंगूर', 'नमकीन', 'मीरा', 'इजाजत', अशा सिनेमांनी दर्शकांना नवे विषय व विशिष्ट आवडीचा स्वाद दिला. त्यांच्या गीतांनी मनातील संवेदनांना छान असे शब्द दिले. 'आँधी'ने भारतीय दर्शकांना राजनीतीच्या चोहोबाजूंच्या भिंतींमधील स्फुंदणाऱ्या मानवी भावनांची व आंतरिक संवेदनांची स्तब्धता दिली. 'कोशिश'मध्ये नवीन प्रयोग होते. प्रत्येक सिनेमा नव्या प्रयोगासाठी ओळखला जातो. हे प्रयोग किंवा बदल फक्त बदल नव्हते, तर दर्शकांच्या पसंतीस ते उतरले होते. हिंदी सिनेमांचे व्यावसायिक सूत्र नसूनसुद्धा गुलज़ारांच्या सिनेमांचीच चर्चा लोकांच्या तोंडात असायची आणि त्यांची गीतं व्यक्तीच्या सुख-दु:खातील सहप्रवासी!

त्यांना उत्कृष्ट सिनेमांसाठी सात वेळा 'राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार' (राष्ट्रीय फिल्म पुरस्कार) आणि सोळा वेळा 'चित्रपट सृष्टीतील सर्वांत जुना व मानाचा पुरस्कार' (फिल्म फेअर अवॉर्ड) मिळालेला आहे. तसेच त्यांना 'जीवनगौरव' (लाईफ टाईम अवॉर्ड) पुरस्काराने देखील सन्मानित करण्यात आलेले आहे.

श्री. गुलज़ार यांना २००१ मध्ये 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स स्टडीज' यांच्यातर्फे 'आजीवन, छात्रवृत्ती, संशोधन सुविधा आणि इतर विशेषाधिकार' (लाईफ टाईम ऑनररी फेलोशिप) सुद्धा देण्यात आलेले आहेत.

त्यांना २०१४ मध्ये सिनेमाक्षेत्रातील महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय योगदानासाठी 'फाळके पुरस्कार' हा सर्वश्रेष्ठ पुरस्कार देण्यात आलेला आहे. तसेच २०२४ मध्ये 'भारतीय ज्ञानपीठ पुरस्काराने' सन्मानित करण्यात आलेले आहे.

गुलज़ार यांनी दूरदर्शनवरदेखील महत्त्वपूर्ण निर्मिती सादर केलेली आहे. यामध्ये 'मिर्जा ग़ालिब' सर्वांत महत्त्वपूर्ण राहिली. तसेच मुन्शी प्रेमचंद यांची 'तहरीर' ही मालिका, व सध्या ते रविंद्रनाथ टागोर यांच्यावर मालिका तयार करण्यात व्यग्र आहेत. गुलज़ार यांनी मुलांसाठीही वेळोवेळी लिखाण केलेले आहे. त्यांच्या रचना ब्रेललिपीमध्येसुद्धा उपलब्ध आहेत.

गुलज़ार यांनी भारताचे महामहिम राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची आत्मकथा - 'विंग्ज ऑफ फायर' या ऑडियोचे हिंदी आणि उर्दूमध्ये भाषांतर केले आहे आणि त्याचे सादरीकरण श्री. गुलज़ार यांच्या आवाजातच आहे.

खूप सारी 'छायाचित्र पुस्तके' (अल्बम) गुलज़ार यांच्या नावावर आहेत आणि श्रोत्यांच्या घरात एक प्रकारे सांस्कृतिक वारसा म्हणून जतन केला जात आहे. यामध्ये 'दिल पड़ौसी है', 'बुढ़े पहाड़ों पर', 'मरासिम', 'वादा', 'सनसेट प्वाईंट', 'विशाल', 'उदास पानी', 'इश्क इश्क', 'आबिदा सिंग्स कबीर' या मुख्य आहेत.

'उदास पानी' या त्यांच्याच काव्यसंग्रहातील व त्यांच्याच आवाजातील चढ-उतारांचा खेळ असा काही रंगला आहे की, ऐकणाऱ्यांच्या हृदयाचा ठावच



त्यांनी घेतलेला आहे. गुलज़ार यांचा आवाज कवितापेक्षा कमी नाही.

ते 'बोस्कीयाना', पाली-हिल नर्गिस दत्त रोड, बांद्रा (पूर्व) मुंबई येथे राहतात. श्रीमती सरोजिनी जैन यांच्या माध्यमातून दुपारी दोन वाजता त्यांच्या भेटीची वेळ निश्चित झालेली होती. त्यांचे स्वीय सचिव श्री. कुट्टी हे अत्यंत विनम्र आणि मदतीसाठी सदैव तयार असतात. आम्ही ठीक दोन वाजता पोहोचलो. माझ्या बरोबर कुणाल व निकिता होते. त्यांची मुलगी मेघना अर्थात 'बोस्की' या नावावरून त्यांनी त्यांच्या घराचे नाव 'बोस्कीयाना' ठेवलेले आहे. प्रेम, स्नेह, आत्मीयता आणि आपलेपण प्रवेशद्वार पार करताच जाणवू लागला. दोन मोठी-मोठी श्वानं परंतु शालीन, वेगळ्या प्रजातीची की, जी सहसा दिसत नाहीत. त्यांचे स्वीय सचिव श्री. कुट्टी यांच्याशी ओळख झाली आणि ते आम्हाला घरात घेऊन गेले.

स्वप्नवत, आकर्षक व सुंदर असा पडदा बाजूला झाला आणि पांढऱ्या शुभ्र कुर्त्यामधील श्री. गुलज़ार यांचे दर्शन व 'दामोदर जी, या.. फक्त दहा मिनिटे-चालेल ना' असे म्हणून मराठीचे श्रेष्ठ कवि कुसुमाग्रज यांच्या कवितेवर शेवटचा हात फिरवण्यात मग्न झाले. त्यांच्याबरोबर होती मराठी सिनेमातील अभिनेत्री अमृता सुभाष! दिवाणखान्यात बसलेलो आम्ही गुलज़ार यांनी हाक मारण्याची आतुरतेने वाट पाहत राहिलो, आणि त्याच वेळी श्रीमती सरोजिनी जैन यांनी हसतमुखाने प्रवेश केला. थोड्याच वेळात जादूभरा आवाज, मनमोकळे बोलणे, अनेक विषय आणि प्रेमळ व्यक्तिमत्त्व यांसह बोलण्याचा दीर्घकाळ प्रवास सुरू राहिला. गुलज़ार यांच्याबरोबर मारलेल्या गप्पांचे महत्त्वपूर्ण अंश -

**प्रश्न -** असं काय झालं की, तुमच्यातील शायर जागा झाला?

**गुलज़ार -** सांगू शकत नाही आणि त्याचे विश्लेषणही मी करू शकत नाही. जीवनाचे संपूर्ण दर्शन दाखवणारी ही गोष्ट आहे, जी आपल्याला घडवते. जीवन दररोज तुम्हाला टोकत असते, कुठूनही तुम्हाला स्पर्श करीत असते. प्रत्येक व्यक्तीत संवेदनशीलता असते. फक्त प्रश्न असा असतो की, तुम्ही कशा प्रकारे वाहवत

जाता. तुम्ही कोठे घुटमळत राहता? त्याप्रमाणे ऊन, वारा व पाऊस तुमची रचना करत असतात.

**प्रश्न –** तरीसुद्धा...

**गुलज़ार –** मनुष्य बनल्यावर तो मागे वळून पाहू शकतो की, कोणत्या परिस्थितीत मी येथपर्यंत पोहोचलो? मी सामान्य, परंपरावादी कुटुंबात जन्माला आलो, जेथे शिष्टाचाराचा काही संबंध नव्हता. मी एका व्यावसायिक कुटुंबातील असून आम्ही सगळे व्यापार करतो. माझा भाऊ आजही व्यापारातच आहे. कुटुंबात माझ्यावर 'दिवटा' किंवा 'दुर्वर्तनी' असा शिक्का मारलेला होता. वडिलांचे तर म्हणणे होते की, मी मुसलमानातील एखाद्या गाणे म्हणणाऱ्या, वाजवणाऱ्या जातीचा आहे की काय? असे शब्द कानावर पडायचे कारण मला कविता करण्याचा छंद होता, लिहिण्या-वाचण्याचा नाद होता. कदाचित माझ्यातील नारेसपणा नष्ट करण्यासाठीच मला वेगळ्या मार्गावरून जाण्यास प्रवृत्त केले असावे, की जसा लोखंडला होणारा परिसस्पर्श! कवी-संमेलन, कवी-दरबार ऐकत होतो. त्या वेळी रेडिओ एकमेव माध्यम होते. शास्त्रीय संगीतासाठी मला खूप विरोध केला गेला. या साऱ्या गोष्टी माझ्या मनाला स्पर्शून गेल्या. या गोष्टी माझ्याच वाट्याला का आल्या, दुसऱ्यांच्या का नाही? हे असं कसं? याचा खुलासा करणे कठीण आहे. जीवनाचे पृथक्करण करणे एवढे सोपे असते तर खूप सोप्या झाल्या असत्या, जीवन सहजसुलभ झाले असते आणि संपूर्ण जीवनाचे संगणकीकरण करता आले असते. जीवनाचे खरे सौंदर्य यातच आहे की, ते खात्रीशीर नाही, अनिश्चित आहे. त्याबाबत काहीही सांगता येत नाही. कदाचित याचा मी अंदाज लावू शकलो नाही. जेव्हा मी मागे वळून पाहतो तेव्हा विचार करतो की, मी कसे जीवन जगत आलो, कोणत्या कुटुंबातून आलो आणि येथपर्यंतचा प्रवास कसा झाला?

**प्रश्न –** याचे श्रेय कोणाला देऊ इच्छिता?

**गुलज़ार –** खूप कठीण आहे, कोणा एका व्यक्तीला श्रेय देणे अवघड आहे. कवी कसा झालो, कसा घडलो हे सांगणे अवघड आहे. ही एक सूक्ष्म प्रक्रिया आहे, शोधकार्य आहे, जे आपल्याला कोठे ना कोठे पडताळून पाहत असते.

**प्रश्न –** आपल्या कवितांमध्ये एवढे खोल अनुभव आहेत हे पाहता असे वाटते की, या तुमच्या आत्मकथा तर नाहीत?

**गुलज़ार –** तसंच आहे! कारण कोणीही रचनात्मक कलाकार असेल. उदा., पेंटर, संगीतकार किंवा लेखक- त्याचे व्यक्तिमत्त्व त्याच्या कामातून झळकणारच ना.. आणि तेव्हाच तो चरित्रात्मक होणार. जर त्याला त्याच्या वेदना नसतील तो कशा प्रकारे आपल्या मानतो हे त्याच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असते. दुसऱ्यांच्या सुख-दुःखाने तुम्ही किती विव्हळ होता हे तुमच्या व्यक्तिमत्त्वावर निर्भर असते. जेव्हा दुसऱ्याच्या दुःखाने तुम्ही दुःखी होता हे झाले तुमचे चरित्र. कुठेतरी मनुष्य आपल्या खाजगी जीवनातून बाहेर पडून समाजाचा एक भाग होतो या प्रक्रियेत प्रथम तो कुटुंबाचा, समूहाचा आणि नंतर समाजाचा भाग बनतो. तो आपल्या मनातील विकासावर निर्भर होतो की, माझी किती प्रगती झालेली आहे? आज आपल्याला दिसते की मनुष्य फक्त आपल्याच समुदायापुरता मर्यादित राहतो त्यामुळे तो आपल्या विकासाचा मार्ग नकळत रोखतो – त्याला आपल्या मर्यादा दिसायला लागतात, तो थबकतो. तो पुढे डोकावून पाहत नाही किंवा पाऊलही टाकत नाही आणि संकुचित होत जातो.

**प्रश्न –** आपल्या जीवनातील मर्यादांचा विस्तार होण्यासाठी काय करावे?

**गुलज़ार –** समाजाशी संपर्क झाला पाहिजे. आपण किती मनमिळावू आहोत, किती भटकंती करतो, किती आणि मुख्य म्हणजे काय वाचतो हे पाहणे महत्त्वाचे आहे. आपण पाहत आहात की, मी मराठीचे सुप्रसिद्ध कवी कुसुमाग्रजांचे साहित्य भाषांतराच्या माध्यमातून हिंदीमध्ये आणत आहे. माझी भाषा



पंजाबीपर्यंतच सीमित नाही. माझे शिक्षण उर्दूतून झाले. हिंदीची आवड आहे. इंग्रजीसुद्धा शिकलो, त्याचे साहित्य पडताळले, वाचले. त्यानंतर ज्या भाषा किंवा बोली भाषांशी माझा संपर्क आला त्यांचेही साहित्य वाचले. महाराष्ट्राचा पंचवीस वर्षांचा रहिवासी आहे. मुंबईकडून जर मी उत्तरेकडे निघालो तर पुण्यात पु.ल.देशपांडे यांना आणि नाशिकमध्ये कुसुमाग्रजांना भेटल्याशिवाय माझा प्रवास सुरू होत नाही. आम्हाला त्यांची प्रचीती येते.

**प्रश्न –** बंगाली भाषेशी जवळीक कशी झाली?

**गुलज़ार –** माझे दोन गुरू आहेत. कविता म्हणजे शायरी करण्याची प्रेरणा मिळाली गुरुदेव टागोरांकडून – ज्यांनी माझ्या सुरुवातीच्या जीवनात माझ्यावर मोठा प्रभाव पडण्यास सुरुवात केली होती. मी त्यांची भाषांतरं वाचली आणि त्यानंतर शरदचंद्र आणि बंकिमचंद्रांना वाचण्यास सुरुवात केली. मी उर्दूतून लिहितो हे खरं आहे; पण मला माझे गुरू टागोर वाटतात. माझे दुसरे गुरू विमल रॉय– ज्यांच्याकडून मी सिनेमातील कुशलता शिकलो. बंगाली संस्कृती आणि भाषेने मी प्रभावित झालो. बंगाली मुलीशी विवाह झाला. बंगाली शायरी मुळातून वाचण्यासाठी बंगाली भाषा शिकलो. लिहिणे–वाचणे सुरू केले. याचे फळ मिळवायचे असेल तर सर्वांत चांगला उपाय असा आहे की, तुम्ही एखाद्या बंगाली मुलीशी प्रेमसंबंध जोडा. (सर्व जण हसतात) बघा, तुम्ही स्वत:हून बंगालीमधून पत्र लिहिण्यास सुरुवात कराल. एक भारतीय म्हणून माझा विकास होत आहे. बहुभाषी होत आहे. स्वच्छ, सुंदर, अतुलनीय आणि अत्यंत मौलिक अशा 'गुरू ग्रंथ साहिब'चे मी वाचन केलेले आहे. त्यातून खूप काही शिकलो; परंतु जीवनाने मला खूप काही शिकविले.

**प्रश्न –** कविता आणि कथा या दोन्हीमध्ये सक्रिय असताना तुम्हाला यातील सोपे आणि अधिक आनंद कशात वाटतो?

**गुलज़ार –** हे पाहा, जीवनामध्ये आनंद आणि सरळपणा या दोन्ही अनाकलनीय गोष्टी आहेत. घरात नाही का आपण असे करतो की, जर मोठा मुलगा जर कामात खूप गुंतला असेल तर लहान–मोठी कामे आपण लहान मुलालाच सांगतो ना! मुलीला त्रास देऊ नका, तिला अभ्यास करू द्या, पत्नीलाही तिथे काम करू द्या– पिताही मी, मुलगाही मी, पतीही मीच आहे तेव्हा प्रत्येक नात्याला मी समान दृष्टिकोनातून पाहतो. फक्त यामध्ये सुविधाजनक काय आहे, कोणाला सांगावे की माझं काम करून दे... अगदी असाच माझा कविता आणि कथांशी संबंध आहे.

**प्रश्न –** पण, आपण यापैकी कशाच्या अधिक जवळ आहात?

**गुलज़ार –** शायरी माझ्या अगदी जवळची आहे. कारण माझ्या व्यवसायात मी आजपर्यंत गद्य साहित्य एवढे लिहिलेले आहे की, पटकथा लेखन, संवाद यातून मुक्ती मिळविण्यासाठी शायरीकडे वळणे मला अधिक सुखदायी वाटत आहे. जेव्हा कधी असे वाटते की, मी फक्त कविता आणि कविताच लिहीत आहे तेव्हा पुन्हा कथेकडे वळतो.

**प्रश्न –** दोन्ही विद्या एकमेकांना मदत करतात?

**गुलज़ार –** हे जाहीर आहे की, तुम्हाला परिवर्तन हवे असते.

**प्रश्न –** साहित्यामध्ये लोकप्रिय आणि गंभीर गोष्टी मानल्या जातात. आपण आपले साहित्य यापैकी कोणत्या श्रेणीमधील मानता, दोन्हीमध्ये का फक्त लोकप्रियमध्ये?

**गुलज़ार –** मला हे कसे ज्ञात असणार? जे वाचतात त्यांनी समजून घ्यावं. हे तर तुम्ही सांगू शकाल. वाचकांचे प्रश्न लेखकाला का विचारता?

**प्रश्न –** लेखन करताना वाचक तुमच्या डोळ्यापुढे असतो?

**गुलज़ार –** हे बघा, जेव्हा मी लिहितो तेव्हा ते माझ्या डोक्यात असते. मी ठरवतो की, मला काय सांगायचे आहे. मी पहिल्यांदा हे निश्चित करतो. मला फक्त माझी कथा सांगायची असते. वाचकांना समोर ठेवून लिहिण्यात काही अर्थ नाही. दुसरी महत्त्वपूर्ण गोष्ट आहे की, मी सर्व जाणतो. आपल्या मनातली गोष्ट वाचकांपर्यंत पोहोचविणे ही झाली संवादकत्मता– मी, माझ्या लेखनाचा याबाबतीत कस लावतो. माध्यमांशी जोडला गेला असल्याकारणाने कसे मांडावे यावर मी अवश्य विचार करतो. विषय माझे असतात ते तुमच्यापर्यंत पोहोचतात की नाही? तुम्ही तुमच्या उन्नतीबरोबरच नकळत चार भिंतींसारखे बंदिस्त होत जाता. प्रत्येक चांगली कलाकृती लोकांपर्यंत पोहोचतच नाही. संगीत, कला किंवा लेखन आपल्या ध्येयापर्यंत पोहोचले पाहिजे. समजावण्याची ही पद्धत अशीच तर असायला हवी.

**प्रश्न –** आपण एवढे सिनेमे, कविता, शायरी लिहिल्या. यातील लेखनाने तुमच्यातल्या मनुष्याला काही विशेष परिवर्तनाचे अनुभव दिलेत का? जसे की एखादे पात्र साकार होत असताना वैचारिक पातळीवर तुमचे खूप मंथन झाले?

**गुलज़ार –** जितक्या वेळा कथा ऐकविली जाते त्या त्या वेळी आपल्या मनात नवनवीन विचार येत राहतात. मला हा एक बदल जाणवला की, कथा ऐकवता ऐकवता आपण एखाद्या विषयाच्या सुरुवातीला पुन्हा येतो, आणि ती कथा सांगत राहतो मग मी मागील आढावा घेऊन त्याचे नाटकीकरण सादर करतो.

**प्रश्न –** लिखाण करताना कधी संकटाचा सामना करावा लागला?

**गुलज़ार –** कसले संकट?... तांत्रिक का अन्य काही?

**प्रश्न –** वैचारिक स्तरावरील संकट?

**गुलज़ार –** बरोबर. 'माचिस' सिनेमा तयार होताना मी जाणले की वातावरण गरम आहे. काही दिवसांनी हा सिनेमा तयार केला पाहिजे... यासाठी मी दहा वर्षे वाट पाहिली कारण, त्या वेळी जर हा सिनेमा तयार केला गेला असता तर आतंकवादाचे वातावरण एवढे चिघळलेले होते की, काही लोकांनी स्वत:च्या स्वार्थासाठी याचे भांडवल केले असते. राजकीय गैरफायदा उठवण्याचा प्रयत्न झाला असता. यासाठी एखादी गोष्ट जर आपल्याला मांडायची असेल, तर त्यात तथ्य असले पाहिजे, त्यासाठी वाट पाहिली पाहिजे. एवढेच नव्हे तर प्रेमाची गोष्ट जरी मांडायची असेल तर त्यामध्ये वस्तुनिष्ठता निर्माण करायच्या वेळी काही अंतर ठेवणे आवश्यक आहे. सत्य जाणून घेण्यासाठी विशिष्ट प्रकारचे अंतर असणे गरजेचे आहे.

**प्रश्न –** 'काली आँधी' वर आपला 'आँधी' हा सिनेमा बनला. 'काली आँधी' तील नायिका कुठेही 'इंदिरा गांधी'वर आरोपण करताना दिसत नाही; पण 'तुमच्या 'आँधी'तील नायिका इंदिरा गांधीच्या आसपास दर्शविली आहे. त्या वेळी आपल्या मनात कोणती गोष्ट होती?

**गुलज़ार –** मी खूप विस्तृत सांगू इच्छितो. 'काली आँधी' सिनेमा 'आँधी' नंतर लिहिला गेला, आँधीच्या आधी नाही. 'काली आँधी'चा पाया 'आँधी' हा होता. कमलेश्वर आमच्या बरोबर होते व एका सिनेमासाठी चेन्नईला गेलो होतो. 'मौसम' सिनेमाचे निर्माता श्री. मस्ली मला श्री. ढूंडी यांच्याकडे घेऊन गेले. कमलेश्वर, माझे सहायक भूषण बनमालीही



होते. त्या वेळी मी 'आँधी' लिहीत होतो. मी विचार केला की मद्रसमध्ये ढूंडी साहेबांना भेटायचे आहे आणि तेथून महाबलिपूरमला जाणार. या दरम्यान मी पटकथेचा पहिला मजकूर पूर्ण करेन. त्या वेळी असे झाले की, ढूंडी साहेबांना कमलेश्वर यांची कथा पसंत पडली नाही. कमलेश्वर खूप मोठे लेखक आहेत. साहित्यामध्ये त्यांचे खूप मोठे नाव आहे. आपण तर त्यांच्यापेक्षा खूप लहान आहोत आणि विशेष म्हणजे आमच्यासाठी हे खूप अवघड होऊन बसले. कमलेश्वर हे विशाल अंत:करणाचे हे आम्ही जाणून होतो. 'सारिका' पासून ते मला 'भाई' म्हणत होते. मी त्यांना 'भाई' म्हणत होतो. त्यांनी अजून कथा द्यायला सुरुवात केली की, एखादी कथा पसंत पडेल व प्रोजेक्ट निश्चित होईल. ए.जे.क्रॉनिन यांच्या कोणत्यातरी कादंबरीवरील एक कहाणी भूषणने ऐकवली. कदाचित त्यावर आधारित नसावी– प्रेरित असावी– ती त्यांना आवडली, आणि 'मौसम' सिनेमा तयार झाला. नंतर मोठी समस्या निर्माण झाली. आम्ही महाबलिपुरमला जात होतो. आम्ही कमलेश्वरांनाही बरोबर घेतले. मुंबईमध्ये भेटी–गाठी होत होत्या, ओम शिवपुरी आमच्या दोघांचेही मित्र होते.

असे ठरले होते की, कमलेश्वरजी 'मौसम'ची कथा लिहितील जी भूषणने तेथे ऐकवली होती. म्हणून मी सल्ला दिला की, तुम्ही मजकूर जवळ ठेवा आणि आपण या प्रोजेक्टवर काम करू. सिनेमाची पटकथा लिहिणे हे एक वेगळे काम आहे. ते एक 'टिमवर्क' असते. मी, कमलेश्वर, भूषण आणि निर्माता मल्लीसाहेब जोडीला होते. 'मौसम' बाबत चर्चा करता करता 'आँधी'ची चर्चा व्हायची आणि 'आँधी'वर चर्चा करता करता 'मौसम'वर चर्चा व्हायची. मग यातून असे ठरले की, 'आँधी' आणि 'मौसम'चे स्क्रीनप्ले तयार करायचे आणि त्यावरून या दोन्हीवर कमलेश्वर कादंबरी लिहितील. ते एक महान कथालेखक होते म्हणून या दोन्हींवर त्यांना कादंबरी लिहिण्यास सांगितले गेले; पण 'मौसम'वर लिहिल्या जाणाऱ्या कादंबरीला मी नाव दिले – 'आगामी अतीत'. अशा रीतीने या दोन्ही कादंबऱ्या लिहिल्या गेल्या.

सिनेमासाठी योग्य वेळेत स्क्रीप्ट तयार करावे लागते. आम्ही तिघे भोपाळला गेलो आणि मोटरगाडीने दिल्लीचा प्रवास केला. तेव्हा मी सांगितले की, आता मी, 'आँधी'चे अंतिम लेखन पूर्ण करेन आणि मगच हॉटेलच्या बाहेर पडेन.. त्या हॉटेलच्या

वेटरचे नाव होते जे.के. त्यानी आमची खूप उठबस केली. मी त्याला म्हटले, ‘आम्ही तुम्हाला अधिक काही देऊ शकत नाही; पण आमच्या सिनेमाचा नायक जो मॅनेजर आहे. त्याचे नाव आम्ही तुला देऊ शकतो– ‘जे.के.’ अशा रीतीने आम्ही त्याला वेटरचा मॅनेजर केले.

**प्रश्न –** ‘आँधी’ मध्ये किती इंदिरा गांधी आहेत?
**गुलज़ार –** मी त्या वेळीही सांगितले होते आणि आजही सांगत आहे की, त्यामध्ये ‘इंदिरा गांधी’च्या जीवनाविषयी काहीही नाही.

**प्रश्न –** परंतु आणीबाणीच्या काळात तर यावरच आणि या आधारावर बंदी घालण्यात आली होती?
**गुलज़ार –** एक महिला राजनेता व उत्तम मॉडेल म्हणून काम करायला त्या योग्य होत्या. ज्या वेळी महिला राजनेत्याचे पात्र दाखवायचे असते तेव्हा हे जाहीर असते की, तशी छबी मिळत नाही. आम्ही पोकळ किंवा अंदाजे असे काही लिहीत नाही. कोणते ना कोणते मॉडेल आमच्या समोर असतेच. त्या वेळी आमच्या समोर दुसरी मॉडेल होती तारकेश्वरी सिन्हा. जेव्हा मुलाखतीमध्ये काही कारणं सांगायची होती तेव्हा तारकेश्वरी सिन्हाचे नाव घेत होतो.

**प्रश्न –** मी ज्या सृजनात्मकतेच्या म्हणजेच उत्पादकतेच्या संकटाविषयी बोलत होतो तो प्रश्न या ठिकाणी लागू पडतो का?
**गुलज़ार –** कारण केसांमधील त्या पांढऱ्या पट्टीमुळे काही वृत्तपत्रांनी अशी काही समीकरणं आखायला सुरुवात केली आणि त्यांच्या वैयक्तिक स्वार्थासाठी त्यांनी इंदिरा गांधींवर आरोप करायला सुरुवात केली. त्यांनी अशीही वावटळ उठविली की, बघा पंतप्रधानांवर कसे चित्रण केले आहे, उदा., त्या सिगरेट पीत आहेत, दारू पीत आहेत इ. विरोधी पक्षानेही आपली पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न केला. ‘आँधी’ सिनेमाची नायिका सिगरेट पिते, अर्ध्या ग्लास मदिराचे सेवन इ... ‘सर्व उच्चभ्रू सोसायटीतील महिला, मॅच्युअर्ड वुमन, क्रिएटिव्ह वुमन’ या देशातच नव्हे तर सर्व जगात सिगरेट आणि दारूबाबत मनाई नाही; परंतु आपल्या सिनेमातून खलनायिका आणि नकारात्मक वृत्तीच्या महिलाच दारू पितात. मी या विचारांना मोडू इच्छित होतो. नायिकाही घेऊ शकते या विचाराला संभाव्य दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे.

**प्रश्न –** सुरक्षाभाव घेतल्यानंतर लेखक आपले लेखन थांबवतो का?
**गुलज़ार –** असं काही होत नाही. तुमच्याकडे अभाव आहे किंवा तुमच्याकडे सांगण्यासाठी काही नाही. तुम्ही चुकलात की चुकलात. तुमच्याजवळ सर्व काही आहे, सुरक्षाही आहे; परंतु सांगण्यासाठी बैचेन आहात तर तुम्ही लिहीत राहाल. तुमची सर्जनशीलता तुमच्या मनातील संवेदना आणि तळमळीचे नाव आहे. आपण शांत केव्हा होता? ज्या दिवशी तुम्हाला समजते की, तुम्ही सर्व काही जाणता तेथेच तुमचे सर्व ठप्प होते. तुम्ही हे जाणून घ्यायला हवे की, अंतराळातले विज्ञान काय आहे, कोलंबिया असफल का झाले, आणि कोलंबिया नंतर दुसऱ्या अंतराळयानासाठी किती वेळ लागला? आपल्याला नव्या पिढीची मानसिकता जाणून घ्यायला हवी. ती खूप गतिमान आणि तत्पर आहे. संपूर्ण जगात नाव



कमवत आहे. त्यांचा 'आय क्यू' खूप मोठा आहे. आपल्या देशाचे मा. राष्ट्रपती सामान्य कुटुंबातील आहेत. त्यांनी 'अग्नी'चे यशस्वी परीक्षण केले. आपण सर्वांनी त्यांचे 'अग्निपंख' हे पुस्तक वाचले पाहिजे. तेव्हा आपल्याला कळेल की, आपण अणुशक्तीच्या ताकदीचे प्रदर्शन करीत नाही आहोत, तर आपण हे दाखवून देत आहोत की, आपण किती समर्थ आहोत. डॉ. अब्दुल कलाम म्हणतात की, 'आमच्या आत धगधगणारी आग ही आमच्या कपाळाचा टिळा होऊ दे.' मी या पुस्तकाचे भाषांतर केले आहे. जेव्हा आपण जगणे थांबवतो तेव्हा आपण आपला विकास बंद करतो. आपण जेव्हा जगत असतो तेव्हाच आपला विकास होत असतो.

**प्रश्न –** लेखकाला आपल्या साहित्यकृतीतून अत्यंत उच्च कोटीच्या आनंदाची अनुभूती कधी येते का?
**गुलज़ार –** असे क्षण तर येतात; पण असे क्षण लगेच येत नसतात.

**प्रश्न –** प्रकाशनानंतरही तुम्ही लेखनामध्ये बदल करता का?
**गुलज़ार –** हो, आवश्यकता असेल तर. जुन्या कविता वाचताना काही बदल अवश्य करतो, आणि नव्या प्रकाशनाच्या वेळी सुधारित शायरीच देतो. जसजसा आपण लिखाणात विकास करत जातो तसतशी परिवर्तनाची शक्यता होत जाते.

**प्रश्न –** आपले व्यक्तिमत्त्व ताजेतवाने राहण्याच्या मागे कोणाचे योगदान सर्वांत अधिक आहे?
**गुलज़ार –** जेव्हा मी कविता करतो तेव्हा ती कविता समोर ठेवून मी त्यांच्याशी बोलतो. मग म्हणतो की मी तयार केल्या आहेत या कविता. तेव्हा सर्व कविता खळखळून हसून मला म्हणतात, 'अरे भल्या माणसा, आम्ही तुला घडवले आहे, आम्ही तुला कवी-शायर केलेले आहे. मी शायरी नाही केली तर कवितांनी मला शायर बनवले.

**प्रश्न –** आपल्या पिढीपर्यंत अशी परंपरा राहिली आहे की, एक साहित्यिक आणि जगाशी संबंधित गोष्टींचा सल्ला दुसऱ्या पिढीला देत आल्या आहेत. लेखन आणि इतर क्षेत्रामध्ये असेच वातावरण तुम्हाला जाणवते का?
**गुलज़ार –** कदाचित तुम्ही माझ्या मताशी सहमत नाही होणार; पण मला वाटते की, नवी पिढी कोणत्या गोष्टीसाठी मागील पिढीकडे पाहत नाही. मला हे ठीक वाटते की, ते वयस्कर पिढीकडे पाहत नाहीत. आपण त्यांना चांगले जग देऊ शकलो नाही की, जे आपल्याला आपल्या पूर्वजांकडून मिळाले. म्हणून आपल्याकडे नव्या पिढीने पाहवे असं काही कारणच नाही. आपण अन्याय आणि भ्रष्टाचाराच्या विरुद्ध काही करू शकलो नाही, जे आपण करायला हवे होते. भ्रष्टाचारासाठी आपण सर्व जण जबाबदार आहोत. अन्याय आणि अध:पतन जे आज आपल्या देशात आहे त्यासाठीही आपण जबाबदार आहोत. म्हणून आपल्यावर नव्या पिढीने गर्व करावा असं काहीच नाही.

नवीन पिढी जे सर्वांत चांगले काम करत आहे आणि ते म्हणजे स्वावलंबन- ती स्वत:च्या पायावर उभी आहे. आपल्या वेळी आपले आई-वडील विचारायचे किंवा आपल्याला सांगायचे की, डॉक्टर व्हा, इंजिनीयर व्हा किंवा वकील व्हा. या तीनपैकी दुसरे काही सुचत नव्हते. आज तुम्हाला कळतही नाही की, तुमचा मुलगा तुम्हाला म्हणतो की, मी या ठिकाणी अर्ज केला आहे, मी आयटीत चाललो आहे, मी तिकडे चाललो आहे. आज हजारो वाटा आहेत. त्यांना माहिती आहे की त्यांना काय करायचे आहे, कोठे जायचे आहे. म्हणून ते चांगलंच करीत आहेत. आपल्या सल्ल्याची वाट पाहत नाहीत. आपण मात्र हे धरून चाललोय की आम्ही मोठे आहोत, वयस्कर आहोत. ही नवी पिढी अधिक समजदार व गतिमान आहे. त्यांच्याबाबत चिंता करण्याची काळजी नाही.

**प्रश्न –** अजून एक – इलेक्ट्रॉनिक मीडियाचा वाढता प्रसार. तुम्हाला असे वाटते का की, छपाई प्रक्रियेला

काही धोका निर्माण होत आहे?

**गुलज़ार –** मुद्रित साहित्याला धोका काही नाही; परंतु आपण याबाबत हव्यासी आहोत. एक तर असे की पहिल्यांदा हिंदी होती तेव्हा आपण हिंदीला धरून बसलो. नंतर उर्दू, पंजाबी... इंग्रजी एक सामान्य भाषा, जी सर्व जगाला जोडत आहे. हे सर्व बरोबरीत आहे. आपण उदार धोरण ठेवले पाहिजे. मुद्रित साहित्य कधीच समाप्त होणार नाही कारण त्याची स्वत:ची अशी अस्मिता आहे. तंत्रज्ञानात आपण नेहमीच शोध लावत आलो आहोत. मुद्रणाचा हजारो वर्षांचा इतिहास आहे. प्रत्येक वेळी ते आपले अस्तित्व कायमच ठेवेल.

**प्रश्न –** लोकांची वाचनाची आवड कमी होत चालली आहे. केवळ दूरदर्शन पाहूनच ते संतुष्ट होतात...

**गुलज़ार –** काही फरक पडत नाही. जोपर्यंत ते विचार करत आहेत तोपर्यंत ते भावना व्यक्त करणारच, शिकत राहणार तोपर्यंत मुद्रित शब्दांना धोका नाही. तंत्रज्ञानात ते प्रगती करत आहेत; परंतु इंग्रजी आज 'विज्ञानाची भाषा' बनली आहे. तसेच जगात इंग्रजी भाषेमध्ये सगळ्या सुखसुविधा आहेत. जर हिंदीत हे करता आले तर अवश्य करायला हवे. कोण रोखेल? तुम्हाला कोणत्याच गोष्टीसाठी भाषेचा दुराग्रह असता कामा नये; पण एक गोष्ट नक्की! ज्या भाषेबरोबर आपली संस्कृतीची नाळ जोडलेली आहे, तिला कधी विसरता कामा नये. संस्कृतीचे कधी भाषांतर होत नाही. तुमच्या विचारांचे भाषांतर करू शकता; परंतु त्याच्या सांस्कृतिक हिश्शांचे भाषांतर कधीच करू शकणार नाही. जसे की, एखाद्या फुलाचे दुसऱ्या फुलाशी कलम करून एक नवीन रोप तयार करू शकाल; परंतु तो सुगंध मात्र तुम्ही नाही देऊ शकणार. सुगंधाचे भाषांतर होऊ शकत नाही त्याप्रमाणे संस्कृती आपला भक्कम आधार आहे.

**प्रश्न –** आपण संस्कृतीचा उल्लेख केलात आणि विश्वभाषा म्हणून इंग्रजीचा उल्लेख केलात. आता आपले 'विश्वगाव'यामध्ये परिवर्तन होत आहे, आणि असे वाटू लागले आहे की, 'वैश्विक संस्कृती' सारखी एखादी गोष्ट सगळीकडे वृद्धिंगत होत आहे या गोष्टीचा आपल्या संस्कृतीला धोका निर्माण होईल असे वाटते का?

**गुलज़ार –** आपण एक नवे पाऊल टाकत आहोत.



ज्याला 'वैश्विक समाज' म्हणतो. परिवर्तन होत आहे. मुलगा परदेशी जाताना तुम्ही विमानतळावर जाऊन मुलाचे फोटो काढत होतात. आताच्या पिढीतले लोक असं करत नाहीत. विमानतळावर फोटोग्राफर मिळत नाही. आत्ता फोटो काढणे फालतू वाटत आहे कारण परदेशी जाणे आता सामान्य गोष्ट झाली आहे. निर्माते प्रत्येक सप्ताहात परदेशात जातात आणि परत येतात. कोणती संस्कृती आहे? सर्व काही बदलत आहे. काहीही स्थिर नाही, सगळं परिवर्तन आहे आणि या सर्वांतच जीवन आहे.

**प्रश्न –** साहित्याला काही धोका आहे?

**गुलज़ार –** काहीच नाही. विचारांना कसला आलाय धोका? कृष्ण आपली एक पौराणिक कथा आहे. आपल्या विश्वासाचे प्रतीक आहे, आस्था आहे. 'हरे रामा, हरे कृष्णा'चा गजर जर जगात होत असेल तर आपल्याला काही त्रास आहे का? 'योगा' सर्व जगात पसरत आहे तर आपले काही नुकसान आहे का? परंतु त्यांचे नृत्य आपल्या देशात आले तर त्रास होतो, असे का?

**प्रश्न –** म्हणजे आपल्याला त्यांची गोष्ट मंजूर करायला हवी?

**गुलज़ार –** प्रत्येक गोष्ट निवडली तरच ठीक. आपण केवळ व्यक्ती आहोत आणि वेळेसोबत चालत आहोत. आपल्याला कोणत्याही गोष्टीला पडताळून पाहण्याची आवश्यकता नाही, वेळच ते काम करेल. आपण न्यूयॉर्कमध्ये भारतीय विद्याभवन उभे केले आहे. आपण त्यांवर भारतीयता लादत आहोत का? त्यांनी भारतामध्ये मॅकडॉनल चिकन आणले तर आपण विचलित झालो. आता आपण विविध देशांबरोबर विकास करत आहोत. त्या काळी कानपूर पासून मुंबई खूप दूर होती. आज मुंबईपासून लंडन अजिबात दूर नाही. आपण एका वेगळ्या विश्वात राहतो. जवळीक वाढत आहे. आता असा विचार करायला हवा की, या सर्व गोष्टींचा 'मंगळावर' काय परिणाम होईल...? आपण मंगळावर कधी पोहोचणार? ऑगस्टमध्ये मंगळ पृथ्वीच्या खूप जवळ येईल, की जो आपल्या जीवनमानात येणार नाही कारण पुन्हा शंभर वर्षांपर्यंत असा योग येणार नाही. यासाठी आपल्याला विचार करायला हवा की, जेव्हा मंगळ येथून जाईल तेव्हा आपण काय करायला हवे? परदेशी लोक यावर काम करीत आहेत.

**प्रश्न –** तुमच्या कवितांमधून गाव आणि शहर संस्कृती समान रूपात दिसून येतात. तुम्हाला जवळीक कशाची आहे?

**गुलज़ार –** खरा भारत देश गावांमध्येच स्थिरावलेला आहे हे आपण जाणतोच. आता गावं विकसित होत आहेत. त्यांचे रूपांतर लहान शहरांमध्ये होत आहे. नंतर हळूहळू त्यांचे शहर होत आहे. पूर्वी चेन्नई, कोलकाता, दिल्ली और मुंबई अशी चार महानगरे होती. आता पाहा किती महानगरं झालीत. असं तर नाही होत की, गावं वेगळी राहिली आणि शहरं आंतरराष्ट्रीय झाली. अजून एक– पूर्वी नदीवर बांध बांधून कालवा काढला जात होता आणि पाण्यासाठी कलह होत होते आता तेथे बोअरसुद्धा आहेत. बैलांच्या ऐवजी ट्रॅक्टरने नांगरणी केली जात आहे. मग सांगा– कोण कोणाच्या जवळ जात आहे. शहरं गावांकडे चालली आहेत. केवळ याच विकासामुळे एकटे पंजाब राज्य सगळ्या देशाला धान्य पुरवण्यात सक्षम झाले आहे. एकाच कालखंडात मनुष्य जातीचा विजय नेहमी होत नसतो. जीवनात प्रगती करणे आवश्यक असते.

**प्रश्न –** तुम्ही तुमच्या रचनांमधून ग्रामीण शब्दांचा वापर छान केला आहे.

**गुलज़ार –** खूप सारे शब्द असे आहेत की, जे नजरेआड होत आहेत. माझा प्रयत्न असा आहे की त्या शब्दांचे जतन करू. भाषेचे सौंदर्य नेहमी होत राहिले पाहिजे. मला जाणवतंय की 'उतावळ' शब्द नजरेआड होत चाललाय. म्हणून माझा प्रयत्न असा आहे की, 'लवकर' या शब्दाचा मी दोनदा उपयोग केला असेल तर किमान एकवेळा 'उतावीळ' शब्दाचा उपयोग

केला पाहिजे. याचे कारण असे की, हा शब्द वापरात असावा.

**प्रश्न** – असं कधी होऊ शकेल का, की आपल्या देशातील लेखक फक्त लेखनावरच निर्भर राहून लिहीत राहतील?
**गुलज़ार** – नक्कीच... हे परमेश्वरा! अशी स्थिती नक्कीच निर्माण होईल. आशा आहेच. मी पूर्णपणे आशावादी आहे.

**प्रश्न** – परंतु, आज अशी स्थिती दिसत नाही?
**गुलज़ार** – आज आपल्या शिक्षणाची टक्केवारी किती आहे? कधीतरी ही स्थिती नक्कीच बदलेल. सर्व लोक सुशिक्षित असतील. आपल्या मूळ गरजा बदलल्या पाहिजेत. आपल्या देशात अब्दुल कलाम यांच्यानंतर चाळीस वर्षांपर्यंत कोणी शिक्षणमंत्री नव्हता. वेगवेगळ्या मंत्रालयांशी शिक्षण जोडले होते. आपल्या जीवनाच्या प्राथमिक गरजा चुकीच्या होत्या. आपल्या मतपेटीसाठी जनतेला अडाणी ठेवण्यात आपण आपले हित मानले. जनतेला सुशिक्षित करण्याचे काम केरळ चांगल्या पद्धतीने करू शकतो, तर दुसरे राज्य का नाही करणार? केरळ काही सर्वसंपन्न राज्य नाही; पण त्याने आपली जनता शंभर टक्के सुशिक्षित करण्याचा गौरव प्राप्त केला आहे. पंजाब संपन्न राज्य आहे; पण तेही नाही करू शकले. आपले नोकर सही करू शकतात की नाही याची आपण कधीच चिंता केली नाही. आपण आपल्या कामगारांना शिकण्यासाठी कधी प्रेरित नाही केले. जर आपण असे केले असते, तर त्यांनी आपल्या मुलांना शिकण्यासाठी पाठवले असते. या दिशेने आपण कधी ध्यान दिले नाही. प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न केले पाहिजेत. मी तर दरवर्षी पाच–सहा मुलांना शाळेत पाठविण्यासाठी उद्युक्त करतो.

आपण परमेश्वराला आणि सरकारला प्रत्येक कामात सहभागी करण्याचा प्रयत्न करतो. स्वत:हून सुद्धा आपण चांगले योगदान द्यायला हवे. लोक शिक्षित झाले तर वाचन करतील आणि वाचन करतील, तर लेखकाची सार्थकताही वाढेल. जेव्हा आपली डाळ शिजत नाही किंवा काही चालत नाही तेव्हासुद्धा आपण देवाची आठवण काढतो.

**प्रश्न** – सन्मान आणि लेखन याचा अंतर्संबंध कसा आहे?
**गुलज़ार** – साहित्यामुळे सन्मान मिळतात. पुरस्कारांमुळे लेखन कधी प्रभावित होत नाही. मुंबईहून दिल्लीला जाताना मी मैलाचे दगड पाहतो. सन्मान, बक्षीस किंवा आदर हे मैलाचे दगड आहेत आणि सर्जनशीलतेचा प्रवास आहे. पुरस्कार मिळण्याचे क्षण आत्ता मैलाचे दगड झाले आहेत. आता तुम्हाला पुढे जायला हवे. तुम्हाला तुमच्या प्रवासास निघावयाचे आहे आणि लिहायचे आहे. मैलाच्या दगडाजवळ थांबायचे नाही.

**प्रश्न** – आपणाला जेव्हा 'साहित्य अकादमी'चा पुरस्कार मिळाला तेव्हा आपला अनुभव कसा होता?
**गुलज़ार** – खूप छान वाटले. प्रसन्न वाटले. असे वाटले की, आपण असे म्हणाल की.. किंवा म्हणालात तर– अच्छा, हे ते कवी आहेत होय, की जे सिनेमातील गाणी लिहितात. तेव्हा मी म्हणेन की, नाही, ते आहेत गीत लिहिणारे ज्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. फक्त एवढाच फरक पडलेला आहे; पण तेथेच थांबायचे नाही. प्रवास सुरू आहे.

**प्रश्न** – डोळ्यासमोर काही खास असा विषय आहे?
**गुलज़ार** – अजून खूप लिहायचंय, सिनेमे तयार करायचेत आणि अजून खूप काम करायचंय!

---

**डॉ. दामोदर खडसे**
बी–५०३/५०४, हांई ब्लिस,
कैलास जीवन कंपनीजवळ, धायरी, पुणे–४११०४१
संपर्क : ९८५००८८४९६

---

मूळ लेख हिंदी । भाषांतर । प्रा. रविकिरण गळंगे
छायाचित्रे सौजन्य । विवेक रानडे

# ‘संत बसवेश्वरांच्या मानवमुक्ती चळवळीचे इहवादी आकलन’

**प्रा. डॉ. कैलास देवराम सलादे**

**प्रास्ताविक–**

संत बसवेश्वरांच्या मानवमुक्ती चळवळीच्या उत्थानापूर्वी समाजामध्ये अनेक अनिष्ट रूढी-परंपरांचे प्राबल्य होते. धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धेचा आणि पोथीनिष्ठतेचा लोकांच्या मनावर खोलवर परिणाम पडलेला होता. वेद-प्रामाण्यांनी भ्रामक कर्मकांडांना जन्माला घातले होते. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने माणसा-माणसात विषमतेची विषवल्ली तयार केली होती. होमहवन, मूर्तिपूजा, यज्ञ व्यवस्थेतील पशुबळी, व्रतवैकल्ये, स्वर्गप्राप्तीच्या भ्रामक कल्पना, ज्योतिषविद्येच्या नावाखाली समाजाची होणारी मानसिक फसवणूक, पुनर्जन्माचे थोतांड, जातिभेद, अस्पृश्यता, स्त्री-पुरुष दास्य, यज्ञ आणि पुरोहितशाहीचे वर्चस्व, अंधश्रद्धा, कर्मविपाकाचा अतार्किक सिद्धान्त, भेदाभेद, स्वर्ग, नरक, परमात्मा या सर्व गोष्टी मानवाला निष्क्रिय करत होत्या. सामान्य स्त्री-शूद्रांच्या आत्मिक उन्नतीचा मार्ग खुंटला होता. मंदिरे किंवा देवालये मानवी उन्नतीचे कारण न बनता सर्वसामान्यांच्या शोषणाची केंद्रे बनली होती. धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात अंधकार निर्माण झाला होता. या अंधारयुगातून सामान्य माणसांच्या मानवी कल्याण संकल्पनेचा संकोच होत होता. या अंधयुगाच्या पार्श्वभूमीवर संत बसवेश्वरांनी मानवमुक्ती चळवळ सुरू करून सर्वसामान्य स्त्री-शूद्रादी समाजाला सर्वांगीण विकासाची संधी उपलब्ध करून दिली. संत बसवेश्वरांच्या वरील सर्व मानवमुक्तीच्या चळवळीच्या घटकांचा संदर्भ इहवादाशी जोडता येतो. चार्वाक, बृहस्पती, लोकायत यांनी मांडलेली इहवादी संकल्पनाच मध्ययुगीन कालखंडात संत बसवेश्वरांनी मांडली असे वाटते. त्यांच्या मानवमुक्ती चळवळीचे इहवादी दृष्टिकोनातून आकलन करण्याचा या लेख प्रपंचाचा हेतू आहे.

**बसवेश्वरांचे संक्षिप्त चरित्र–**

मध्ययुगीन कालखंडातील संत, कवी आणि कळकळीचा समाजसुधारक म्हणून संत बसवेश्वरांचे योगदान कालातीत आहे. संत बसवेश्वरांना ‘बसवण्णा’ या नावानेही ओळखले जाते. इ.स. ११३१ मध्ये बसवेश्वरांचा जन्म झाला. (बसवेश्वरांच्या जन्म-तिथीविषयी वाद आहे. काही अभ्यासक त्यांची जन्मतिथी इ.स.११०५ अशी असल्याचे मानतात.) कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या गावातील एका ब्राह्मण कुटुंबात त्यांचा जन्म झाला. वडील मादिराज (मादरस) हे बागेवाडीच्या अग्रहाराचे प्रमुख होते. आई मादलांबा

(मादंब) धार्मिक आणि सात्त्विक प्रवृत्तीची होती. बसवेश्वर बालपणापासूनच स्वतंत्र आणि क्रांतिकारक विचारांचे होते. वयाच्या आठव्या वर्षीच जातीच्या श्रेष्ठपणाचे प्रतीक असलेल्या मौजबंध विधीला नकार देऊन त्यांनी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध संघर्ष पुकारला. मौजबंध झाल्याशिवाय बसवेश्वरांचे ब्राह्मण्य समाजाला मान्य होणार नाही म्हणून त्यांच्या आई-वडिलांनी त्यांचे मन वळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र त्याचा उपयोग झाला नाही. बसवेश्वरांनी गृहत्याग करून त्या काळातील उच्च विद्येचे माहेरघर असलेले कुडलसंगम जवळ केले. या ठिकाणी बारा वर्षं अध्ययन केले. पुढे चालुक्यांचा मांडलिक राजा बिज्जलच्या दरबारात नोकरी पत्करून पुढे ते आपल्या हुशारीच्या जोरावर मुख्य प्रधान बनले. वीरशैव संप्रदाय ह्या कर्नाटकातील सर्वांत जुन्या संप्रदायाला आधुनिकतावादी संप्रदायाच्या स्वरूपात 'लिंगायत' या नावाने समाजापुढे आणले. पुढे वैदिक संस्कृतीच्या रखवालदारांनी हिंसात्मक विरोध केल्याने मानवमुक्तीच्या चळवळीला अवरोध निर्माण झाला. मात्र बसवेश्वरांनी समाजाला दिलेला मानव कल्याणाचा बीजमंत्र नष्ट झाला नाही. नव्हे तो नष्ट होणारच नाही कारण तो शाश्वत आणि चिरंतन असा विश्वव्यापक विचार आहे.

**इहवाद संकल्पना–**

भारतीय तत्त्वज्ञानातील 'इहवादी दर्शन' ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. इहवादालाच 'लोकायत'दर्शन असेही म्हटले जाते. बृहस्पती आणि चार्वाक यांना या तत्त्वज्ञानाचे आद्य प्रवर्तक मानले जाते. 'इहवाद' हा अर्थात एक वाद आहे. ती विचारप्रणाली, एक दर्शन, एक प्रकारचे तत्त्वज्ञान आहे. म्हणजे जग आणि माणूस ह्यांच्या समग्र स्वरूपाविषयीचे एक विशिष्ट मत आहे. ह्या मताचा नेमका आशय काय आहे? इहवादी दर्शन अर्थात 'परवादी' दर्शनाला नाकारून उभे राहील. विश्वात आणि माणसात परतत्त्व असे काही नाही अशी इहवादाची भूमिका आहे.[१]

हिंदी बृहद् शब्दकोशात 'इह' या शब्दाचा अर्थ 'यहाँ, इस लोक में, इस काल में, यह जीवन में' असा दिला आहे. म्हणजे पृथ्वीवरील (इह) लौकिक जीवनाला इहवादी जीवन म्हटलेले आहे. हे जीवन सत्य आणि वास्तव जगातील असते. भारतीय तत्त्वज्ञानात इहलोक आणि परलोक अशा संकल्पना प्रचलित आहेत. इहलोक



म्हणजे पृथ्वीवरील आपले शाश्वत जीवन होय. ज्यात जन्म, मृत्यू आणि देह या घटकांना महत्त्व आहे. पृथ्वी, आप, तेज आणि वायू या चार तत्त्वांच्या संयोगास शरीर, इंद्रिय, विषय या संज्ञा दिल्या आहेत. इहवादाने आत्म्याचे अस्तित्व पूर्णपणे नाकारले असून शरीर हेच अंतिम सत्य मानले आहे. आत्मा, पुनर्जन्म, कर्मविपाक, दैव, स्वर्ग, प्रारब्ध, नियती अशा भ्रामक गोष्टींवर इहवाद मुळीच विश्वास ठेवत नाही. काम, क्रोध, मोह, माया, मद आणि मत्सर यांनी युक्त असणारे लौकिक जीवन आपण जगतो आणि उपभोगतो. यामध्ये परलोकाची (स्वर्गलोकाची) भुरळ पडून ती मिळवण्यासाठी नाना प्रकारचे कर्मकांड, पूजा-अर्चा, यासाठी यज्ञ-याग, दान, दक्षिणा इ. करण्यास इहवादाचा विरोध आहे, कारण इहवादाच्या मते 'परलोक' ही गोष्टच अस्तित्वात नाही. मानवी मनाने कल्पनेने तयार केलेली ती कपोलकल्पित गोष्ट आहे. ती मिळवण्यासाठी ऐहिक जीवनात दुःख-कष्ट सहन करणे इहवादाला मान्य नाही. उलट आपल्याला उपभोगायला मिळालेले लौकिक जीवन अधिक सुखी कसे करता येईल यासाठी प्रयत्नशील असावे, असे इहवादाला वाटते. चार्वाकाचे वचन या संदर्भात प्रसिद्ध आहे तो म्हणतो–

**'यावेत जीवेत सुखेन जिवेत।**
**ऋणं कृत्वाघृतम पीबेत।**
**भस्मी भूतस्य देहस्य पुनरागमन कुत: ।।'**

या श्लोकामुळे चार्वाकाला भोगवादी, चंगळवादी अशी दूषणे लावली गेली आहेत. मात्र मुळात या वचनाचा अर्थ असा शब्दश: घेऊन चालणार नाही कारण, जन्मापूर्वी आणि मृत्यूनंतरच्या कल्पित गोष्टींना इहवाद महत्त्व देत नाही. उलट आपल्या वाटेला जे जीवन आलेले आहे ते जीवन सुखी करण्यासाठी वेळ पडले तर कर्ज काढून तूप सेवन करावे व सुख प्राप्त करावे असे चार्वाकाला म्हणायचे होते. 'इहवाद हा मानवी जीवनाविषयी एक दृष्टिकोन आहे. मानवी जीवांची खरी साध्ये काय आहेत हे विशद करणारी ही दृष्टी आहे.'[२] लौकिक जीवन सुखी करण्यासाठी केलेले प्रयत्न हेच महत्त्वाचे आहेत. बाकी स्वर्ग, पुनर्जन्म, आत्मा या सगळ्या गोष्टी खोट्या आहेत. 'पृथ्वी, जल, वायू आणि तेज' ही चार तत्त्वे देहाकारात परिणत होतात, म्हणजे आकार घेतात. तेव्हा येथे आत्मा म्हणजे चेतना निर्माण होते आणि ती तत्त्वे विलय पावताच चेतना म्हणजे आत्माही नष्ट होतो. आत्मा नावाची गोष्टच अस्तित्वात नसेल तर त्याच्याभोवती निर्माण केलेल्या पुनर्जन्मादी सर्व कल्पनांचे भ्रमजल आपोआपच नष्ट होते'[३]

**'यावतं जीवं सुखंजिवेत नास्ति मृत्यूरगोचर ।**
**भस्मी भूतस्य शांतस्य पुनरागमनं कुतं ।।'**

हा मानवी देह आणि जीवन पुन्हा पुन्हा मिळणारी गोष्ट नाही, त्यामुळे या जीवनात मानवाने सुखी राहावे असे मानण्यात कोणतीही भोगवादी वृत्ती नाही. उलट कुठल्याही काळातील मानवाचा आपले जीवन सुखी होण्यासाठीच प्रवास सुरू असल्याचे दिसते. परलोकातील सुखापेक्षाही लौकिक जीवन सुखी करण्याकडे इहवादी दर्शनाचा कल असल्याचे दिसते. इहवादाला पर्यायी शब्द म्हणून 'लोकायत, जडवाद, भौतिकवाद, नवमतवाद, वैज्ञानिकता, सेक्युलॅरिझम, अस्तित्ववाद' असेही शब्दप्रयोग वापरले जातात.

### संत बसवेश्वरांच्या चळवळीचे इहवादी आकलन –

बाराव्या शतकात संत बसवेश्वरांनी वेद प्रामाण्य नाकारून, यज्ञ व पुरोहितांच्या वैदिक परंपरेला विरोध केले. ग्रंथप्रामाण्य, चातुर्वर्ण्य व्यवस्था व अस्पृश्यतेला विरोध, अनिष्ट प्रथा व परंपरांचा त्याग, जातीप्रथा निर्मूलन, स्त्री–पुरुष समता, आंतरजातीय विवाह, विधवा पुनर्विवाह, स्त्री स्वातंत्र्य, एकेश्वरांचा आग्रह, श्रमप्रतिष्ठा, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांचा स्वीकार, भेदाभेद करणाऱ्या धर्मविचारांना विरोध, वेद व ब्राह्मण वर्गाच्या अनैतिक मक्तेदारीला विरोध, पशुबळीला विरोध, संन्यास संकल्पनेला विरोध करून इहवादी विचार संकल्पनांचा स्वीकार केला. संत बसवेश्वरांची ही सबंध चळवळ इहवादी सिद्धान्ताच्या पायावर उभी आहे, त्यामुळे बसवेश्वरांना 'मध्ययुगीन चार्वाक' म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही.

### चैतन्यवाद, जडवाद व भौतिकतावाद–

चैतन्यवाद आणि जडवाद किंवा भौतिकवाद ह्या परस्परविरोधी संकल्पना दिसतात. चैतन्यवादालाच कल्पनावाद, कैवल्यवाद या नावानेही ओळखले जाते. चैतन्यवादाची भूमिका ही 'निसर्ग अंतिम सत्य हे निर्गुण, निराकार, अव्यक्त आणि दिक्कालातील आहे. जग हे केवळ एक आभास आहे, माया आहे. विश्वाचे अंतिम सत्य इंद्रियगोचर नाही. मानवाच्या इंद्रियांना त्याचे आकलन होणे शक्य नाही.'[४] चैतन्यवादाने जगाचे अस्तित्व पूर्णपणे नाकारले आहे. 'ब्रह्म सत्य जग मिथ्या' असे त्यांचे म्हणणे आहे. चैतन्यवाद्यांनी आत्म्याच्या अस्तित्वाला अधिक महत्त्व दिलेले दिसते. त्यांची प्रवृत्ती ही निवृत्तीप्रधान आहे. एस.जी.सरदेसाई यांचे पुढील विधान महत्त्वाचे आहे. ते म्हणतात की, 'चैतन्यवादाची कास धरली की जड जगाचे अस्तित्व संपूर्णपणे नाकारावे लागते; किंवा व्यावहारिकदृष्ट्या मान्य केले तर ते जग कोणीतरी, कधी तरी निर्माण केले ही भूमिका घ्यावी लागते, आणि ही भूमिका घेतली की ईश्वर, परलोक, आराधना, पुनर्जन्म, मोक्ष इ. कल्पना त्या मागोमाग येतात.'[५] चैतन्यवाद हा ईश्वरवादी असतो. चैतन्यवाद्यांनी पृथ्वी, पाणी, वायू, अग्नी आणि आकाश या पंचतत्त्वांना महत्त्व दिले होते.

जडवादाची किंवा भौतिकवादाची संकल्पना चैतन्यवादाच्या परस्परविरोधी किंवा टोकाची आहे. भौतिकतावादी निसर्गाच्या जड वास्तविकतेला महत्त्व देणारे आहे. आपल्या इंद्रियांच्या साह्याने आपण जगाचा

प्रत्यक्ष अनुभव घेऊन अनुमान लावू शकतो. जग हे मिथ्या म्हणजे खोटे किंवा लटके नाही, तर ते खरोखरच वास्तव पातळीवर अस्तित्वात आहे. निसर्ग हेच तत्त्व प्रधानतत्त्व आहे. या पलीकडे दुसरे पारलौकिक विश्व अस्तित्वात नाही. 'भौतिकवादाच्या दृष्टीने निसर्गच अनादी आणि अनंत असल्यामुळे सृष्टीच्या निर्मितीचा प्रश्नच येत नाही आणि पारलौकिकतेचा भाकड पसाराही येत नाही.'[६] त्यामुळे ईश्वर, स्वर्ग, पुनर्जन्म, मोक्ष, वेदप्रामाण्य, कर्मकांड या गोष्टी सत्याला धरून नाहीत किंवा सत्य पातळीवर सिद्ध करता येत नाहीत म्हणून जडवादी विचारप्रणाली या गोष्टींना नकार देते. या विधानामधून एक गोष्ट लक्षात येते की, चैतन्यवाद हा अंधश्रद्धा आणि कर्मकांडावर आधारलेला दिसतो, तर भौतिकतावाद हा प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेला असतो. वेदांनी सांगितलेली पारलौकिकता, संसारविन्मुखता, वैराग्य, नियतीवाद, कर्माचे तत्त्वज्ञान आणि दैववाद या गोष्टींना नाकारतो. त्यांनी पृथ्वी, पाणी, वायू आणि अग्नी या पंचतत्त्वांना महत्त्व दिले होते. त्यांनी आकाश हे तत्त्व नाकारले.

संत बसवेश्वरांच्या मानवमुक्ती चळवळीवर जडवादी किंवा भौतिकवादी या इहवादी विचारप्रणालीचा प्रभाव पडलेला दिसून येतो. संत बसवेश्वरांनी वयाच्या आठव्या वर्षीच मुंजबंध विधीला नकार देऊन आपल्या भौतिकतावादी विचारांची झलक दाखवून दिली होती. संत बसवेश्वरांनी केलेल्या क्रांतिकारक कार्यातून ते अत्यंत भौतिकवादी विचारांचे होते असे दिसून येते. वेदांनी 'आत्म' विचाराला महत्त्व दिले, तर बसवेश्वरांनी 'देह' विचाराला महत्त्व दिलेले आहे. त्यांचे पुढील वचन बघितले –

**'सधन बांधिती देवालय। देवा मी गरीब करू काय?**
**देहचि माझे मंदिर । पाय माझे देवळाचे खांब।**
**मस्तक माझे देवळाचा कळस।'**

म्हणजे आपणास कल्पना येते की, बसवेश्वर 'देवालयापेक्षा देहालय श्रेष्ठ' असल्याचे सांगतात. चैतन्यवाद्यांनी देहाला आत्म्याच्या तुलनेत अत्यंत कमी लेखले होते. देह हा पापयोनी, पापाची बाजारपेठ असल्याचे संगितले आहे. मात्र बसवेश्वरांनी देह हाच तुमच्या आत्मिक उन्नतीतील महत्त्वाचे साधन मानले आहे. पापयोनी समजल्या जाणाऱ्या स्त्रियांनाही मासिक धर्मातील विटाळ हा अपवित्र नसतो त्यामुळे त्या काळातील कोणताही विटाळ (पंचविटाळ) पाळावयाची गरज नाही. रजस्वला किंवा ऋतुमती अवस्था ही प्रजननासाठी आवश्यक असते, असा भौतिकवादी आणि विज्ञानवादी विचार त्यांनी मांडला.

जे प्रत्यक्षात अस्तित्वात आहे त्याच गोष्टी सत्य आहेत. अस्तित्वात नसलेल्या मिथ्या गोष्टींच्या प्राप्तीसाठी कुठलेही व्रतवैकल्ये, कर्मकांड करण्याची गरज नाही. स्वर्ग कल्पना, वेदप्रामाण्य, पुरोहितशाही, दैववाद ही सामान्य माणसांची पिळवणुकीची साधने संत बसवेश्वरांनी नाकारली. पुनर्जन्म ही कल्पनाच खोटी आहे. मागच्या जन्मीचे पाप पुढच्या जन्मात फेडावे लागते हे सगळे भ्रामक आहे. पुण्यसंचयन करण्यासाठी व्रतवैकल्य, कर्मकांड, उपवास, तीर्थयात्रा दान देण्याची गरज नाही. स्वर्गाचे आमिष आणि नरकाची भीती खरी नाही, तसेच मोक्ष कल्पनाही खोटीच आहे. पृथ्वीवरील(इह) जीवनच शाश्वत सत्य आहे.

**'देवलोक आणि मृत्यूलोक /**
**भिन्न नव्हे ते दोन्ही एक /**
**सत्य बोलणे देवलोक /**
**मिथ्या बोलणे मृत्यूलोक / धर्म हाच स्वर्ग /**
**अधर्म तोचि नरक / सदाचार हाच स्वर्ग /**
**अनाचार नरक / स्वर्ग इथे अन् इथेच नरक'**

असा इहवादी विचार मांडत असताना स्वर्ग आणि नरक अशा कल्पना येतात त्या केवळ प्रतिमात्मक स्वरूपात आहे. मात्र या वचनातील भावार्थ हा इहवादी आणि भौतिक स्वरूपाचा आहे. पृथ्वीवरचे भौतिक जग हेच वास्तव आहे. इथेच नरक आणि स्वर्ग सदाचार आणि अनाचाराच्या स्वरूपात उपलब्ध आहे. मृत्यू हा अंतिम मोक्ष होय. त्यानंतर काहीच सत्य नसते.

**'माझे जीवन जणू उंदीर /**
**थैलीच्या ढिगाऱ्यात लपविलेला /**
**मृत्यू शिवाय त्याला शांती नाही'**

अशी बसवेश्वर आपल्या तत्त्वज्ञानातून मांडणी करतात. लोकायतने

**'भुतात्मकं जगता /**
**स्वभावं जगतः कारण आहुः /**

**न परमेश्वर:अपि कश्चित /**
**न पुनर्जन्म:, न मोक्ष: /**
**मरणं एव मोक्ष:'**

असे म्हटले आहे. हाच विचार बसवेश्वरांच्या वरील वचन साहित्यात दिसतो.

संत बसवेश्वरांनी वेद, पुरोहित, यज्ञ, यज्ञात दिले जाणारे पशुबळी, कर्मसिद्धान्त, फलसिद्धान्त या सर्वांच्या कृतीचा भौतिकवादी अर्थ आणि अन्वयार्थ लावला.

**'वेदांच्या शास्त्रांना भाटांना /**
**मी थोर मानत नाही /**
**भ्रांतीच्या बुरख्याआड दडलेल्यांना /**
**मी थोर मानत नाही'**

असे सांगत असताना वैदिक संस्कृतीतील पशुबळीबद्दल तीव्र निषेधही नोंदवतात –

**'रड, ओरड /**
**हे बकरी, तू टाहो फोड /**
**म्हण की, वेद प्रामाण्याने /**
**तुला बळी दिले जात आहे /**
**धाय मोकलून रड त्यांच्यापुढे /**
**जे वेद पठण करतात'**

वेद व्यवस्थेला आणि वैदिक संस्कृतीला इहवादी चार्वाकवादी आणि लोकायतिक यांनी प्रखर विरोध नोंदवलेला दिसतो. 'आगाम धूर्त प्रणीत' शब्दात वेदांचा धूर्तपणा इहवादाने दाखवला आहे. 'त्रयो वेदस्य कर्तारोभंडधूर्तनिशाचरा' म्हणजे तिन्हीही वेदांचे कर्ते हे भोंदू, धूर्त आणि निशाचर आहेत.[७] संत बसवेश्वरांनी वेदांना आणि वैदिक व्यवस्थेला विरोध केलेला आहे. वेदांनी (वेदान्तांनी) समाजामध्ये चातुर्वर्ण्यव्यवस्था कुठल्याही शास्त्रीय आधाराविना कायम केली. या व्यवस्थेने व्यक्ती-व्यक्तींमध्ये वर्ग, वर्ण, धर्म, जात यांची विषवल्ली निर्माण केली. चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे यथायोग्य पालन केले तरच सर्वसामान्य माणसाला मोक्षफळ मिळू शकेल ही मांडणी न्याय्य नाही याची जाणीव बसवेश्वरांना असल्याने त्यांनी वैदिक धर्मव्यवस्था नाकारून सर्व जातिधर्मातील स्त्री-शूद्रांना 'लिंगायत' ही इहनिष्ठ उपासना पद्धत उपलब्ध करून दिली. आपल्या 'कायका'च्या आधारे कोणीही सर्वसामान्य माणूस आध्यात्मिक उन्नतीच्या सर्वोच्च पदावर पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली. 'जात, संप्रदाय अथवा लिंगविशिष्ट भेदभाव न करता बसवाने सर्वांना समान सामाजिक आणि धार्मिक संधी खुल्या केल्या हे त्याचे लक्षणीय योगदान होय.'[८]

वेदांनी निर्माण केलेल्या अंधश्रद्धा, कर्मकांड, पाप पुण्याच्या कल्पना, ग्रह ताऱ्यांचे मानवी जीवनावरील अनिष्ट परिणाम, मुहूर्त, शुभ-अशुभ, शकुन-अपशकुन या साऱ्या कल्पना अवास्तव असल्याचे सांगून कर्मकांडातील फोलपणाही संत बसवेश्वरांनी उलगडून दाखवला. इहजीवनात प्रत्येक दिवस, वेळ ही शुभच असते, त्यात शुभ-अशुभ असे काहीही नसते हे वैज्ञानिक सत्य मांडताना संत बसवेश्वर म्हणतात,

**'जेव्हा जेव्हा आपले अंत: करण कौल देईल /**
**ती शुभ वेळ आहे, हे खुशाल जाण /**
**सारे शकुन शुभ आहेत असे मान /**
**मीलनाची सुनिश्चिती आहे /**
**चंद्र तारे आहेत /**
**आणि हो, उद्यापेक्षा 'आज'**
**अधिक चांगला आहे /**
**जे सहजी फलप्रद होते /**
**कूडलसंगमाच्या उपासकांना, ते तुझेच /**
**माझ्या मुळी ध्यानातच येत नाही /**
**अमका दिवस आणि तमका आठवडा /**
**अमकी रास चांगली की वाईट! /**
**माझ्या दृष्टीने रात्र हा एक विभाग /**
**आणि दिवस हा दुसरा विभाग'**

या वाचनात भौतिकता, वैज्ञानिकता आणि आधुनिकतेचा वास्तव स्पर्श जाणवतो. 'संत बसवेश्वरांनी आपल्या मानवमुक्ती चळवळीत अंधश्रद्धा आणि भोळसट चालीरीतींचा, रूढींचा स्वीकार केला नाही. फल ज्योतिष, शकुन-अपशकुन, दिवस, आठवडे अथवा तारे यांचा प्रभाव यांसारख्या असंख्य अंधश्रद्धा लक्षावधी लोकांच्या मनात खोल रुतून बसल्या होत्या. कोणत्याही छोट्या छोट्या कारणासाठी प्रत्येक ठिकाणी दैवशक्तीवर, चमत्कारांवर विसंबून राहण्याची लोकांना सवय जडली होती. धर्मगुरूंचा, पुरोहितांचा दांभिकपणा, भ्रष्टाचार आणि लबाडी त्यांच्या भोळ्या मनाला कळत नव्हती. बसवाने या सगळ्यांचा निषेध केला'[९] संत बसवेश्वरांनी

अलौकिक जीवनाऐवजी लौकिक (इह) जीवनाला अधिक महत्त्व दिले आहे कारण,

**'मर्त्य जग ही केवळ टांकसाळ /**
**इथे मूल्यवान बनतात, ते तिथेही मूल्यवान'**

आहे. त्यामुळे संसारातून पळून न जाता, संन्यासत्व न स्वीकारता माणसाने संसारात म्हणजे लौकिक जगात राहिले पाहिजे. 'मानवी आयुष्यात अगदी या जन्मामध्येही शाश्वत सत्याचा साक्षात्कार होणे शक्य आहे. म्हणून हे मर्त्य जीवन पवित्र आणि मूल्यवान आहे. बसवण्णा म्हणतो 'हे मर्त्य जग म्हणजे निर्मिकाची टांकसाळ आहे. आपण सारे त्या टांकसाळीतील नाणी आहोत. जर एखादे नाणे इथे खोटे निघाले तर ते तिथेही खोटे ठरेल. जे आता इथे चांगल्या प्रकारे जगू वागू शकत नाहीत. त्यांना नंतर तरी काय प्राप्त होऊ शकणार आहे?' असा रोकडा प्रश्नही तो विचारतो.[१०]

**समतेचे तत्त्व –**

इहवादी विचारप्रणाली माणसा-माणसामध्ये भेद मानत नाही. सर्व स्त्री-पुरुष समान आहेत म्हणूनच संत बसवेश्वरांनी आपल्या संप्रदायात सर्व जातीधर्माच्या, वर्ण-वर्गाच्या स्त्री शूद्रादींना सामावून घेतले. भिन्न भिन्न व्यवसाय करीत असलेले शेकडो शरण सांप्रदायिक 'लिंगायत' पंथाच्या छत्रछायेत एकत्र येऊन गुण्या गोविंदाने नांदताना दिसली. त्यात मडिवाळ माचय्या (धोबी), नुलिया चंदय्या (वाख वळणारा), अंबिगरा चौडय्या (नावाडी), मेदरा केट्या (बुरूड), हाडपडा अप्पण्णा (न्हावी), तुरुगाही रामण्णा (गुराखी), संकद बेकण्णा (ढोलक), मादर धुळय्या (अतिशुद्र), तलवार कामिदेव (पहारेकरी), गाणद कण्णाप्पा (तेली), वैद्य संगण्णा (वैद्य), सूजिकायकद रामण्णा (शिंपी), बचिकायद बसावण्णा (सुतार), कांटण्णद रेम्माव्वे (भात कांडणारी)[११] अशी अठरापगड जातीतील माणसं होती. बसवेश्वरांच्या पंथात वेगवेगळ्या अठरा पगड जाती-वर्णाची माणसे तर होतीच; पण मनुस्मृतीने ज्यांना 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हती' म्हणून शतकांचा कोंडवाडा लादला होता अशा स्त्रियांनाही आपल्या पंथात सहभागी करून घेतले. वैदिक धर्म व्यवस्थेने स्त्रियांना पापयोनी, पापाची बाजारपेठ किंवा नरकाचे महाद्वार म्हणून हिणवले त्याच स्त्रियांबद्दल बसवेश्वरांनी 'स्त्री ही प्रत्यक्ष महादेवी आहे' असे गौरवोद्गार काढले. अनुभव मंडपाचे संचालनच 'अक्कमहादेवी, अक्कनागाई, लक्कमा, विरम्मा, लिंगम्मा, रायम्मा, मुक्ताक्का, निलम्मा, बौतादेवी, दानम्मा, संकव्वे, रेवाम्मा, महादेवी सत्यका, गुंडव्वा, आनलदेवी, निरलोचना' या सारख्या स्त्रियांनी केले. यांसारख्या अनेक स्त्रिया लिंगायत पंथाच्या सर्वोच स्थानी पोहोचल्या होत्या. जातिप्रमाणापेक्षा गुणकर्माला (कायक) अधिक महत्त्व दिले. याच न्यायाने त्याने 'सुळे सक्कव्वे, सुळे पदमलादेवी, सुळे चामलादेवी' अशा वेश्या व्यवसायातील स्त्रियांना व असंख्य चोर, लुटारू, डाकू व दरोडेखोर असणाऱ्या व्यक्तींनाही चळवळीचे मैलाचे दगड बनविले. स्त्रीशक्तीचा योग्य सन्मान झाला पाहिजे. म्हणून-

**'स्त्री जातीला हीन म्हणून हिणवू नका /**
**पुरुषी कसोट्याचा अडसर मी घालूनी /**
**सुगंधी कवच चढवून तिलक लावून /**
**हात सरसावून रणशिंग फुंकल्यावर /**
**बांधलेल्या निर्याग सुटल्या तर /**
**तुमची शपथ पहा चन्नमल्लिकार्जुन'**

यांसारख्या वचनातून स्त्रियांबद्दलचा उदार दृष्टिकोनही दिसून येतो. समाजामध्ये खरी सामाजिक समता प्रस्थापित करावयाची असेल, तर आंतरजातीय विवाह हा एक चांगला मार्ग आहे याची बसवेश्वरांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी बाराव्या शतकात पहिला आंतरजातीय विवाह घडवून आणला. हरळय्या चांमुलगा (चांभार) याचा मुलगा शिलवंत व मधुय्या (ब्राह्मण) याची मुलगी बनज्जा यांचा आंतरजातीय विवाह घडवून आणला. हा विवाह मध्ययुगीन कालखंडातील समता प्रस्थापित करण्याचा एक क्रांतिकारक निर्णय होता. वारकरी संप्रदायाने निर्माण केलेली समतेची आध्यात्मिक लोकशाही ही केवळ चंद्रभागेच्या वाळवंटापुरतीच सीमित राहिली. संत बसवेश्वरांच्या मानवमुक्ती चळवळीचे तसे झाले नाही. लौकिक जीवनातही ही आध्यात्मिक लोकशाही दिसून आली.

**कृषिसंस्कृती-श्रमसंस्कृती आणि कायक तत्त्व –**

संत बसवेश्वरांनी श्रमाची प्रतिष्ठा व अध्यात्म साधना यांचा अनोखा मेळ घालण्याचा अभिनव प्रयोग केला. ऐतखाऊपणाला, संन्यास वृत्तीला आणि भिक्षुक प्रवृत्तीला



कडकडून विरोध केला. त्यांच्या विचारात श्रमाला त्यातही शारीरिक श्रमाला त्यांनी आत्यंतिक महत्त्व दिले. मुळात बसवेश्वर स्वत: शेतकरी कुटुंबात जन्माला आले होते. त्यामुळे त्यांनी कृषिसंस्कृतीचा आपल्या कार्यात गौरवच केलेला दिसतो. कृषिसंस्कृती ही कष्टकऱ्यांची 'श्रमणसंस्कृती' होती. या संस्कृतीच्या अंतरंगात वेगवेगळ्या अनेक व्यावसायिकांचा समावेश होतो. त्यामुळे संत बसवेश्वर

**'कृषिकर्म हेच कायक /**
**पिकवितो धरणी तन-मन श्रमवूनी /**
**धनधान्य आणुनी दासोह करी'**

असा कृषिकर्माचा गौरव केलेला आहे. श्रमाची पूजा हीच शिवाची पूजा आहे असा मानवकल्याणवादी महान संदेशच त्यांनी आपल्या 'कायक'च्या संकल्पनेतून दिला आहे. श्रम हेच अधिष्ठान असलेली कायक संकल्पना म्हणजे मानवी विकासाचा अद्‌भुत जाहीरनामा होता. 'कायक' म्हणजे प्रामाणिक शरीरश्रम होय; पण हे शरीर श्रम केवळ उपजीविकेसाठी नसून मानवाच्या आत्मिक उन्नतीसाठी करावयाचे, असा व्यापक अर्थ त्याला लाभलेला आहे. कोणताही व्यवसाय हा श्रेष्ठ वा कनिष्ठ प्रतीचा नसतो, तर कोणताही व्यवसाय हा सारखाच असून प्रामाणिकपणाने श्रम करणे हीच खरी ईश्वरभक्ती आहे. परमेश्वराच्या भक्तीसाठी कुठल्याही व्रतवैकल्ये, कर्मकांडाची आवश्यकता नसून प्रामाणिकपणे केलेले 'श्रमनिष्ठ कायक' हाच भक्तीचा सोपा मार्ग आहे. श्रम हीच ईश्वर सेवा असा भौतिकवादी संदेश संत बसवेश्वरांच्या या कृतीतून व्यक्त होतो. त्यांनी 'सामाजिक गरजांच्या पूर्तीसाठी प्रत्येकाने थोडे फार तरी काम केले पाहिजे. भक्त असो, गुरू असो किंवा जंगम असो. कोणालाही इतरांच्या श्रमावर आळशीपणाने बांडगुळासारखे जगण्याचा अधिकार नाही. प्रत्येकाने आपल्या कायकाद्वारे भौतिक आणि आध्यात्मिक उन्नती करून घ्यावी आणि भिक्षावृत्ती व आळस याला समाजात थारा नसावा हे यातील अनुस्यूत तत्त्व आहे.'[११] हे संत बसवेश्वरांनी आपल्या 'कायक सिद्धान्तातून दाखवून दिले. इहवादी विचारसरणी ही पारलौकिक जीवनातील सुखफलापेक्षा ऐहिक जीवनातील सुखाला अधिक महत्त्व देणारी आहे. अखंड श्रम करून आपली ऐहिक सुखे प्राप्त करून घ्यावी. वेळप्रसंगी 'ऋणं कृत्वा घृतम् पीबेत'ची वेळ आली तरी चालेल.

मुळात निसर्गाचे प्रतीकात्म स्वरूप धारण करणाऱ्या व इष्टलिंगाला श्रम करून आलेल्या घामाने हृदयावरील इष्टलिंग भिजला तर तो सर्व नद्यांच्या जलाशयापेक्षा श्रेष्ठ अभिषेक आहे, असे बसवेश्वर मानत असत.

**'हातात झाडू ,डोक्यावर चुंबळ /**
**मी कष्टकरी घरगड्याचा मुलगा /**
**हे कूडलसंगमदेवा /**
**वारशाने ईश्वरी कृपा लाभलेला /**
**मी दासीपुत्र'**

म्हणवून घेण्यात अभिमान वाटत असल्याचे सांगतो.

**'या दोन्ही हातांनी परिश्रम तू करी /**
**मिळेल भाकरी सर्वलागी /**
**मोलिगे मारय्या राजा असुनि थोर /**
**श्रम भरपूर केले त्याने,**
**कुडलसंगमदेवा कायक जो करील /**
**तयाला तारील देव माझा'**

मानव कल्याणाचा एवढा साधा सोपा उपाय या अगोदर कुण्या धर्माने वा धर्मप्रेषिताने सांगितलेला दिसत नाही. कष्टकरी श्रमिक माणसाबद्दल संत बसवेश्वरांच्या प्रति आदराची आणि आपुलकीची भावना होती. कायक

संकल्पनेत बसवेश्वरांनी अपरिनिग्रहाच्या तत्त्वांना सर्वाधिक महत्त्वाचे मानलेले दिसते. त्यांच्या कायकाची संकल्पना अपरिग्रहाच्या तत्त्वावरच उभी होती. गरजेपेक्षा अधिक कायक करून निर्माण केलेला अतिरिक्त धन संचयन हा चोरीच्या मार्गाने आला आहे असे बसवेश्वर मानत असे. परमेश्वर आणि सर्वसामान्य उपासक व्यक्ती याच्या भक्तिमार्गात कुठल्याही मध्यस्थाची गरज नाही आपले प्रामाणिकपणाने केले कार्य (कायक) हेच भक्तीसाठी पुरेसे आहे. या अर्थाने त्याने 'कायकवेकैलास' हा जगण्याचा मूलमंत्र सांगितला आहे. कायक संकल्पनेच्याद्वारे संत बसवेश्वरांना 'व्यवसायावरून व्यक्तीची सामाजिक प्रतिष्ठा ठरविणारी प्रचलित रीत त्याला बदलावयाची होती. कोणताही व्यवसाय श्रेष्ठ अथवा कनिष्ठ प्रतीचा नसतो. प्रामाणिक आणि सच्चेपणावरून उपजीविकेच्या साधनाचे मूल्य ठरत असते, त्यालाच 'कायक' म्हणतात.[१३] या कायक क्रियेतून पवित्र झालेल्या श्रमिकांच्या झोपडीला कैलास मानण्याची ही कल्पना इहवादी स्वरूपाचीच आहे. संत बसवेश्वर आपल्या पुढील वचनात

**'ज्याने आपल्या घामाने**
**ही काळी माती भिजवली /**
**कष्ट उपसलेत पोटासाठी आयुष्यभर /**
**अखंड श्रमाने ज्याने आपला देह राबविला /**
**कष्ट उपसले पोटासाठी एक दिलाने /**
**ज्याने आपले तन, मन श्रमपूर्वक झिजविले /**
**श्रमाची पूजा करून ज्याने शिवाची पूजा केली /**
**श्रमिकांच्या झोपडीला जो कैलास मानतो /**
**ज्याची वाणी तशी करणी हे कूडलसंगमदेवा /**
**तोच जगतगुरु झाला'**

श्रमनिष्ठेला दिलेले महत्त्व अधोरेखित केले पाहिजे. श्रमाचा गौरव व्हावा म्हणून हरळय्याने बनवलेला चपलेचा जोडा डोक्यावर घेतला ही बसवेश्वरांची कृती निश्चितच खूप काही सांगून जाणारी आहे. श्रमाची पूजा बांधून श्रम हेच तुमच्या मोक्षाचे साधन आहे, असा मानवी कल्याणाचा सुलभ मार्ग सांगणारे जगाच्या इतिहासातील संत बसवेश्वर हे पहिले समाजसुधारक ठरतात.

**विद्रोह आणि नकार–**

संत बसवेश्वरांनी इष्टलिंग साधनेला महत्त्व देणारी 'लिंगायत' ही आधुनिक इहवादी उपासना पद्धत सर्व सामान्यांना देऊन प्रस्थापित वैदिक परंपरेविरुद्ध विद्रोहाचे शस्त्र उगारले. वयाच्या आठव्या वर्षीच मुंजबंध विधीला नकार देऊन ब्राह्मणी वेद-प्रामाण्यवादी संस्कृतीला नकार दिला ही गोष्ट जगाच्या इतिहासातील अत्यंत क्रांतिकारी गोष्ट आहे. 'कायकवे कैलास'चा मूलमंत्र देऊन वेदांनी निर्माण केलेली चार वर्णांची विभागणी नाकारली. वेद, पुरोहित, स्वर्ग, नरक, पाप, पुण्य या कल्पनांना नकार देऊन इहविचारांना महत्त्व दिले. काल्पनिक जगापेक्षा भौतिक सृष्टीची वास्तविकता आपल्या वचन साहित्यातून उलगडून दाखवली. वेद परंपरा ही धूर्त, लबाड आणि दांभिक आहे. ती केवळ शाब्दिक काथ्याकूट करून वास्तव जगाला मिथ्या बनवते व मिथ्या जगाला वास्तवात आणण्याचा प्रयत्न करते. असा प्रयत्न करत असताना ती सत्यान्वेषी भूमिकेपासून पळ काढते. त्यांच्या या पलायनवादी भूमिकेवर इहवादी, लोकायतांनी रोखठोक भूमिका घेतलेली दिसते. 'प्रत्यक्षं एव प्रमाण' याबाबत वेदांची आणि वैदिकांची भूमिका नेहमीच दांभिकतेचीच राहिली आहे. या दांभिक प्रवृत्तीबद्दल विद्रोहाची भाषा संत बसवेश्वर बोलताना दिसतात. वेदाच्या शास्त्रांना आणि भाटांना मी थोर मानत नाही कारण 'प्रत्यक्षं एव प्रमाण'ला ते घाबरता व कपोलकल्पित भयकथांच्या आधारे सर्वसामान्य लोकांचे शोषण व पिळवणूक करतात. म्हणून संत बसवेश्वर

**'वेदांवर खड्ग प्रहार करेन /**
**शास्त्राला बेड्या लावीन /**
**तर्कशास्त्राच्या पाठीवर आसूड ओढेन /**
**आगमशास्त्राचे नाक कापेन'**

अशी विद्रोहाची आणि नकाराची भूमिका घेतात. कारण या वैदिकांचे सांगणे वेगळे आणि वागणे आगळे आहे. जगण्यातील दांभिकपणा त्यांना मान्य नव्हता.

**'वडा पिंपळा गुंफुनी दोरा परिक्रमा करीशी /**
**परि न तू कर्म मुक्त होशी /**
**मंत्र तंत्र दंभा चाराशी व्यर्थ बळी पडशी /**
**कूडलसंगमदेवा मान्य न होशी /**
**सांगणे आगळे, वागणे आगळे /**
**शास्त्रात न कळे विप्र कैसे'**

यांसारख्या वचनाद्वारे त्यांनी वैदिक संस्कृती

रक्षकांसमोर काही प्रश्न उभे करून वैदिकांनी निर्माण केलेल्या सांस्कृतिक विचारांना आव्हान दिले आहे. कुचकामी, नकोशी, शोषण विचारव्यवस्था नाकारून मानव्य जपणारी समताप्रतिपादक नवी विचार व्यवस्थाही निर्माण केली. बसवेश्वर केवळ बोलके विचारवंत नव्हते तर ते कृतिवीर होते. बसवेश्वरांनी विषमतामूलक वैदिक संस्कृती, देव, मंदिर, धर्म यांना नकार देऊन 'मडके देव, सूप देव, रस्त्याचा दगडदेव' असणाऱ्या बीरय्या, केटय्या, मारी, मसणी यांसारख्या शेकडो देवदेवतांना नकार दिला व एकेश्वराचा स्वीकार केला. सर्व मानव प्राणी समान आहे त्यांच्यात वर्ण, वर्ग, जात, धर्म यांच्या आधारावर भेदभाव करता येणार नाही, अशी समतावादी भूमिका संत बसवेश्वरांनी घेतलेली दिसते. वैदिकांनी निर्माण केलेल्या भ्रामक रूढी-परंपरेला विरोध करून सत्यशोधनाला महत्त्व दिले.

**आध्यात्मिक लोकशाही व अनुभव मंटप-**

संत बसवेश्वरांनी वास्तव जीवनात भेदभावविरहित आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली. संत बसवेश्वरांच्या मानवमुक्ती चळवळीत वेगळे व्यवसाय, जात, धर्म असणाऱ्या वेगवेगळ्या स्तरांतील व्यक्ती सहभागी झाल्या होत्या. त्यात गरीब, श्रीमंत, स्त्री-पुरुष, वेश्या, चोर, लुटारू, शूद्रादी समाजगटातील लोक सहभागी झाले होते. केवळ इष्टलिंग धारण करून कायकाच्या आधारे भक्तितत्त्व मान्य करणाऱ्या अनेक व्यक्ती संत बसवेश्वरांच्या मानवमुक्ती चळवळीत एकत्र आल्या होत्या. ही एका अर्थाने आध्यात्मिक लोकशाहीच होती. वारकरी संप्रदायाने निर्माण केलेली चंद्रभागेकाठची आध्यात्मिक लोकशाही बसवेश्वरांनी 'श्रमगंगेच्या' काठावर नेऊन ठेवली.

संत बसवेश्वरांनी सुरू केलेल्या चळवळीत कोणताही भेदभाव नव्हता. सर्वांना आत्मविकासाचा सहज सोपा मार्ग उपलब्ध व्हावा यासाठी चळवळीला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी 'अनुभव मंटपाची' स्थापना केली. अनुभव मंटप ही जगातली पहिली धार्मिक संसद होती. अनुभव मंटप हे लिंगायत संप्रदायाचे प्रार्थनास्थळ होते, त्यापेक्षाही ते विचारपीठ होते. इथे प्रार्थनेऐवजी अनुभवांना प्रमाण मानले जात असे. बुद्धीला पटेल ते चिंतन मांडण्याची सर्व स्त्री-पुरुषांना मुभा होती. या अनुभव मंटपाने लोकशाही व्यवस्थेतील संसदेचे प्रारूप धरण केले होते. अनेक जातीपातींतील माणसे आपली जात विसरून या अनुभव मंटपाच्या ज्ञानछताखाली एकत्र येत. या अनुभव मंटपात चूल-मूल या विश्वापलीकडे जाऊन स्त्रिया धार्मिक, आर्थिक, राजकीय विषयावर विचारमंथन करत असत. लिंगायत पंथात पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही इष्टलिंग धारण करण्याचा अधिकार होता. या अनुभव मंटपात ७७० स्त्री-पुरुष सहभागी होते. त्यात ७० स्त्रिया 'शरणी' म्हणून अधिकार पदावर पोहोचल्या होत्या. लिंगायत पंथातील स्त्री पुरुषांना लिंगदीक्षा देऊन गळ्यात शिवलिंग धारण केले की पुरुषांना शरण आणि स्त्रियांना शरणी या नामविधानाने ओळखले जाई. अनुभव मंटपातील या ७७० शरण-शरणीं बरोबरच अनेक लोक अनुभव मंटपातील तत्त्वज्ञानाचे प्रसार-प्रचाराचे काम करत होते. अनुभव मंटपाचे कामकाज लोकशाही पद्धतीने चाले. इथे सर्वांच्या विचारांना महत्त्व असे. सर्वांना शंका, प्रश्न विचारण्याचा व चर्चेमध्ये सहभागी होऊन उत्तरे सांगण्याचा अधिकार होता. स्वत: बसवेश्वर सर्वसामान्य माणसाच्या मांडीला मांडी लावून या अनुभव मंटपातील विचारमंथनात सहभागी होत असत. बसवेश्वर या अनुभव मंटपाचे कधीच अध्यक्ष झाले नाहीत. त्यांच्यापेक्षा वयाने लहान असणाऱ्या व्यक्ती अध्यक्ष झालेल्या दिसतात. अनुभव मंटपात एक विषय चर्चेला घेतला जाई व त्यावर सर्वांची मते विचारात घेऊन साधक बाधक चर्चा होत असे. त्या विषयासंबंधी झालेल्या चर्चेतून जे वैचारिक मंथन बाहेर पडे त्याचे रूपांतर वचन साहित्यात होते. नंतर शांतरस ते वचन ताडपत्रावर लिहून घेत असे. अशी एक लाख शहाण्णव हजार वचन साहित्याची निर्मिती या अनुभव मंटपातील चर्चेतून बाहेर पडली आहे. हे सगळे वचन साहित्य काल्पनिक नसून, कुण्या प्रेषिताने लिहिलेले नाही, किंवा अपौरुषेयसुद्धा नसून अनुभवाधिष्ठित स्वरूपाचे आहे.

संत बसवेश्वरांच्या चळवळीत आणि अनुभव मंटपात आलेल्या सर्वांची पूर्वाश्रमीची जात नष्ट होऊन फक्त लिंगधारी एवढीच ओळख शिल्लक राही. या सर्वांमध्ये रोटी बेटी व्यवहारही केले जात. अनुभव मंटप नावाची चळवळ प्रथम बसवेश्वरांच्या वाड्यात सुरू झाली. नंतर बसवकल्याण येथे मोठ्या स्वरूपात सुरू झाली. अनुभव मंटपात विषमतेला, अस्पृश्यतेला स्थान नव्हते. हरळय्या

आणि बसवेश्वर यांची आध्यात्मिक प्रगती सारखी असल्याने त्यांच्यात कोणत्याही स्वरूपाचा भेद उरत नाही.

**समारोप–**

संत बसवेश्वरांची बाराव्या शतकातील मानवमुक्तीची चळवळ निश्चितच प्रस्थापित वैदिक व्यवस्थेच्या विरोधातली एक क्रांतिकारक प्रतिक्रिया होती. वेद–प्रामाण्यांनी व मनूवादी विषमतामूलक विचारप्रणालीने वर्णव्यवस्था निर्माण करून समाजाची विभागणी चातुर्वर्ण्य व्यवस्थेत केली. या सांस्कृतिक भेदभावाबद्दल इहवादी मीमांसकांनी या विरोधात जोरकस प्रतिक्रिया नोंदवली. 'धर्माच्या नावाखाली समाजात जी 'बुवाबाजी' बोकाळलेली असते तिच्याबद्दल चीड लोकायत दर्शनात अत्यंत कडवटपणाने काठोकाठ भरलेली आहे. लोकायतिकांनी भट–भिक्षुक–ब्राह्मण आणि वेदांचे जनक यांच्यावर लुच्चे, फसवे, भोंदू, पौरुषहीन, कुचकामी म्हणून जेवढ्या निर्दयतेने हल्ला केला आहे तितका दुसऱ्या कोणत्याही भौतिकवाद्यांनी केलेला नाही'[१४] हे एस.जी.सरदेसाई यांचे विधान लक्षात घेण्यासारखे आहे. मात्र इहवादी विचार हे केवळ तत्त्वज्ञानापुरते मर्यादित राहिले. त्यांनी व्यावहारिक जगण्यात मानवमुक्तीची, अस्पृश्यता निवारण्याची चळवळ किंवा कृती केलेली दिसत नाही. संत बसवेश्वरांनी इहवादी विचारसरणी प्रत्यक्ष जीवनव्यवहारात वापरली. गौतम बुद्धांनी वर्ण व्यवस्थे विरोधात प्रत्यक्ष जीवनात काम केले. मात्र जातीव्यवस्थेचा प्रश्न संत बसवेश्वरांनीच प्रथम सोडविण्याचा क्रांतिकारी प्रयत्न केला म्हणून संत बसवेश्वर हे 'जातिअंत चळवळीचे नायक' ठरतात. वीरशैव संप्रदाय ह्या कर्नाटकातील सर्वांत जुन्या संप्रदायाला आधुनिकतावादी संप्रदायाच्या स्वरूपात 'लिंगायत' या नावाने समाजापुढे आणण्याचे ऐतिहासिक कार्य संत बसवेश्वरांनी केले. पुढे वैदिक संस्कृतीच्या रखवालदारांनी हिंसात्मक विरोध केल्याने मानवमुक्तीच्या चळवळीला अवरोध निर्माण झाला. मात्र बसवेश्वरांनी समाजाला दिलेला मानव कल्याणाचा बीजमंत्र नष्ट झाला नाही. नव्हे तो नष्ट होणारच नाही कारण तो शाश्वत आणि चिरंतन असा विश्वव्यापक विचार आहे.

**संदर्भसूची–**

१. मेघश्याम पुंडलिक रेगे, इहवाद आणि सर्व धर्मसमभाव, सर्वधर्म अध्ययन केंद्र, प्रज्ञा पाठशाला मंडळ, वाई, प्र.आ., ऑगस्ट १९९६, उपोद्‌घात १.
२. तत्रैव, पृ.६
३. महाराष्ट्र टाइम्स, ७ एप्रिल २०१७ चा अंक, संगणकीय स्रोत– https://maharashtratimes.com/astro/mazaadhyatma/spiritual/spirituality/articleshow/58051019cms.
४. एस.जी.सरदेसाई, भारतीय तत्त्वज्ञान– वैचारिक आणि सामाजिक संघर्ष, लोकवाङ्मय गृह प्रा. लि., मुंबई, द्वि. आ. मार्च १९७८, पृ.३०
५. तत्रैव, पृ. ३१
६. तत्रैव, पृ. ३२
७. तत्रैव, पृ. ७४
८. एच. तिप्पेरुद्र स्वामी, (अनु. रोहिणी तुकदेव), भारतीय साहित्याचे निर्माते बसवेश्वर, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्र. आ. २००३, पृ. २६
९. तत्रैव, पृ. ३०
१०. तत्रैव, पृ. २१
११. एच. तिप्पेरुद्र स्वामी, (अनु. रोहिणी तुकदेव), भारतीय साहित्याचे निर्माते बसवेश्वर, उनि. पृ. ३६
१२. तत्रैव, पृ. ३९
१३. तत्रैव, पृ. २५
१४. एस.जी.सरदेसाई, भारतीय तत्त्वज्ञान– वैचारिक आणि सामाजिक संघर्ष, उनि. पृ. १०५

---

**प्रा. डॉ. कैलास देवराम सलादे**
सहायक प्राध्यापक, मविप्र समाजाचे, कर्मवीर रावसाहेब थोरात,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वणी,
ता. दिंडोरी, जि. नाशिक
संपर्क– ९९२१५२८४२१ kailas.salade@gmail.com

■■

टीप : या लेखातील संत बसवेश्वरांची अनुवादित कवने 'भारतीय साहित्याचे निर्माते बसवेश्वर', एच. तिप्पेरुद्र स्वामी, (अनु. रोहिणी तुकदेव), साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्र. आ. २००३' या ग्रंथातून घेतलेली आहे.

### जन्मशताब्दी विशेष



© शेखर गोडबोले

# सुनीताबाई तोलामोलाचं जगणं


**वंदना बोकील-कुलकर्णी**


वय होतं कविता करण्याचं. भारावून जाण्याचं. पुण्यात तेव्हा उत्तम साहित्यिक कार्यक्रम होत असत. सायकल घेऊन निघायचं आणि तिथे रमून जायचं, हा संध्याकाळचा परिपाठ. अशीच एक संध्याकाळ. मराठा चेम्बर्स ऑफ कॉमर्सचं पद्मजी सभागृह. पूर्ण भरलेलं. खिडक्यांतही लोक बसलेले. मंचावर साधी पण नेटकी बैठक. तांब्या-भांडे ठेवलेले. वातावरणात उत्सुकता भरून, आणि ते दोघं आले. बसले. प्रेक्षकांना दोघांनी नमस्कार केला आणि बोरकरांच्या कविता वाचन-गायन असा चिंब ओला अनुभव सभागृहात भरून आला. पुलंचं गायन आणि सुनीताबाईंचं वाचन! कोण अधिक प्रभावी, असा प्रश्नच उरू नये, इतके दोघे कवितामय झालेले. नंतर मग मर्ढेकरांच्या कविता वाचनाचा कार्यक्रम ऐकला, 'अभ्रांच्या ये कुंद अफूने' ही कविता ऐकली आणि सुनीताबाई ही व्यक्ती वेगळेपणानं मनात ठसली. त्यांना कविता म्हणताना बघत राहावं. एरवी बाईंचा आवाज जरा जाड. काहीसा करकरीत; पण कविता वाचताना तो असा काही भिडे...कारण त्या कविता स्वतःची करून म्हणत. त्यात कुठे सादरीकरणाचा आव-भाव नसे.

लखलखीत गोऱ्या, रेखीव चेहऱ्याच्या आणि दबदबा वाटावा, पटकन जवळीक नाहीच निर्माण होणार अशा वाटणाऱ्या सुनीताबाई फार आवडल्या. आदरयुक्त आवड. जाऊन बोलावं, त्यांच्याशी जवळीक असावी, असं वाटायचं; पण ते तितकंच. जाऊन काय बोलायचं... 'तुम्ही खूप सुंदर वाचता कविता'..असं सांगणं तेव्हा बालिशपणा वाटला. नंतर एकदा मैत्रीण डॉ. मंजिरी परांजपेकडे बाबा आमटे आले असताना त्यांना भेटायला पु.ल. आणि त्या आल्या होत्या. दुरूनच पाहिलं. जवळ जाऊन बोलायची प्राज्ञा झाली नाही. मंजिरीला सांगून ओळख करून घेणं अवघड नव्हतं; पण नाही वाटलं तसं करावंसं. मग अधूनमधून त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांना दिलेल्या भरघोस देणग्यांच्या बातम्या वाचनात येत गेल्या, तसा आदर दुणावला. मग आलं त्यांचं 'आहे मनोहर तरी' हे आत्मचरित्र. वाचताना अनेक वेळा जीव गलबलून आला, आणि त्यांचं व्यक्तिमत्त्व काहीसं उमजलं. प्रखर बुद्धिमत्ता, तर्कनिष्ठ विचारपद्धती, तीव्र संवेदनशीलता असलेल्या या स्त्रीनं

तिच्या या गद्य लेखनातूनदेखील कवितेसारखा अनुभव दिला. आशयाचे असंख्य अलवार पदर गुंफत झालेलं ते लेखन. बाई काळाच्या किती पुढे होत्या...याचं मूर्तिमंत शब्दरूप.

पराकोटीची तत्त्वनिष्ठा, परिपूर्णतेचा ध्यास, त्यासाठी कष्ट घेण्याची असामान्य ताकद, श्रमावर अढळ श्रद्धा असे फार दुर्मीळ गुण एकवटलेली व्यक्ती या लेखनातून उमजली.

पुलंसारख्या असामान्य लेखक-कलाकाराची पत्नी असून स्वतःचं स्वतंत्र अस्तित्व जपून त्या आयुष्यभर पुलंची पाठराखण करत राहिल्या, हे त्यांच्या जगण्याचं वेगळेपण. त्यांच्या जगण्याला हे एक सतत व्यापक अस्तर होतं. अरुणा ढेरे यांनी लिहिलं आहे, सगळं काही करू शकणाऱ्या भाईंना निवडक आणि नेमकं काही करायला लावणं हे सुनीताबाईंनी आपलं काम मानलं आणि भाईंच्या गुणांच्या पारड्यात त्यांचं ते तुळशीपत्र पडलं. आपल्या जवळच्या गुण संपदेसकट कलेच्या दुनियेत अनायास रममाण होणारे भाई आणि भाईंनी काय करायला हवं याची दक्ष जाणीव ठेवून त्यांच्या जोडीनं उभ्या राहिलेल्या पापणी जागी असणाऱ्या सुनीताबाई हे दृश्य मराठी वाङ्मय विश्वात तसं अपूर्वच म्हणायला हवं. (ऐसे कठीण कोवळेपणे, सुनीताबाई, लेखिका : मंगला गोडबोले )

रत्नागिरीच्या सुप्रसिद्ध सदानंद महादेव ठाकूर वकिलांची ही कन्या. सरलादेवी हे त्यांच्या आईचं नाव. स्पष्टवक्तेपणा आईकडून तर निवृत्ती, निर्मोह हे गुण आपल्यात वडिलांकडून आले, असं त्या म्हणत. लहानपणी तब्येतीनं त्या काहीशा नाजूक होत्या. मोठ्या एकत्र कुटुंबात त्यांच्याकडे नीट लक्ष देता येणार नाही म्हणून त्यांना धामापूरला त्यांच्या चुलत आजीकडे काही काळ ठेवलं होतं. तो काळ त्यांच्या स्वतःच्या आयुष्यातला फार संस्मरणीय काळ होता. मॅट्रिकला उत्तम गुण मिळाल्यावर पुढचं शिक्षण घ्यायला त्या मुंबईला गेल्या; पण त्याच वेळी गांधीजींनी 'चले जाव' चळवळ सुरू केली. सुनीताबाईंनी स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली. आण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्या संपर्कात त्या आल्या. त्यांचा सहवास, मार्गदर्शन यांमुळे बाईंची वैचारिक बैठक, जगण्याची दिशा बरीचशी ठरली. गुप्त पत्रकं योग्य ठिकाणी सुरक्षितपणे पोहोचवण्यापासून बॉम्ब बनवण्यापर्यंत जोखमीची अनेक कामं त्यांनी केली. आण्णासाहेबांनी स्वतः विणलेली खादी सुनीताबाईंना दिली तेव्हा दागिने, कपडे यांच्या मोहातून त्या सुटल्या ते अखेरपर्यंत. चळवळीत सहभाग घेतल्यामुळे सुनीताबाईंचं जग एकदम व्यापक झालं. आपण एकट्या राहू शकतो, हा आत्मविश्वास मिळाला. साधेपणानं जगण्याचं महत्त्व पटलं. अनेक माणसं, विविध विचारसरणी यांचा परिचय झाला. १९४५ साली चळवळ थंडावली; पण शिक्षण मात्र मागं पडलं. चळवळीत भाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना माफीपत्र दिलं तर पुन्हा महाविद्यालयात प्रवेश मिळणार होता. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्याची माफी कसली? ते तर प्रत्येक भारतीय माणसाचं कर्तव्य आहे, म्हणून सुनीताबाईंनी ते नाकारलं, आणि पुढे स्वतंत्र भारतात स्वातंत्र्य सैनिकांना मिळणारं निवृत्ती वेतनही त्यांनी घेतलं नाही. पुढे नागपूर विद्यापीठाचा पत्राद्वारे अभ्यासक्रम पूर्ण करून त्यांनी पदवीही मिळवली.

घर आणि शिक्षण दोन्ही सुटल्यावर चरितार्थासाठी माटुंग्याच्या 'ओरिएंट हायस्कूल'मध्ये मुख्यतः इंग्रजी विषय शिकवण्यासाठी त्या रुजू झाल्या. याच शाळेत पु. ल. देखील शिक्षक म्हणून नोकरी करत होते. शाळेच्या वार्षिक उत्सवात 'सत्तेचे गुलाम' हे नाटक झालं. दोघांनी त्यात भूमिका केल्या होत्या. हळूहळू दोघांत भावबंध जुळून आले आणि त्यांनी लग्नाचा निर्णय घेतला. इथेही बाईंचं वेगळेपण उठून दिसतं. 'आहे मनोहर तरी' या आपल्या आत्मपर पुस्तकात त्यांनी हा सगळा प्रसंग सविस्तर लिहिला आहे. अत्यंत साधेपणानं त्यांचं लग्न झालं. त्यांच्या संपूर्ण लग्नात रोख रकमेची उलाढाल झाली ती म्हणजे आठ आणे! नोंदणी अर्जाची किंमत.

शंभर वर्षांपूर्वी रत्नागिरीत जन्मलेली ही स्त्री

काळाच्या किती पुढे होती! कोणतीच कृत्रिम बंधनं पाळणाऱ्या सोडा, मानणाऱ्यादेखील नव्हत्या त्या. पुलंसारख्या नवऱ्याबरोबर राहूनही त्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वावर कोणतेही दबाव, दडपणं येऊ दिली नाहीत. आपलं वाचन, आपली समज, आपलं चिंतन यांसह स्वतंत्र अशी समांतर वाटचाल त्या करत राहिल्या. आजही हे सोपं नाही. त्या काळात किती कठीण गेलं असणार हे. पारखून, चिंतन करून आपलेसे केलेले विचार आणि त्यांच्याशी असणारी निष्ठा अशी पदरातल्या दिव्यासारखी जपणं येराचे काम नव्हे. त्यांनी पुलंचा साहित्यिक संसार तर नेटका केलाच; पण अत्यंत दक्षतेनं केला. पुलंच्या निर्मिती हक्कांसंबंधी त्यांनी सखोल माहिती घेतली, आणि रॉयल्टी हक्कासाठी नोटिसा बजावायला कमी केलं नाही. नानी पालखीवाला यांच्यासारख्या कायदे पंडितानं त्यांना विचारावं की, 'हु वॉज युवर लॉ टीचर?' प्रत्यक्ष भाऊसाहेब हिऱ्यांनी त्यांना मालेगाव प्रकल्पावर रुजू होण्याविषयी पुनःपुन्हा विनवावं, त्यांचा अभिनय पाहून बाबुराव पेंढारकरांनी त्यांचा चरणस्पर्श करावा आणि पुलंनी 'सुनीता'ला न रुचलेलं लेखन चक्क फाडून टाकावं... अशा योग्यतेच्या होत्या त्या.

अंतरातला खोल एकटेपणा डिग्नीटीनं सांभाळत, कवितेचं बोट धरून त्यांनी सारा प्रवास केला. अनेक भाषांतील पुस्तकांचं अद्ययावत वाचन होतं. सुरुवातीला त्या शिक्षिका असताना त्यांचा विषय इंग्रजी. पुढे इंग्रजी वाचनाचा त्यांचा व्यासंग सखोल होत गेला. पु.ल. 'ओल्ड मॅन अँड द सी' चं भाषांतर करत असताना एकेका शब्दाबद्दल त्या अत्यंत जागरूक असत, अशा आठवणी संबंधित मंडळींनी सांगितल्या आहेत.

त्यांची कलाजाणीव अतिशय सजग होती. पुलंचे मंचीय कार्यक्रम असोत, काव्यवाचनाचे कार्यक्रम असोत की स्वतःचे कार्यक्रम असोत.. त्या सम्यक विचार करत. चोख तयारी करत आणि प्रयोग परिपूर्ण होण्यासाठी दक्ष असत.

भाई गेल्यानंतर त्यांच्या अखेरच्या काळात त्यांच्या काव्यवाचनाचा 'काव्यांजली' कार्यक्रम नॅशनल फिल्म अर्काइव्हमध्ये आयोजित केला होता. या कार्यक्रमाची ध्वनिचित्रफीत होणार होती. या प्रयोगाला उपस्थित राहण्याचं भाग्य माझ्या वाट्याला आलं. मनात खूप पूर्वी त्यांनी केलेले कविता वाचनाचे कार्यक्रम होते. त्यामुळे उत्सुकता होती. साध्या जांभळ्या रंगाच्या फुलांच्या शुभ्र साडीत, मऊ चंदेरी केसांचा पोनी बांधलेल्या सुनीताबाई एकट्याच कविता म्हणत होत्या. इतक्या वर्षांनंतर झालेल्या या प्रयोगातही बाईंचं स्मरण, सादरीकरण, उत्कटता यांची मात्रा तीच होती. सर्व कविता त्यांना तोंडपाठ होत्या. तरी त्या लिहिलेले कागद हाताशी होते. खडीसाखर, पाणी सारा सरंजाम समोरच्या टीपॉयवर होता, आणि बाईंचं कविता वाचन, कवींच्या आठवणी... 'आताशा मी नसतेच इथे' ही पद्मा गोळे यांची कविता त्या म्हणत असताना, ऐकताना नकळत डोळे पाणावले. त्यांचे पैलतीरी लागलेले नेत्र जाणवून गलबलून आलं. माधव आचवल, जी. ए. आणि भाई हे सारे गेल्यावर तर या ओळींचा अर्थ अधिकच खोलवर भिडला.

नंतर ती सीडी पाहिल्यावर त्यांना फोन केला. कौतुक स्वीकारतानाही त्यांनी काळजीयुक्त विचारलं, 'हे नवं तंत्र अजून मला जमत नाही. मी अजून पाहिली नाही; पण सारे व्यवस्थित वाटते आहे नं...' त्यांच्या स्वभावातला काटेकोरपणा पुन्हा प्रत्ययाला आला.

कोणत्याही तडजोडी न करता जगता येतं, आणि आपलं स्वतंत्र अस्तित्व त्याच्या प्रतिष्ठेसह जपता येतं, हे सुनीताबाईंच्या जगण्यातून उमजतं. बाईंचं जन्मशताब्दी वर्ष नुकतंच सुरू झालं आहे. त्यांच्या स्मृतींना दिल से अभिवादन.


---

**वंदना बोकील-कुलकर्णी**
संपर्क : ९८२२०३३५६२

■■

# खाणमाती : आधुनिकतेच्या अतिरेकाचे दशावतार...

**प्रा. डॉ. सुधाकर शेलार**




पुस्तकाचे नाव : **खाणमाती**
लेखक : **विठ्ठल गावस**
प्रकाशक : **अक्षर वाङ्मय प्रकाशन , पुणे**
प्रथमावृत्ती : **२०२२**
पृष्ठे : **२६०**
मूल्य : **३५०/-**

आधुनिकतेच्या अतिरेकाचे दशावतार चित्रीत करणारी विठ्ठल गावस यांची 'खाणमाती' ही कादंबरी गोव्याच्या भूमीत घडणारी असली, तरी प्रादेशिकतेचे आयाम भेदत एकूणच मूळ मानवी वृत्ती-प्रवृत्ती उजागर करणारी आहे. 'सत्तरी डोंगर प्रदेशा'तील सोनुर्ली नामक एका खेड्याची कहाणी लेखक इथे सांगतो आहे. सोनुर्ली हे खेडेगाव कथानकाच्या केंद्रस्थानी घेतल्यानंतर त्या खेड्याचे म्हणून असणारे सगळे पारंपरिक जीवन पैलू घटकावयव म्हणून कादंबरीत येतात. साहजिकच खेड्यातील काही माणसेही येतात. ही माणसे नेहमीचीच आहेत. शांत जैसे थे जगणारी, शेजारच्या गावांमध्ये खाणीचे काम सुरू झाल्यानंतर त्या गावात आलेल्या दिखाऊ बरकतीला मात्र भुललेली. आपल्या गावात खाण नाही म्हणताना ही माणसे काहीशी खंतावतात. त्यांची ही खंत परिस्थितीच्या रेट्याने आणि जीवनात काही तरी बदल हवा या अभिलाषेतून आलेली आहे, हे नीटपणाने समजून घ्यायला हवे.

सोनुर्ली गावात खाण सुरू होते आणि काही काळानंतर बंद होते. आरंभी ती गावाला काही प्रमाणात समृद्धी देते. मात्र शेवटी गावच उद्ध्वस्त करून जाते. खाणीचा हा आरंभ ते शेवट याच्या मधला पाच-सहा वर्षांचा अवकाश एवढाच कालपट कादंबरीत येतो. हा अवकाश रेखाटताना लेखकाने व्यक्तिरेखांची अतिशय समर्पक अशी मांडणी केली आहे.

राजू गावकर उर्फ 'बाबल' हा या कादंबरीचा नायक. मुरगावला एका कार्यालयात कारकुनाची नोकरी करणारा. एके दिवशी त्याला दायचा - त्याच्या वडिलांचा - फोन येतो. तो गावाकडे येतो. वाटेत त्याला आजूबाजूच्या गावांचे जे चित्र दिसते आहे, त्या चित्राच्या वर्णनातून लेखक सोनुर्ली गावावरील पुढील संकटाची चाहूल अधोरेखित करतो. 'डोंगरमाथ्यावर लहान लहान तांबड्या रंगाचे ठिपके दिसू लागले होते. डोंगरावरची झाडं कापली जाऊ लागली होती. मोठमोठ्या मशीनचे आवाज कानी पडू लागले होते. तांबड्या मातीचे रस्ते तयार होत होते. त्यावर ट्रक धावू लागले होते. गावातील बाया सकाळी सकाळी कमरेला टॉवेल गुंडाळून खाणीवर पुरुषांबरोबर कामाला जात होत्या. अजूनपर्यंत आपल्या गावात हे लोण पोहोचलं नव्हतं; पण पुढच्या काळात कधी पोहोचेल हे सांगता येत नव्हतं.' (पृ.१३-१४) बाबलच्या मनात चुकचुकलेली ही शंकेची पाल अल्पावधीतच गाव-घरांच्या भिंतीवर चढते. दायने बाबलला त्यासाठीच बोलावलेले असते...

गावात खाण सुरू होते आहे असं कळल्याबरोबर गावातील बहुतांश लोक खाणकंपनीच्या ऑफिसवर स्वतःच जाऊन जमिनीचा सौदा करू लागतात. कंपनीलाही याचं आश्चर्य वाटतं. इतर गावातील सुजलेल्या समृद्धीचा कचरा डोळ्यात गेल्याने अंध झालेल्या लोकांना जमिनीपेक्षा कंपनीकडून मिळणारा पैसा अधिक लोभसवाणा वाटतो. कंपनीने दिलेल्या जेवणाची गावकरी तोंड फाटेस्तोर स्तुती करतात, या एकाच रूपकातून गावकऱ्यांची बदलती मानसिकता आणि बौद्धिक दिवाळखोरी लेखकाने टिपली आहे. 'कंपनीला जमीन द्यावी की नाही' याचा निर्णय दाय आणि आईला घेता येत नाही. धाकला तर जमीन विकायला एका पायावर तयार असतो. बाबल मात्र जमीन विकायला विरोध करतो. कंपनी त्यांच्या शेताची वहिवाटीची वाट अडवते. निरनिराळ्या पद्धतीने अडवणूक करते. तेव्हा बाबल कंपनीशी भांडतोही, अगदी कोर्ट कचेरी करतो; पण त्यालाही कंपनीच्या ताकदीपुढे शेवटी नमते घ्यावे लागते.

खाण कंपनी हळूहळू गोड बोलत गावकार भाऱ्यांना हाताशी धरत गावाभोवती पाश आवळत जाते. इश्वा (विश्वनाथ) सारखे लोक स्वतःहून बळी जातात. जमिनी विकून ट्रक खरेदी करत 'पात्राव' होतात. श्रीमंत व्हायचा प्रयत्न करतात. सरपंच 'पंढरी' आणि 'लक्ष्मण' अशांसारखे गाव नेते कंपनीकडून छोटी मोठी कॉन्ट्रॅक्ट मिळवत दारात ट्रक उभे करतात. बाबल सारख्यांचाही शेवटी नाईलाज होतो. त्यालाही जमीन विकावी लागते. त्याच पैशातून धाकला ट्रक घेतो. पुढे हाच ट्रक त्याचा बळी घेतो. बाबल कारकुनाची नोकरी सोडून खारबांदोड्याला दोन लाख डोनेशन देऊन प्राध्यापकाची नोकरी मिळवतो. गावात राहून खारबांदोड्याला जाऊन-येऊन करतो. गावात राहिल्यामुळे आपोआपच तो गावच्या घडामोडींमध्ये सहभागी होतो. बापय्या नंतर त्याच्याकडे गावचे नेतृत्व चालून येते. कंपनी गावची मर्जी राखण्यासाठी गावच्या जत्रेला मदत करते. देऊळ बांधून द्यायचे सूतोवाच करते, तेव्हा बाबल देवळा ऐवजी शाळा बांधून द्यायचा आग्रह धरतो; पण गावकऱ्यांना 'शाळेपेक्षा मंदिरच अधिक प्रिय वाटते.' हाती पैसा आल्याने जत्राही जोरदार साजरी केली जाते.

हळूहळू एकएक करत खाणीचे दुष्परिणाम समोर येऊ लागतात. पाऊस पडल्यानंतर वायंगाण तांबड्या पाण्याने भरून जाते. खाणीवरची तांबडी माती वायंगाणात येऊन पडते. 'ही माती कंपनीने उचलून द्यावी' म्हणून बाबल कंपनीवर मोर्चा काढतो. कंपनी या नापिकीच्या बदल्यात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे कबूल करते; पण यामुळे बाबल कंपनीच्या डोळ्यावर येतो. त्याची मुस्कटदाबी करण्यासाठी महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाशी बोलून दबाव टाकण्याचे प्रयत्न केले जातात. खारबांदोड्याच्या याच महाविद्यालयात हिंदी शिकवणाऱ्या सुनंदाशी बाबलचे लग्न झाले असल्याचे उपकथानकही मध्यंतरी कादंबरीत येऊन जाते. ती कथा मुळात वाचण्यात मजा आहे.

गावातल्या सगळ्या विहिरींचं पाणी अचानक आटतं. एक नवीन संकट गावापुढे - विशेषतः महिलांपुढे- उभं राहतं. गोविंदाची बायको राधा बायकांना घेऊन बाबलकडे येते. बाबल या बायकांचा मोर्चा घेऊन रास्ता रोको आंदोलन करतो. कंपनीचे ट्रक अडवले जातात. 'खाणींच्या खोलीमुळे विहिरींचे पाणी आटले' या बाबलच्या दाव्यावर कंपनी कलेक्टरसमोर 'अभ्यास गट नेमायचे आश्वासन देत गावाला टँकरने पाणी पुरवठा करण्याचे' मान्य करते; पण नंतर रात्री बाबलला नियमबाह्य रास्ता रोको केला म्हणून अटक होते. जामीन नाकारला जातो. कॉलेजच्या प्राचार्यांकडूनही त्याला निलंबित केले जाते. कंपनीची आर्थिक सत्ता पंचक्रोशीतील समाजकारणावर आणि राजकारणावर कशा प्रकारे दहशत बसवते ते इथे दिसून येते. निलंबनाच्या कारवाईला सामोरे जाताना बाबल अजिबात डगमगत नाही. उलट सुनंदाशी बोलून तो नोकरीचा राजीनामा देत गावासाठी वाहून घ्यायचं ठरवतो.

खाण कंपनीमुळे झालेलं नुकसान, प्रदूषण हळूहळू लोकांच्या लक्षात येऊ लागतं. 'बाबलचं वेळीच ऐकलं असतं तर गावावर आज ही वेळ आली नसती', याची त्यांना जाणीव होऊ लागते. ते आता बाबलच्या मागे उभे राहायला तयार होतात. बाबल विचार करतो... खाणीच्या पिटातलं पाणी मोठेमोठे पंप लावून शेतात आणायला कंपनी तयार होईल कारण त्यामुळे खाणीतील माल काढणे त्यांना सुलभ होईल. शेतात पसरलेली लाल माती काढण्यासाठी मात्र मोठं आंदोलन करावं लागेल. आंदोलनही करता येईल; पण सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे आपल्या या लोकांना पुन्हा शेतीकडे कसं वळवायचं? कारण त्यांना आता खाणीच्या पैशाची चटक लागलेली असते, ढाबा संस्कृती उदयाला आलेली असते. विश्वासारखे लोक तर वेश्यागमनामुळे एड्सच्या वाटेला लागलेले असतात.

अशातच एक दिवस खाण बंद होते. खाणीने गावाला काय दिलं आणि खाण गावातून काय घेऊन गेली याचं अतिशय वास्तव चित्र लेखकानं रेखाटलं आहे.. लेखक लिहितो, ''कंपनी अशी अचानक खाण बंद करेल असं कुणालाही वाटलं नव्हतं. खाणीमुळे आपण आयुष्यभर आरामात जगू, या धुंदीत बरेच जण होते. खाणीमुळे गावातील मोजक्याच लोकांनी पैसा कमावला होता. काही जणांनी तर भरपूर पैसा कमावला; पण टिकवला नव्हता. मौज मजा करण्यात घालवला होता. बहुतेक जण मोल-मजुरी करणारे, हातावरच्या पोटाचे. 'हाडलीपड- खाल्लीपड' वर्गातले. आता आपण यापुढे कसं जगायचं, हा त्यांच्या पुढे प्रश्न होता. त्यामुळे बरेच जण सैरभैर झाले. काही जण वायंगाणाकडं धावले. थोडे कुळागरात नारळा पोफळीची झाडं शोधू लागले, तर उरलेले डोंगर चढले; पण आता तिथं काहीच नव्हतं. वायंगाणात सगळीकडे तांबडी माती पसरली होती. नेहमी हिरवंगार दिसणाऱ्या वायंगाणात आता हिरव्या

रंगाच्या रोपाचं पातंही दिसत नव्हतं. नारळा पोफळीच्या झाडांचे नुसते बुंधे उभे होते. त्यांच्या माथ्यावर पानं नव्हती आणि फळंफुलंही नव्हती. डोंगरावरची काजू, आंब्या, फणसांची झाडं तांबड्या रंगानं रंगविल्यासारखी दिसत होती. त्यांच्या हिरव्या रंगाचं अस्तित्वही दृष्टीस पडत नव्हतं. निराश होऊन ते परतले. आता पुढे काय? हा एकच प्रश्न त्यांच्या पुढं होता.'' (पृ.२५७) आधुनिकीकरणाची भांडवलशाहीप्रणीत व्यवस्था गावखेड्यांचे कसे मातेरे करते त्याचे हे चित्र म्हणजे उत्तम उदाहरण म्हणता येईल.

गाव पुरता उद्ध्वस्त झाल्यानंतर बाबलला गाव वसवणुकीची ऐकीव गोष्ट आठवायला लागते. आता गाव पुन्हा नव्याने नव्या ठिकाणी वसवावा लागणार याचे या आठवांमधून संसूचन करत कादंबरी थांबते. आधुनिकीकरणात ग्रामीण भागातील पारंपरिक शेतीवर वेडेवाकडे आक्रमण होतच होते. जागतिकीकरणानंतर त्याचा वेग अधिक वाढला. सरकार आणि आपल्या बाकी सगळ्याच व्यवस्था धनदांडग्या बहुराष्ट्रीय कंपन्यांपुढे लाचार झाल्यामुळे या कंपन्यांवर कोणतेच निर्बंध शिल्लक राहिले नाहीत. कागदोपत्री सगळ्या अटींची पूर्तता करीत या कंपन्या गावकऱ्यांचे शोषण करायला सिद्ध झालेल्या दिसतात. स्वतःच्या स्वार्थापलीकडे कसलाच दूरचा विचार न करणारी माणसं आणि याच माणसांतून पुढे आलेले नेते स्वतःच स्वतःच्या पायावर कसा धोंडा मारून घेतात त्याचे उत्तम उदाहरण या कादंबरीत आढळते. बाबलसारखे काही लोक हे काही आशेचे किरण; पण ही जगड्व्याळ अशी यंत्रणा अशा किरणांना गिळंकृत करत वाटचाल करताना दिसते.

गोव्याच्या भूमीत घडणारी ही कहाणी गोव्याची भाषा घेऊन समोर येते. अनेक नवनवीन शब्द वाचताना सुरुवातीला अडखळणारा वाचक नंतर मात्र या शब्दांना सरावत जातो. प्रादेशिक बोलीतील या शब्दांमुळे कादंबरीभर एक प्रादेशिक वातावरण निर्माण होते व वाचकालाही त्या गावची सफर घडते. अर्थात असे असले तरी काही शब्द टाळता आले असते. त्याचप्रमाणे काही शब्दांची प्रमाण भाषेतील अर्थवलये कादंबरीच्या शेवटी परिशिष्टात दिली असती, तर कादंबरीच्या आस्वादात भरच पडली असती. एकंदर कादंबरी आपल्या नावाला जागत गावची खाणमाती कशी होते, ते सांगत वाचकाला एक शोकान्त अनुभव देण्यात समर्थ ठरली आहे, असे म्हणता येते.

---

**प्रा. डॉ. सुधाकर शेलार**
मराठी विभाग प्रमुख, अहमदनगर महाविद्यालय,
अहमदनगर, संपर्क : ९८९०९१३२३६

(साहित्य संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा २०२२ चा सयाजीराव महाराज गायकवाड पुरस्कार प्राप्त कादंबरी.)




# पुंडलीक नायक यांच्या 'अच्छेव' कादंबरीतील निसर्ग आणि संस्कृती

**प्रा. डॉ. चिन्मय मधू घैसास**

**सारांश**

भारतीय साहित्याच्या अंतर्गत कोकणी भाषेचा समावेश करण्यात आला आहे. कोकणी भाषेला साहित्य अकादमीने १९७५ मध्ये मान्यता दिली. कोकणी भाषेच्या इतिहासाकडे भाषिक आणि साहित्यिक चळवळींचा प्रवास म्हणून पाहिले जाऊ शकते. भाषिक चळवळीनंतर कोकणीने साहित्यात फार महत्त्वाचे योगदान दिले आहे. कथा, कविता, नाटक, निबंध, कादंबरी, एकांकिका, बालसाहित्य या साहित्य प्रकारांची भारतीय भाषांमध्ये भाषांतरे झाली आहेत. कथा आणि कादंबरी हे त्यातीलच दोन मुख्य प्रकार आहेत. कथात्म साहित्यात कोकणी लेखकांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. कथा साहित्याच्या क्षेत्रात महत्त्वाचे भारतीय लेखक म्हणून पुंडलिक नारायण नायक यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. कविता, कथा, कादंबरी, नाटक, निबंध, एकांकिका आणि बालसाहित्य या प्रकारांमध्ये त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

पुंडलिक नायक यांनी त्यांच्या कथा, कादंबऱ्या आणि नाटकांतून गोव्यातील ग्रामीण समाजाचा तपशीलवार वेध घेतला आहे. त्यांनी त्यांच्या लेखनातून सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय आयाम जोडण्याचे काम केले आहे. निसर्ग-पर्यावरण हा ग्रामीण जीवनाचा आत्मा आहे. निसर्गाने मानवी जीवनाला दिलेली देणगी आहे. निसर्गाच्या संस्कृतीत गाव ही संकल्पना फुलते. लोकसंस्कृती, अन्न, व्यवसाय, जीवनशैली, अर्थव्यवस्था हे मुख्य घटक आहेत. निसर्गामुळे गावाची समाजव्यवस्था निर्माण होण्यास मदत होते. हा मानव-निसर्ग संबंध त्यांच्या साहित्यात विविध घटकांद्वारे चित्रित झालेला आहे.

पुंडलिक नायक यांच्या साहित्यात निसर्ग हे मानवी जीवनाचे प्रतीक म्हणून व्यक्त झाले आहे. निसर्ग आणि माणूस हे अतूटपणे जोडलेले आहेत. जन्मापासून मृत्यूपर्यंत माणसाला या निसर्गाची गरज असते. त्यामुळे ग्रामजीवनात देवा-धर्माचे स्थान निसर्गाने घेतले आहे. संस्कृती आणि निसर्ग यांचा मिलाफ त्यांच्या साहित्यात दिसून येतो. निसर्गाची पूजा माणसाने देवाच्या नावाने केली आहे. त्यामुळे

समाजजीवनात तो संस्कृतीचा भाग झाला आहे. निसर्गाचे सामाजिक जीवनातील महत्त्व लेखक प्रतीकात्मक शैलीतून व्यक्त करतात. निसर्ग, समाज आणि माणूस यांच्यातील संबंध आणि महत्त्व लेखक कसे स्पष्ट करतात याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या शोध-प्रपत्रामध्ये केला आहे. माणूस आपले सांस्कृतिक जीवनही निसर्गाच्या माध्यमातूनच कसा जगतो हेही अधोरेखित केले आहे. सामाजिक समस्या आणि जीवनाचे चित्रण करताना निसर्ग हा जीवनाचा घटक कसा बनतो आणि संस्कृतीतून कसा घडतो, याचे उदाहरण पुंडलिक नायक यांच्या साहित्यात आहे.

**साररूप शब्द**

साहित्य, भाषा, समाज, निर्सग, ग्रामीण-समाज, संस्कृती.

**परिचय**

कथात्म साहित्यात प्रामुख्याने कथा आणि कादंबरी यांचा समावेश होतो. सैद्धांतिकदृष्ट्या कथा आणि कादंबरी हे दोन्ही स्वतंत्र साहित्यप्रकार आहेत. विस्तार आणि खोली यांच्यासह व्यक्त होणाऱ्या या साहित्यप्रकारांत एकीकडे कथा ही सूचक, प्रतीकात्मक आणि आटोपशीर पद्धतीने व्यक्त होते तर कादंबरी ही व्यापकपणे, विस्तारपूर्ण शैलीने व्यक्त होताना दिसते. भारतीय कथा आणि कादंबऱ्यांचा इतिहास आणि अभ्यास याची साक्ष देतो. समाज हा साहित्याचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे आजवरच्या साहित्यात सामाजिक घडामोडींचे बारकाईने चित्रण करण्यात आले आहे. समाज-जीवनात अनेक घटकांचा समावेश होतो. लोकसंस्कृती, खाद्यपदार्थ, पेहराव, भाषा, जीवनशैली, व्यवसाय, अर्थव्यवस्था, निसर्ग आणि सामाजिक एकसंधता यांसारख्या घटकांनी हे समाजजीवन निर्माण होते. हे समाजजीवन प्रभावीपणे कथात्म साहित्यप्रकारांत पाहावयास मिळते.

कादंबरी हा साहित्यप्रकार नवलिका आणि कादंबरी या नावांनी प्रकाशित झालेला पाहावयास मिळतो. नवलिकेमध्ये किमान पात्रे आणि तपशील असतात, तर कादंबरीत अधिक पात्रे आणि तपशीलवार घटनांचा समावेश असतो, तसेच स्वतःची विशिष्ट वर्णनात्मक ओळख असते. कोकणी कादंबरीत प्रादेशिकतेचे चित्रण केले आहे, ज्यामध्ये निसर्ग आणि संस्कृती तिची सर्वांत महत्त्वाची वैशिष्ट्ये बनली आहेत. विशिष्ट परिसराचे निसर्ग-वर्णन आणि सांस्कृतिक फरक कोकणी कादंबरीचे महत्त्व निश्चित करतात. यामुळेच अच्छेव कादंबरीत सांखळी-नावेली परिसरातील नैसर्गिक व सांस्कृतिक वारसा व्यक्त होताना दिसतो.

'क्रिस्तांव घराबो'ही एदुआर्द जुझे ब्रुन दि सौज यांची पहिली कादंबरी १९११ मध्ये प्रकाशित झाली. त्यानंतर, शणै गोंयबाब यांच्या 'संवसार बुडटी'या कादंबरीचा उल्लेख केला जातो. गोवा मुक्तीनंतर रवींद्र केळेकरांच्या 'तुळशी' नवलिकेने तर पुंडलिक नायक, दामोदर मावजो, महाबळेश्वर सैल, देविदास कदम इत्यादी लेखकांच्या कोकणी कादंबऱ्यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

**पुंडलिक नायक यांच्या कथा साहित्यातील निसर्ग-मानव संबंध**

पुंडलिक नायक हे कोकणी कथा साहित्यातील एक प्रमुख व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी कोकणी कथा आणि कादंबरी या दोन्ही प्रकारांत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. 'अच्छेव', 'बांबर', 'वसंतोत्सव', 'दायज', 'गुणाजी' या त्यांच्या नवलिका-कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. पुंडलिक नायक यांच्या कथात्म साहित्यात ग्रामीण भागातील सामाजिक समस्यांचे चित्रण आले आहे. ग्रामीण जीवनातील सामाजिक संघर्ष, गरिबी, लोकसंस्कृती, आर्थिक स्थिती, पारंपरिक व्यवसाय, नातेसंबंधातील संघर्ष, आधुनिकता, बदल आणि संघर्ष हे त्यांच्या कथा साहित्यातून प्रभावीपणे दिसून येते.

पुंडलिक नायक यांच्या संपूर्ण साहित्यात प्रामुख्याने निसर्ग आणि गाव यांचे चित्रण दिसून येते. माणूस जेव्हा सामाजिक जीवन जगतो तेव्हा समाजातील अनेक घटकांशी, मुख्यत्वे निसर्गाशी त्याचा संबंध असतो. मनुष्य आणि निसर्ग यांचे विविध स्तरांवरील नाते प्राचीन काळापासून चालत आले आहे. पुंडलिक नायक यांच्या कादंबऱ्यांमध्ये निसर्ग आणि माणूस एकरूप होऊन व्यक्त झालेले आहेत. निसर्ग हे माणसाला किंवा समाजाला मिळालेले एक वरदान आहे. ग्रामीण समाजाचे वैशिष्ट्य म्हणजे नैसर्गिक जीवन. ग्रामीण समाज हा पूर्णपणे निसर्गावर आधारित आहे. नायक यांचे कथात्म साहित्य मुख्य पात्र म्हणून माणूस आणि निसर्ग यांच्याभोवती फिरते.

'अच्छेव' या कादंबरीबद्दल कोकणी समीक्षक एस.के. डी. तेंडुलकर म्हणतात, 'नवलकथा म्हणजे एक सामाजिक दस्तऐवज ही नवलकथेची व्याख्या अच्छेव सार्थ ठरवते. सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व असणाऱ्या या पुस्तकात लेखकाने गोव्यातील संस्कृती, परंपरा, निसर्ग यांची जबरदस्त पार्श्वभूमी उभी करून गोव्यातील कोळंब गाव बारकाव्यांनिशी रेखाटला आहे.' (वालोर, पा. ४१)

कोकणी समीक्षक डॉ. हनुमंत चोपडेकार म्हणतात, 'गोव्याच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय समस्यांचे मूळ शोधणारी ही साहित्यिक कलाकृती आहे. भविष्याचा वेध घेणाऱ्या प्रतिभावान कोकणी लेखक पुंडलिक नायक यांची दिव्यदृष्टी ती दाखवते. खरोखरीच, सामाजिक जीवन आणि खाणीची धूळ यांच्यातील वैश्विक संघर्षाला शब्दरूप देणारी अच्छेव ही एक अमर आणि अप्रतिम कोकणी कादंबरी आहे.' (बिम्ब, पा. ३४, जानेवारी २०१३)

निसर्ग-मानव संबंध हा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाचा सामाजिक घटक आहे. सामाजिक जीवनात निसर्गाला विशेष स्थान आहे. हे निसर्ग-माणसाचे नाते सामाजिक जीवनात कोणत्या पैलूंद्वारे आले आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरते. पुंडलिक नायकांच्या कथा, नवलिका, कादंबऱ्यांमध्ये हे मानव-निसर्ग नाते वेगवेगळ्या पद्धतीने आढळते. याचा दोन भागांत विचार किंवा अभ्यास करता येईल. मनुष्य नैसर्गिक घटकाशी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारे जोडलेला असतो. मनुष्य आपल्या जीवनातून निसर्गाला वगळू शकत नाही. श्वासोच्छ्वासाच्या प्रक्रियेपासून याची सुरुवात होते. गोव्याच्या ग्रामीण समाजातील किंवा खेडेगावातील सर्व पारंपरिक व्यवसाय निसर्गामुळेच शक्य झाले असे म्हणणे योग्य ठरेल. लोक-संस्कृती, जीवनशैली, अन्न, औषधे आणि पेहराव या सर्व बाबतीत निसर्ग आणि माणूस यांच्यातील संबंध प्राचीन काळापासून दिसून आला आहे. आधुनिकता, शहरी जीवन आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे निसर्गात अनेक बदल झाले आहेत. या बदलामुळे समाज आणि जीवन कसे बदलले याचे उदाहरण पुंडलिक नायक आपल्या कादंबऱ्या देतात.

पिढ्यानपिढ्या पारंपरिक व्यवसाय आणि जीवनशैलीसह पूर्वज जगले. निसर्ग गावाची रचना ठरवतो. समाजासाठी भूगोल महत्त्वाचा आहे. पोट भरणे एवढेच माणूस या निसर्गाकडून शिकला नाही. निसर्गाने माणसाला सुसंस्कृत केले आहे म्हणून माणसाने निसर्गाला देव मानले आहे. आपल्या संस्कृतीत निसर्गाला देवतेचे स्थान आहे. आपला समाज मातीची, झाडांची पूजा करतो. शेतीतील हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. निसर्गाची आपण पारंपरिक सणांमध्ये पूजा करतो. निसर्गाचे रक्षण करून ती जतन करण्याचा संदेश आपली लोकसंस्कृती देते. आपल्या सण, उत्सव आणि लोकसंस्कृतींत फुले, पाने, फळे या घटकांना विशेष महत्त्व आहे.

वैद्यक हा मानवी तथा समाजजीवनात अतिशय महत्त्वाचा घटक आहे. अनेक आजारांवर नैसर्गिक उपचार नेहमीच उपयुक्त ठरले आहेत. झाडांची फळे, फुले, मुळे आणि साल अशा घटकांचा औषध म्हणून










वापर केला गेला आहे. गावातील वैद्यांनी ही औषधे लोकांना दिली. त्यांनी आपला अनुभव आणि ज्ञान वापरून औषध शोधले. निसर्गाने अनेक रोगांवर विजय मिळवला आहे. प्राण्यांसाठी, विशेषतः गुरांसाठी नैसर्गिक औषधे अत्यंत आवश्यक बनली आहेत. मानवाने निसर्गाचा उपयोग इतर प्राण्यांसाठी उपचार म्हणून केला आहे.

पारंपरिक व्यवसाय, शेती, कुळागर, पशुपालन, भाजीपाला, सुतारकाम, मासेमारी, फुलशेती इत्यादी अनेक व्यवसाय निसर्गाने मानवाला दिले आहेत. सामाजिक अर्थव्यवस्थेला आकार देण्याचे काम निसर्गाने केले आहे. निसर्ग ही समाजातील एक अर्थव्यवस्था आहे. निसर्गचक्रानुसार समाज वेगवेगळ्या वेळी वेगवेगळी उत्पादने निर्माण करत असतो. काजू, आंबा, केळी आणि इतर पिके नैसर्गिकरीत्या समाजासाठी उपलब्ध आहेत.

**अच्छेव कादंबरीतील निसर्ग–सांस्कृतिक नाते**

पुंडलिक नायक यांची 'अच्छेव' ही कादंबरी या पार्श्वभूमीवर सामाजिक स्वरूप आणि सामाजिक संबंधांचे महत्त्व मांडते. 'अच्छेव' कादंबरी प्रादेशिक आणि ग्रामीण जीवनाचे प्रतिनिधित्व करते. संपूर्ण कादंबरी निसर्ग आणि माणूस यांच्यातील नाते दर्शवते. माणूस जेव्हा नैसर्गिक जीवनाच्या चक्रात प्रवाहाच्या विरोधात जातो तेव्हा त्याचा काय परिणाम होतो याचा वेध 'अच्छेव' ह्या कादंबरीतून घेतलेला दिसून येतो. निसर्ग हा या कादंबरीचा आत्मा आहे. कादंबरी सुरुवातीपासून शेवटपर्यंत निसर्गाच्या निर्णायक सूत्राने चालते. मनुष्य हे निसर्गातील एक पात्र आहे असे प्रतिनिधिक स्वरूपात जाणवते. आधुनिक यंत्रसामग्री, शहरीकरण, औद्योगिकीरण आणि प्रदूषणामुळे गावाचा होणारा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, नैतिक आणि नैसर्गिक विनाश या कादंबरीत चित्रित करण्यात आला आहे.

'अच्छेव' कादंबरीत, मानव–निसर्ग संबंध दोन भागात पाहिले जाऊ शकतात. पहिल्या भागात नैसर्गिक पारंपरिक जीवनशैली जगणाऱ्या ग्रामीण समाजाचे चित्रण केले आहे. कोळंब गावातील लोक पारंपरिक शेती व्यवसाय करत आहेत. गावाने शेतीसह गुरे पाळणे, डोंगर, कुरण आणि हिवाळी शेतीमध्ये काजू आणि गवत भाज्या वाढवून आपला उदरनिर्वाह चालवला आहे. गाव पूर्णपणे निसर्गावर अवलंबून होते. प्रत्येकाची छोटी–मोठी शेती होती. गाव गरीब होते; परंतु दरिद्री नव्हते. प्रत्येकाला कष्ट करून

उदरनिर्वाह करण्याचे साधन निसर्गाने निर्माण केले होते. या गावात बारमाही नदी वाहते. गावाला साहजिकच काहीही पिकवता येण्याचा जणू आशीर्वाद लाभला होता. गावातील तलाव हा नैसर्गिक संपत्तीचे प्रतीक. गावात नेहमी वाहणारा पाण्याचा झरा होता. असा कोळंब गावचा नैसर्गिक खजिना आहे.

कोळंब गावाची अर्थव्यवस्था शेती आणि निसर्गसंपत्तीवर चालत होती. पंढरीच्या घराण्याच्या चित्रणातून हे स्पष्ट होते. पंढरीचे कुटुंब या कोळंब गावाचे प्रतिनिधित्व करते. या कादंबरीचे कथानक पंढरी, त्याची पत्नी रुक्मीण, मुलगा नानू आणि मुलगी केसर यांच्याभोवती फिरते. पंढरीने शेतात काबाडकष्ट करून आपला उदरनिर्वाह चालवत असे आणि पत्नी-मुलांसह आनंदी जीवन जगत असे.

संपूर्ण गाव शेती आणि इतर कामे करीत असे. दुसऱ्याच्या शेतात काम करून ते स्वतःचा उदरनिर्वाह करत. घरी उगवलेली पिके बाजारात विकून आवश्यक त्या वस्तू आणायचे. ही अर्थव्यवस्था संपूर्ण गावातील नैसर्गिक संपत्ती आणि माणूस-निसर्ग यांच्यातील नातेसंबंधांमुळे होती. शहरी जीवनाचा या गावाशी काहीही संबंध नव्हता. कोळंब गावाची नैसर्गिक संपत्ती म्हणजे त्यातील वनस्पती. झाडे-झुडपे यांनी भरलेला कोळंब हा गाव नैसर्गिक संपत्तीचे वैभव होते आणि गाव कधीही उपाशी राहत नसे. हे केवळ निसर्ग-मानव संबंधांच्या परंपरागत व्यवसायामुळे शक्य असे.

कोणतेही गाव किंवा ग्रामीण जीवन हे संस्कृतीच्या दृष्टीने नेहमीच समृद्ध असते. गावाच्या एकात्मतेचे प्रतीक म्हणजे गावाचा तलाव. पाणी ही माणसाची मूलभूत गरज आहे. वर्षाचे बारा महिने, हा कोळंब गावचा तलाव गावाच्या लोकांची तसेच, बाहेरून आलेल्यांची तहान भागवत असे. अन्न, पाणी, झाडे हा निसर्गाचा वारसा आहे. तलावावरील ही जागा ग्रामस्थांनी पवित्र व स्वच्छ ठेवली होती. कारण तिथे देवा-धर्माचे सांस्कृतिक महत्त्व होते. त्या ठिकाणी 'जागेचा देव' आहे ही भावना असे. हा 'जागेकार' म्हणजे साप. देवाला निसर्गाचा घटक मानण्याची समाजात परंपरा आहे. निसर्गाने गावात एकात्मता कशी निर्माण केली याचे हे उदाहरण आहे. निसर्ग-संस्कृतीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे कृषी संस्कृतीतील 'देव-देवकी'. शेतात काम सुरू करण्यापूर्वी स्थानिक शक्तीची पूजा केली जाते. गावातील इतर सण, उत्सव, चतुर्थी, शिमगा हे सणही कोळंब गावात मोठ्या उत्साहात साजरे होत. धर्माच्या माध्यमातून निसर्ग आणि माणूस यांचे नाते टिकवून ठेवण्यासाठी हे सर्व महत्त्वाचे होते.

ग्रामीण भागातील खानपान पारंपरिक आहे. गावचा माणूस आपण राहत असलेल्या परिसरात आणि निसर्गाकडून जे काही मिळेल ते घेऊन आनंदी जीवन जगतो. ग्रामीण भाग अन्नाच्या बाबतीत पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. गावात जे पिकते तेच खायचे. निसर्गाने दिलेली फळे, भाजीपाला आणि इतर जंगली उत्पादने मनुष्याकडून नेहमीच वापरली जातात. 'अच्छेव' कादंबरीत अस्सल गावातील खाद्यपदार्थ पाहायला मिळतात. शेतात उगवलेल्या भात, भाजीपाला आणि इतर पिकांवर समाज जगताना दिसतो. कादंबरीतील समाज नैसर्गिक संसाधनांवर आधारित आहे. महत्त्वाचे म्हणजे गावकरी पूर्ण निरोगी जीवन जगत होते. निसर्गामुळे या गावाला हे सर्व शक्य झाले. निसर्ग-समाज संबंधांचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

दुसरा भाग निसर्ग आणि मानवी संबंधांमध्ये होणारे बदल आणि खाणकामाचा जीवनावर होणारा परिणाम दाखवतो. खाण व्यवसायामुळे संपूर्ण समाजाने निसर्गाकडे पाठ फिरवली आणि झपाट्याने पैसा कमावला. या सामाजिक विषमतेमुळे खेड्यात पिढ्यानपिढ्या चालत आलेले निसर्ग-समाज संबंध बिघडले. माणूस इथल्या निसर्ग-प्रवाहाच्या विरोधात गेल्याचे दिसते. त्यामुळे 'अच्छेव' कादंबरीच्या दुसऱ्या भागात लेखकाने निसर्गापासून अलिप्त असलेले सामाजिक जीवन कसे नष्ट होते हे स्पष्टपणे दाखवले आहे. माणूस आणि निसर्ग यांच्यातील नाते हे

केवळ पोटापुरतेच नाही तर लोकसंस्कृती, व्यवसाय, अर्थव्यवस्था, सामाजिक रूढी, संस्कार आणि गावाचे भवितव्य याविषयीही आहे.

खाणकाम ही पहिली गोष्ट आहे, जी गावातील पारंपरिक व्यवसाय बदलते. गावात सुरुवातीला शेती दुर्मीळ होती; पण नंतर ती सोडूनच दिली गेली आहे. खाणीतील प्रदूषणामुळे गावामध्ये जी पिके घेत असत तीदेखील बंद होतात. आता काजू, आंबे धुळीने माखलेले असतात. गाय हा समाजजीवनाचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. गावातील गाईंचा गोठा बंद पडतो. व्यावसायिक जीवनावरील हा प्रभाव कोळंब गावातील मानवता, संस्कृती आणि नैतिक मूल्यांच्या दृष्टीने संपूर्ण सामाजिक जीवन नष्ट करतो. मानवी स्वभावातील नातेसंबंधांच्या तुटण्यामुळे माणूस निसर्गापासून दुरावतो. माणूस मातीशी आपले पारंपरिक नाते हरवून खाण आणि धुळीशी जोडला जातो. माती एकाच ठिकाणी स्थिर असते. जिथे तुम्ही काहीही पिकवू शकता; पण वाऱ्याने धूळ उडून जाते तसे या कादंबरीतील गावजीवनाचे प्रतीकात्मक चित्रण आहे.

गाव हे सामाजिक, नैसर्गिक तसेच सांस्कृतिक जीवनातील महत्त्वाचे स्थान आहे. सामाजिक एकात्मतेत सांस्कृतिक जीवन महत्त्वाची भूमिका बजावते. माणूस ज्या भागात स्थायिक होतो त्या भागातील स्थानिक देवता, दैवी शक्तीची पूजा करण्याची परंपरा आहे. ते मनोरंजनाचे साधन आणि माध्यमही बनले. जन्मापासून मृत्यूपर्यंत विविध शास्त्र व विधी माणूस करतो. कालांतराने आणि परंपरेनुसार तो सामाजिक जीवनाचा सांस्कृतिक भाग बनला. कोणतेही चांगले काम करताना स्थानिक देवतेचे स्मरण करणे ही आपल्या समाजाची परंपरा बनली. आपण हे सण उत्सवांच्या वेळी करतो; परंतु इतर सामाजिक सामूहिक क्रियाकलापांमध्ये केले जाणारे विधी आणि चालीरीती आपल्या संस्कृतीचा आणि आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनल्या आहेत.

शेवटी गावातील समाज सर्वस्व गमावून बसतो. शेतजमीन, झाडे, नद्या-नाले परंपरेने मिळालेले असतात; पण पैशाच्या आशेने हा समाज भस्म होऊन जातो. माणसाला मिळते ते फक्त आजारीपण. नैसर्गिक साधनसंपत्ती पूर्णपणे नष्ट झाली आहे त्यामुळे या समाजाची अवस्था 'हेही नाही आणि तेही नाही' अशी होऊन जाते. व्यवसाय, परंपरा, समाजव्यवस्था, लोकसंस्कृती, खाद्यपदार्थ, संस्कार, मूल्ये या परिमाणांतून निसर्ग आणि समाज यांच्यातील नाते कादंबरीत जाणवते. पुंडलिक नायक यांच्या कादंबऱ्या आपल्याला याची जाणीव करून देतात की, भक्ती, संस्कृती आणि सण-उत्सवांच्या माध्यमातून माणसाने निसर्ग आणि माणूस यांच्यातील नाते नेहमीच घट्ट केले आहे.

## निष्कर्ष

प्रादेशिक वैशिष्ट्ये साहित्याला वेगळीच खोली प्राप्त करून देतात. पुंडलिक नायक, महाबळेश्वर सैल, दामोदर मावजो, एन.शिवदास, प्रकाश पर्येकर, जयंती नाईक, देविदास कदम, रामनाथ गावडे आदी लेखकांनी कोकणी ग्रामीण जीवनाला भारतीय साहित्याचे स्थान दिले आहे. ग्रामीण जीवनाच्या या शोधात साहित्याने सामाजिक संघर्ष, सामाजिक काळातील समस्या, आधुनिकता आणि परंपरा यांच्यातील संघर्ष आणि भावनिक समस्या अशा जीवनाच्या अनेक आयामांद्वारे गावातील मौन संघर्षाला वाचा दिली आहे. निसर्ग आणि संस्कृती या सामाजिक घटकांद्वारे कोकणी लोकांच्या जीवनातील वैशिष्ट्ये आणि वेगळेपण साहित्यात प्रतिबिंबित झाले आहे.

पुंडलिक नायक यांच्या कथासाहित्याचा अभ्यास करता निसर्ग आणि समाज यांच्यातील संबंध अतिशय प्रभावीपणे जाणवतात. एका विशिष्ट काळातील आणि सामाजिक परिस्थितीतील ग्रामजीवनाचे तपशीलवार आणि सखोल वर्णन लेखकाने केलेले आहे. निसर्ग हा या समाजजीवनाचा अविभाज्य भाग आहे. संपूर्ण मानवी जीवन यावरच आधारित असल्याचे त्यांच्या

कथा साहित्यातून दिसून येते.

'अच्छेव' या कादंबरीत निसर्गाची दोन रूपे आहेत. निसर्गाच्या सान्निध्यात गेल्यास माणूस आनंदाने जगू शकतो हे पहिले स्वरूप दाखवते. निसर्ग कधीच माणसाच्या विरोधात येत नाही. त्याच्याकडे जे आहे ते समाजाला देण्याचा तो नेहमीच प्रयत्न करतो. पिढ्यानपिढ्या भातशेती, काजू, डोंगर आणि इतर पिकांची मशागत करून जगत असताना, कोळंब गावातील कोणीही उपाशी राहिला नाही किंवा रोगग्रस्त झाला नाही. कादंबरीच्या पहिल्या भागात, एकोपा आणि सामाजिक संस्कृती जपणारे गाव असे चित्रण केले आहे. दुसऱ्या भागात आधुनिकतेच्या आणि अर्थकारणासाठी, पूर्वजांनी जपलेल्या निसर्गाचा विनाश दिसतो. बदलाच्या आणि काळाच्या प्रवाहात हा समाज निसर्गाच्या विरोधात गेलेला आहे. त्यामुळे नैसर्गिक दृष्टिकोनातून ज्या गावात समाजव्यवस्था निर्माण झाली ते गाव पूर्णपणे कोसळते. प्रदूषण, रोग, मानवतेचे विस्मरण, नैतिक मूल्यांचा ऱ्हास, अनुशासनहीन पिढीची निर्मिती, तरुणांवर व्यसनांचे दुष्परिणाम आणि समाजातून नैसर्गिक साधनसंपत्तीची कायमची हानी होते. निसर्ग माणसाची जशी काळजी घेतो तशी माणसाने निसर्गाची काळजी घेणे आवश्यक आहे अन्यथा निसर्ग-माणूस संबंध संपुष्टात येईल. पूर्वजांनी निसर्ग-समाज संबंध का राखले याचे उत्तर 'अच्छेव' कादंबरी देते.

संस्कृतीच्या माध्यमातून माणसाची श्रद्धा नेहमीच निसर्ग आणि सणांशी जोडलेली असते. संस्कृतीने माणसाला सामाजिक मूल्ये दिली आहेत. निसर्गाची पूजा आणि निसर्ग जतन करण्याचा संदेश संस्कृती देते. त्यामुळे निसर्ग आणि संस्कृती यांना मानवी समाज-जीवनापासून वेगळे करता येत नाही हे वैश्विक सत्य पुंडलिक नायक यांच्या साहित्यातून दिसून येते.

**संदर्भ :**


१. नायक, पुंडलीक. 'अच्छेव', जाग प्रकाशन, प्रियोळ, म्हार्दोळ गोवा. १९७७
२. नायक पुंडलीक 'मुठय', सेवा समिती प्रकाशन, मडगांव गोवा. १९७७
३. कानोळकार, बाळकृष्णाजी. 'क्ष समिक्षेंतलो', परा प्रतिमा प्रकाशन, पेडणे गोवा. २००८
४. नायक, भिकू. (संपा.). 'जैत' पुंडलीक नायक गौरव विशेषांक, खोर्ली तिसवाडी गोवा. २०१४
५. बुडकुले, किरण. 'साहित्य नियाळ आनी कायारुपां', श्री दत्त पद्मजा प्रकाशन, काणकोण गोवा. १९८८
६. वेरेंकार, श्याम. सरदेसाय, माधवी. म्हाळशी, कमलाकर. 'कोंकणी भास साहित्य आनी संस्कृताय', कोंकणी भाषा मंडळ, मडगांव गोवा. २००३
७. चोपडेकार, हनुमंत. 'साहित्यधारा', सारा क्रियेशन, फोंडा गोवा. २०१६
८. बुडकुले, किरण. 'अक्षर सरिता', बिम्ब प्रकाशन, आगशी गोवा. २००९
९. चोपडेकार, हनुमंत. 'मोलावणी', भूमि प्रकाशन, सत्तरी गोवा. २०२१
१०. गांवकार, भालचंद्र. 'साहित्य - एक भासाभास'. मित्र प्रकाशन, बेतोडा फोंडा गोवा. १९९८
११. नायक, राजू. भावे, भूषण. कुंकळकार ज्योती. (संपा.) 'वेंचीक पुंडलीक', कोंकणी भाषा मंडळ, मडगांव गोवा. १९९९
१२. एस. डी. तेंडुलकार. 'वालोर' (पुंडलीक नायकांचें नवलिका आनी नवलकथा लेखन लेख)



**डॉ. चिन्मय मधू घैसास**


सहायक प्राध्यापक (मराठी) गोवा विद्यापीठ,
ताळगांव गोवा - ४०३२०६ संपर्क : ९८२३७२८६४०
आणि

**प्रा. नरेश चं. नायक**

सहायक प्राध्यापक (कोंकणी) गोवा विद्यापीठ,
ताळगांव गोवा - ४०३२०६ संपर्क : ८३९०५२६८४८

# ‘कुरूप’ : मराठी साहित्याला नव्या प्रवाहाची ओळख करून देणारा कवितासंग्रह

**ऐश्वर्या बाळकृष्ण शेवाळे**




पुस्तकाचे नाव : **कुरूप (कवितासंग्रह)**
लेखिका : **दिशा पिंकी शेख**
प्रकाशक : **शब्द प्रकाशन**
प्रथमावृत्ती : **८ मार्च २०२१**
पृष्ठे : **१२०**
मूल्य : **२१०/–**

इ.स.२०१४ साली भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने पारलिंगी समुदायाला कायद्याने ‘तृतीयपंथी’ म्हणून मान्यता दिली. स्वतःचे लिंग ठरवण्याचा अधिकार त्या त्या व्यक्तीला असावा हे सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले. त्यामुळे भारताचा नागरिक म्हणून या समुदायाला कायदेशीर ओळख मिळाली. बृहन्नडा, शिखंडी, इरावन अशा पात्रांचे उल्लेख अगदी पुराणांमध्ये आढळतात; परंतु आजही पारलिंगी समुदायाला स्वतःच्या जगण्यासाठी आणि अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र दुर्दैवी आहे. हा समुदाय आजदेखील मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेला आहे. इ.स. २०१४ च्या ऐतिहासिक निर्णयामुळे पारलिंगी समुदायाला मुख्य प्रवाहात आणणे अधिक सोपे झाले असले तरी समाजाचा ट्रान्स–कम्युनिटीकडे बघण्याचा दृष्टिकोन संपूर्णपणे बदललेला नाही; परंतु चांगली बाब ही की, अलीकडे विविध क्षेत्रांमध्ये पारलिंगी व्यक्तींच्या प्रतिनिधित्वात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. साहित्य, कला, राजकारण, समाजकारण, कायदा

अशा विविध क्षेत्रांत हा समुदाय सहभागी होताना दिसत आहे. मराठी साहित्यात पारलिंगी समुदायाच्या साहित्याचा वेगळा असा प्रवाह नाही. अनुवादित पुस्तके असली तरी पारलिंगी व्यक्तीने लिहिलेला स्वतंत्र असा कवितासंग्रह या आधी मराठीमध्ये प्रकाशित झालेला नव्हता. पुरुष म्हणून जन्माला आलेल्या परंतु नंतर पारलिंगी म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या, पारलिंगी समुदायाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या युवा कार्यकर्त्या आणि कवयित्री म्हणून दिशा पिंकी शेख संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत. त्यांचा 'कुरूप' हा पहिला कवितासंग्रह ८ मार्च २०२१ रोजी शब्द प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. एकूण ७६ कविता असलेल्या या कवितासंग्रहातील सर्वच कविता विचार करायला लावणाऱ्या आहेत. हा कवितासंग्रह वाचणारा प्रत्येक जण एक व्यक्ती म्हणून नक्कीच अंतर्मुख होऊन जातो. त्यामुळेच या कवितासंग्रहाची दखल घेणे आवश्यक वाटते.

सुरुवातीस संपूर्ण लेखामध्ये 'तृतीयपंथी' या शब्दाऐवजी 'पारलिंगी' हा शब्द का वापरला आहे याचे स्पष्टीकरण देणे गरजेचे वाटते. लिंगाचे विभाजन करताना पुरुष / पुल्लिंग : प्रथम , स्त्री / स्त्रीलिंग : द्वितीय आणि या दोन्हीत समाविष्ट नसलेले 'तृतीय' असा क्रम प्रचलित आहे. इ.स. २०१४ साली आलेल्या नालसा केस जजमेंटने पारलिंगी व्यक्तींना 'थर्ड जेंडर' म्हणून मान्यता दिली. लिंगभावाचा पुरस्कार करणाऱ्या व पुरुषसत्ताकतेला विरोध करणाऱ्या अभ्यासकांनी हा क्रम नाकारला. त्यांनी 'तृतीयपंथी' ऐवजी 'पारलिंगी' या अधिक परिपूर्ण शब्दाची निवड केली. सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच 'Handbook on combating gender stereotypes' नावाची पुस्तिका काढली आहे. या पुस्तिकेतदेखील लिंगभेदाचा पुरस्कार करणाऱ्या शब्दांना पर्यायी लिंगभाववाचक शब्द सांगितले गेले आहेत. पारलिंगी समुदायाला समाजात हिजडा, छक्का, किन्नर अशा नावांनीदेखील ओळखले जाते. पुरुषप्रधान संस्कृतीने या समुदायाला कायमच परिघावरचे स्थान दिले. असे असले तरी, अलीकडे विविध क्षेत्रांमधून हा समुदाय मुख्य प्रवाहाच्या जवळ येऊ लागला आहे. मुख्य प्रवाहालादेखील सोशल मीडियाच्या माध्यमातून या समुदायाचे दुःख, शोषण समजू लागले आहे. दिशा पिंकी शेख या पारलिंगी कवयित्रीने लिहिलेला 'कुरूप' हा कवितासंग्रह अशा समुदायाचा कधीही न ऐकलेला आवाज आहे. त्या अर्पणपत्रिकेत म्हणतात की, ''माझ्या समुदायातील ज्या मैत्रिणींना त्यांच्या व्यथा मांडता आल्या नाहीत त्या सगळ्या जणींना....'' पारलिंगी समुदायाच्या एक प्रतिनिधी म्हणून दिशा सर्वांशी बोलत आहेत.

पारलिंगी समुदायाने आता स्वतःच्या हक्क, स्वातंत्र्य आणि शोषणाविषयी आवाज उठवण्यास सुरुवात केली आहे. मुख्य प्रवाहातील परंपरेला प्रश्न विचारण्यास सुरुवात केली आहे. दिशा पिंकी शेख यांना यंदाच्या वर्धा येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये 'वंचितांचे साहित्य आणि लोकशाही' या सत्रात आमंत्रित करण्यात आले होते. याचाच अर्थ या समूहाचे म्हणणे समाजापर्यंत पोहोचवणे मुख्य प्रवाहाला आवश्यक वाटते आहे. दिशा यांच्या कविता अशा समूहाचे प्रतिनिधित्व करतात, ज्यांचा आवाज इथल्या पारंपरिक व्यवस्थेने वर्षानुवर्षे दाबून ठेवला आहे. त्यामुळे समाजातील महत्त्वाच्या पण दुर्लक्षित अशा घटकाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या कवितासंग्रहातील कविता अभ्यासताना सामाजिक भाषाविज्ञान, समाजशास्त्रीय अभ्यास पद्धती, स्त्रीवादी अभ्यास पद्धती, लिंगभाव अभ्यास तसेच सबाल्टन स्टडीज यांसारख्या पद्धतींचा आधार घेणे महत्त्वाचे ठरते. 'डॉ. अरविंद देशपांडे यांनी 'सबाल्टन' याला मराठीमध्ये 'वंचित' असा शब्दप्रयोग रूढ केला आहे. आपल्या नैसर्गिक अधिकारापासून वंचित असलेले लोक, गट यांचा समावेश यात करता येतो.'[१] पारलिंगी समुदाय कायमच त्यांच्या हक्क आणि अधिकारांपासून वंचित




राहिलेला आहे. सत्तासंघर्षाच्या राजकारणात त्यांना कायमच परिघावरचे स्थान दिले गेले. त्यामुळे सबाल्टन स्टडीजचा आधार या कवितासंग्रहाचा अभ्यास करण्यासाठी घेता येतो. दिशा यांच्या कवितेत 'स्त्रीत्वा' ची जाणीव करून देणारे अनेक शब्द येतात. त्यांच्या कविता स्त्रीवादी भासतात. त्यामुळे स्त्रीवादी अभ्यास पद्धतीदेखील या कवितासंग्रहाच्या अभ्यासासाठी वापरता येते. इ.स.१९७५ नंतर भारतात स्त्रीवादी चळवळीचा उदय झाला. नव्वदीनंतर स्त्री आणि पुरुष या पुढे जाऊन 'लिंगभाव' अभ्यासाची नवी शाखा उदयास आली. यामध्ये स्त्रीवादी अभ्यासाचे निकष व्यापक करण्यात आले. एलजीबीटीक्यू समूहाच्या हक्काविषयी होणारी चर्चा आणि प्रश्न या अभ्यासपद्धतीतून अभ्यासले जाऊ लागले. त्यामुळे ही अभ्यासपद्धतीदेखील या कवितासंग्रहाच्या अभ्यासासाठी महत्त्वाची ठरते. दिशासारख्या पारलिंगी व्यक्तींचे समाजातील स्थान शोधणे, त्यांची भाषा समजून घेणे यासाठी समाजशास्त्रीय अभ्यास पद्धती आणि सामाजिक भाषाविज्ञानाचा आधार घेता येतो.

'कुरूप' या कवितासंग्रहातील सर्व कविता मुक्तछंदामधील आहेत. कुठल्याच व्याकरणाच्या नियमात बांधून न ठेवलेल्या, पारंपरिक चाकोरीत न बसणाऱ्या या कविता आहेत. कुठलेच फिल्टर न ठेवता दिशा यांनी त्यांचे जगणे आणि म्हणणे मोकळेपणाने मांडले आहे. त्यात जगण्याचा संघर्ष आहे, पुरुषप्रधान संस्कृतीविरुद्धचा विद्रोह आहे आणि व्यवस्थेविरुद्धची उपहासात्मक टीका आहे. संपूर्ण कवितासंग्रह वाचताना असे वाटते की, दिशा त्यांच्या समूहाचे प्रतिनिधित्व करतातच; पण त्याबरोबरीने एक पारलिंगी स्त्री म्हणून पुरुषसत्ताक समाजाचे राजकारण उघडे पाडतात. त्यांचे दुःख आणि एका सामान्य स्त्रीचे दुःख सारखेच आहे, दोघांचाही विरोध इथल्या पुरुषसत्ताक व्यवस्थेला आहे. त्यामुळेच या कविता फेमीनाईन (स्त्रीत्वा) ची जाणीव करून देणाऱ्या भासतात. लिंगभेदाचे राजकारण उघड्या पाडणाऱ्या वाटतात. स्त्रीवादाची सुरुवात झाल्यानंतर 'जे जे वैयक्तिक ते ते राजकीय' हे वाक्य प्रसिद्ध झाले. दिशा यांना हे वाक्य मान्य असावे हे त्यांच्या लिखाणातून जाणवते. मलपृष्ठावर लिहिले आहे, 'आयुष्याच्या वाटेवर, माझ्या वाट्याला आलेल्या काट्यांमुळे प्रवास नाही थांबला; पण काही काटे पायात खुडून गेल्यामुळे तसेच राहून गेले ज्यांचं आज 'कुरूप' झालंय. वरवर पाहता या कुरूपामुळे जखमा भरल्यात

असं जरी वाटत असलं तरी हे 'कुरूप' कधीकधी ठसठसतं. ती ठसठसणारी वेदना म्हणजे माझी कविता.' संपूर्ण कवितासंग्रह वाचल्यावर दिशा यांच्या आयुष्यात कुठकुठले काटे आले असावेत याचा अंदाज येतो. प्रेम, विरह, दुःख, पुरुषसत्ता, कुटुंब, सामाजिक समस्या, पर्यावरण, राजकारण, पारलिंगी म्हणून येणारे अनुभव, व्यक्तिगत पातळीवरील अनुभव अशा वेगवेगळ्या विषयांवरील या कविता आहेत.

दिशा यांच्या कवितांमध्ये पितृसत्तेविरुद्धचा विद्रोह आहे. त्यांचे दुःख आणि भारतीय परंपरेच्या पुरुषी राजकारणात दाबून गेलेल्या स्त्रीचे दुःख सारखेच आहे. दोघांचाही लढा दुय्यमत्वाविरुद्धचा आहे. त्यांच्या कवितेतील 'ती' पितृसत्ताक परंपरेचे नियम तोडणारी, अस्तित्वासाठी लढणारी, स्त्रीवादी जाणिवांचा पुरस्कार करणारी आहे. त्या लिहितात, 'कारण जेव्हा जेव्हा मी पत्नी व्हायचा प्रयत्न केला, त्याने माझं स्त्री असणं नाकारलं त्याला फक्त अंथरुणातच मी बाई म्हणून पाहिजे होते...' (पृ. १२) पारलिंगी स्त्रीचे स्त्री असणे कायमच इथल्या पुरुषी व्यवस्थेवर अवलंबून राहिले आहे. पुरुषसत्ताक व्यवस्थेमधील दुटप्पीपणा त्यांच्या या वाक्यातून अधोरेखित होतो. योनी, गर्भाशय नसलेले परंतु स्वतःला स्त्री समजणारे पुरुष शरीर 'पुरुषांना' स्त्री म्हणून संभोगाला चालते; पण लग्नाचा जोडीदार म्हणून चालत नाही.[२] हे विदारक वास्तव दिशा यांच्या कवितेतून समोर येते.

पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये स्त्री एक उपभोग्य वस्तू असल्याचे स्त्रीवादी अभ्यासक मान्य करतात. त्या व्यवस्थेद्वारे होणाऱ्या शोषणाला आणि परंपरागत चौकटीला विरोध करतात. दिशा कवितासंग्रहात लिहितात, 'मी शोषित तू शोषक, मी वस्तू तू उपभोगक, कशाला सारं काही कसल्या तरी चौकटीत पाहतोस, गरज नसताना...!' ( पृ. क्र. १८ ) यातून त्यांची स्त्रीवादी जाणीव स्पष्टपणे दिसून येते.

समाजाने एक पारलिंगी म्हणून नाकारलेल्या अधिकारांवर दिशा भाष्य करतात. त्या लिहितात, 'व्यक्ती म्हणून व्यक्त होण्याचा अधिकार मला नाही, कारण मी हिजडा आहे..'

( पृ.क्र. २० ) हे अधिकार देणारा समाज, तो नकार दिशाच्या स्वतंत्र व्यक्ती होण्यामागील काटा आहे, ज्याचं कुरूप दिशा यांना ठसठसत असावे.

सर्वोच्च न्यायालयाने 'Handbook on combating gender stereotypes' नावाच्या पुस्तिकेतून पारलिंगी समुदाय लैंगिक शोषणाला मोठ्या प्रमाणावर बळी पडत असल्याचे सांगितले. त्यात लिहिले आहे, "Stereotype : transgender individuals cannot be raped. In reality : transgender individuals can be raped. In fact, transgender individuals are one of the groups which are most vulnerable to sexual violence because they are stigmatized and face structural discrimination. It is incorrect to assume that all transgender individuals are sex workers who always consent to sexual relation."[3] दिशा यांच्या कवितांमधूनसुद्धा पारलिंगी व्यक्तींच्या शोषणाची विदारक परिस्थिती डोळ्यापुढे उभी राहते.

दिशा यांना इतर सामान्य स्त्री वर्गाबद्दलदेखील आदर आणि प्रेम आहे. परंपरेचे सगळे नियम तोडून स्वतःसाठी जगण्याचा सल्ला त्या स्त्री वर्गाला देतात. त्या म्हणतात, 'चल थोडं केंद्रविरहित होऊ आणि जगू स्वतःसाठी. पटतंय ना तुला माझं...?' ( पृ.३९ ) पारलिंगी स्त्री आणि सामान्य स्त्री दोघींचेही आयुष्य पुरुष या एकाच परिघाभोवती फिरत असते. पुरुषकेंद्रित परिघाभोवती त्या त्यांचे आयुष्य जगत असतात. अशा स्त्रीला मुक्तपणे जगण्याचा दिशा यांनी दिलेला सल्ला महत्त्वाचा वाटतो.

सामान्य स्त्रियांनी पारलिंगी स्त्रियांना 'आपले' मानले का? हा महत्त्वाचा प्रश्न दिशा त्यांच्या कवितेतून व्यक्त करतात. बहीण, सून, सासू असे विविध

नातेसंबंध निभावणारी स्त्री या पारलिंगी स्त्रीला स्वीकारू शकलेली नाही. त्या लिहितात, ‘पण एवढ्याने जोडीदार होऊ शकतेस तू, सून नाही. त्यासाठी बाईच असावं लागतं, जी तू नाहीये, बाईसारखं दिसणं आणि बाई असणं वेगळं असतं, तू काय आहेस ते ओळख स्वतःला आणि सोड बाई माझ्या पोराला.’ ( पृ.८० ) यावरून पारलिंगी स्त्रीला सहन कराव्या लागणाऱ्या दुःखाची कल्पना येते.

पारलिंगी स्त्रीला तिच्या स्त्री असण्याची जाणीव होऊ लागते, त्या वेळी तिच्या घरातील पुरुष असुरक्षित होतो अशा आशयाची कविता दिशा यांनी लिहिली आहे. ‘ढील दिली समद्याला तर त्याची सत्ता जाईल घरातली लोक बाईलबुद्ध्या म्हणतील, याचीच त्याला लय काळजी व्हती. मला सडा – सारवन रांगोळी आवडायची. नेहमी मायमागं सयपाकघरात मी अन तो मातर खवळून जायचा मी मातर ऐकून सोडायचं ठरवलं होतं त्याची मातर आम जात व्हती.’ (पृ.२६) पितृसत्ताक व्यवस्थेने पुरुषी वर्चस्व धोक्यात येईल अशा सर्व नात्यांना विरोध केला. ‘हिजड्यांच्या एकूण वर्तनातूनही पितृसत्तेला, तिच्या संरचनेला शह निर्माण होतो.’[४] त्यामुळे पितृसत्ता ही एक व्यापक अशी संकल्पना आहे हे या कवितेतून लक्षात येते.

पारलिंगी समुदायाला समाजाने देवीत्व बहाल केले, शुभप्रसंगी आशीर्वाद देण्यासाठी बोलावले जाऊ लागले; पण माणूस म्हणून असणारे मूलभूत हक्क मात्र काढून घेतले. ‘‘आक्का.. आशीर्वाद द्या’’ (पृ.५७) या कवितेतून समाजाच्या दुतोंडी भूमिकेविषयी दिशा मोकळेपणाने व्यक्त होतात. शरीरसुखासाठी वापर करून नंतर देवमाणूस म्हणून देवत्व देणाऱ्या कृतघ्न आणि ढोंगी समाजाबद्दलची ही कविता आहे.

पुरुषसत्तेच्या आणि परंपरेच्या विळख्यात स्त्री अडकून जाते. त्या चौकटीत वावरताना ती स्वतःचे अस्तित्व विसरून जाते. म्हणून त्या म्हणतात, ‘लिंग, जात, वर्ण, इत्यादींच्या रंगात रंगवून संस्कृती, संस्कार आणि सदाचाराच्या चौकटीत तिचा जीव जाऊ नये म्हणून मी तिला कोंडून ठेवले आहे...’ (पृ.५४) एका पारलिंगी स्त्रीला इतर सामान्य स्त्री वर्गाबद्दल वाटणारी सहानुभूती या कवितेतून दिसून होते.

‘जात नाही ती जात’ असे म्हणतात. त्यामुळेच दिशा म्हणते, ‘तसा कातडीसारखा चिकटलेला हा प्रकार...’ ( पृ. ६३ ) जातीव्यवस्थेच्या विरोधातील ही कविता समाजाचे विदारक चित्र डोळ्यासमोर उभे करते. एखाद्या जातीच्या व्यक्तीला जातीवरून केलेले ‘लेबलिंग’ किती खोलवर समाजात रुजले आहे. पारलिंगी समुदायाबद्दलदेखील समाजात अनेक पूर्वग्रह आहेत. त्याबद्दल उपहासात्मक पद्धतीने त्या म्हणतात – ‘काय दात काढतोस हिजड्यावानी – दात फक्त हिजडेच काढतात..’ (पृ ८९)

पारलिंगी समुदायाला आजदेखील जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो. रेल्वेमध्ये भीक मागणाऱ्या एका पारलिंगी व्यक्तीचे समाजातील इतर घटकांकडून कसे शोषण केले जाते अशा आशयाची एक कविता त्या लिहितात. पुरुषी नजरांचा आणि गरजांचा या समुदायाला होणारा त्रास या कवितेत ( पृ.७६ ) दिशा यांनी स्पष्टपणे मांडला आहे.

दिशा यांची शेवटची कविता ‘स्त्री’ असण्याबद्दलची आहे. त्यांचे स्त्री असणे त्यांच्या सर्व कवितांमधून जाणवते. इतर कवितांमध्ये वापरलेल्या मादी, अंडी, साप, कातडी, मातृत्व, वांझपण, गर्भ, योनी अशा अनेक प्रतीकांमधून त्यांचे स्त्रीत्व दिसून येते. सामान्य स्त्रीचे आणि पारलिंगी स्त्रीचे दुःख सारखे आहे. पुरुषसत्ताकतेला असणारा विरोध सारखा आहे; पण तरीही पारलिंगी समुदायाला कायमच परिघाबाहेरचे स्थान दिले गेले, याची खंत दिशा यांच्या मनात आहे असे जाणवते. समाजाने केवळ एक उपभोग्य वस्तू म्हणून या समुदायाकडे पाहिले, त्यामुळे पारलिंगी समुदायाच्या मनाचा ठावठिकाणा घेण्यास मुख्य प्रवाह कमी पडलेला आहे.

दिशा यांच्या कविता लिखाणाची शैली अत्यंत साधी आणि सोपी आहे. साधे शब्द, वाक्यरचना मांडून त्यातून अनेक खोल अर्थ त्या व्यक्त करतात. बऱ्याच कवितांत भाड्या, साले, च्या आयला असे शिवीवाचक शब्ददेखील आले आहेत; परंतु असे मोकळेपणाने लिहिणेच तिच्या कवितेची खास शैली आहे. फ्रेंच स्त्रीवाद्यांच्या मते, स्त्रीला स्वतःचे असे भाषेचे discourse असणे आवश्यक वाटते. त्याचप्रमाणे पारलिंगी व्यक्तींच्या साहित्यालादेखील एक discourse असणे गरजेचे आहे. त्यांची स्वतःची अशी भाषिक संस्कृती निर्माण झाल्यास त्यांनी वापरलेल्या शब्दामागील राजकारण, समाजकारण आणि पार्श्वभूमी समजून घेण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यांचे शब्द अपमानास्पद अथवा शिवीजनक वाटणार नाहीत.

खरेतर 'कुरूप' या शीर्षकामध्येच एक वगळलेपण आहे, नकारात्मकता आहे. दिशा यांनी काट्याचे कुरूप झाले आहे असे मलपृष्ठावर म्हटले आहे. संपूर्ण कविता वाचल्यावर इथली पितृसत्ताक व्यवस्था, नखशिखान्त न्याहाळणाऱ्या नजरा, जातीय भेद, नकार आणि इथला एकूणच हिणवणारा समाज त्यांच्या वाट्याला आलेले काटे आहेत असे वाटते. याविषयी कितीही विद्रोह केला तरी हे सगळे संपले नाही. म्हणून त्याचेच 'कुरूप' दिशा यांना ठसठसते आहे.

'एलजीबीटी चळवळीची दिशा एलजीबीटी व्यक्तींना ओळख मिळावी, त्यांना समाजात स्वीकारलं जावं आणि त्यांना समाजात सामावून घेतलं जावं अशा recognition, acceptance आणि inclusion या मुद्द्यांवर आधारित आहे.'[५] त्यामुळे पारलिंगी समूहाला वगळलेपणाची भावना जाणवता कामा नये यावर कृती होणे आवश्यक आहे. 'साहित्यात'देखील या समुदायाच्या लिखाणाची भर पडणे आवश्यक आहे. इ.स.१९६० नंतर मराठी साहित्यात आदिवासी, दलित, स्त्रीवादी असे प्रवाह निर्माण झाले. त्यांनी कायमच साहित्यातून प्रचलित व्यवस्थेला प्रश्न विचारले. दिशा पिंकी शेख यांच्या 'कुरूप'या कवितासंग्रहाने मराठी साहित्याला आणखी एका प्रवाहाची ओळख करून दिली आहे. त्यामुळे मराठी साहित्याने याची दखल घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


१. संपा. विद्युत भागवत, प्रतिमा परदेशी, 'अब्राह्मणी स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या दिशेन...' , स्त्रीअभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९८. पृ. ११९.

२. संपा. अश्विनी तोरणे, शीतल पावसकर-भोसले, लता पांचाळ, प्रतिभा टेंबे, माधुरी पाथरकर, आशा हुंबे- पडळकर, नितिन आरेकर, राजेश खरात, 'स्त्रीवाद बहुआयामी चर्चाविश्व', हरिती पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०२२. पृ. १४७.

३. 'Handbook on combating gender stereotypes', supreme court of India, 2023, Page no. 63

४. स्वैर अनुवाद - प्रवीण चव्हाण, 'पितृसत्ता समजून घेताना', क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, प्रथमावृत्ती, २०१०, पृ.१५७.

५. संपा. गीताली वि.मं. , 'मिळून साऱ्याजणी' , अंक दहावा, मे २०२३, 'ट्रान्सजेंडर बिल', जमीर कांबळे, पृ. ४०.



संशोधक विद्यार्थी : **ऐश्वर्या बाळकृष्ण शेवाळे**


मार्गदर्शक : **प्रा. डॉ. राजेंद्र सलालकर**

संशोधन केंद्र : पद्मश्री विखे पाटील कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स, कॉमर्स, प्रवरानगर, अहिल्यानगर.

संपर्क : ९४२२४५७६५१

# कासरा :
# कृषिसंस्कृतीचं भेदक चित्रण

**डॉ. सुरेश सावंत**




पुस्तकाचे नाव : **कासरा (कवितासंग्रह)**
कवी : **ऐश्वर्य पाटेकर**
प्रकाशक : **पॉप्युलर प्रकाशन, मुंबई**
मुखपृष्ठ : **संतोष घोंगडे**
पृष्ठे : **१२८**
मूल्य : **२५०/-**

ऐश्वर्य पाटेकर हे ‘जू’ ह्या दाहक आत्मकथनामुळे मराठी साहित्यविश्वाला सुपरिचित झालेले तरुण लेखक-कवी आहेत. त्यांच्या ‘भुईशास्त्र’ या पहिल्याच काव्यसंग्रहावर साहित्य अकादमीच्या पुरस्काराची नाममोहर उमटून तो रसिकमान्यही झाला आहे. त्यांचा ‘भुईशास्त्र’नंतरचा ‘कासरा’ हा दुसरा कवितासंग्रह पॉप्युलर प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. कवीची नाळ शेतीमातीशी आणि गावखेड्याशी घट्ट बांधलेली आहे. ऐश्वर्य पाटेकर यांची कविता जगण्यातून उगवलेली असल्यामुळे ती जगण्याशी समरस झालेली आहे, हे ‘भुईशास्त्र’ने यापूर्वीच सिद्ध केले आहे. ‘कासरा’ही त्यास अपवाद नाही. कृषिसंस्कृतीचं भेदक चित्रण करताना, त्यांनी वर्तमान वास्तवाची झाडा-झडती आपल्या कवितेतून घेतली आहे. संग्रहातील ‘कोंब’ ही पहिलीच कविता त्या दृष्टीने पाहण्यासारखी आहे.

**‘वर्तमानाला वाळवी लागलीय**
**दूषित माणसांचं बियाणं**
**फोफावतय एरंडासारखं’**
**त्याला अटकाव नाही**

**अवघं जंगल वाढत चाललंय त्यांच्याच नावाचं**
**सगुण माणसास आता मरणापुरतीही**
**उरणार नाही जागा**

ही खंत कवीला अस्वस्थ करते आहे. अस्वस्थ होऊन कवी शांत बसून राहत नाही; तर 'म्हणूनच सगुण माणसांचं बियाणं या सर्वांतून मला वाचवत न्यायचं आहे' अशी मनीषा बाळगत कवितेवरची आणि माणसावरची आपली निस्सीम निष्ठा व्यक्त करतो. ही कवीची केवळ काव्यनिष्ठा नव्हे, तर जीवननिष्ठा आहे. कवीची चिरंतन आशा आता केवळ कवितेच्या ठायी एकवटली आहे. 'कारण नष्ट होत जाणाऱ्या शेवटच्या माणसाला आता कविताच वाचवणार आहे' हा कवीचा विश्वास कौतुकास्पद आहे.' मी माझ्यात अख्खं गाव घेऊन फिरतोय' ही कवीची खरीखुरी ओळख आहे. कवी गावखेड्याशी आणि शेतीमातीशी एकरूप झाला आहे, हेच त्यातून ध्वनित होते. अशा वेळी कवीला 'भाकरीसाठी पायपीट करताना तुडवलेली बारा गावची माती' आठवते. ही माती कवीच्या श्वासात आणि ध्यासात रुतून बसलेली आहे. मात्र जागतिकीकरणाने कृषिसंस्कृतीची वासलात लावली हे कवीच्या नजरेतून निसटत नाही. 'माणसाच्या राक्षसानं भेदून टाकलेत तिन्ही लोक' ही मोठीच भयप्रद गोष्ट आहे. 'देश कंबरेत वाक पडून म्हातारा होऊ शकतो' ही केवळ कविकल्पना नसून संभाव्य घटनाक्रम आहे.

कवी केवळ गावकुसाचे दु:ख मांडत नाही, तर कवीच्या डोक्यावर समस्यांचं 'ग्लोबल गाठोडं' आहे. गावखेड्यापासून तुटत चालल्यामुळे कवीची अवस्था मोठी भयानक होते. 'मी माती हरवून आल्यासारखा दु:खीकष्टी! कुणाच्या तरी मौतीला गेल्यासारखा मातीला जाऊन येतो.' कवीच्या मनाला ग्रासणारी ही खिन्नता वाचकालाही अस्वस्थ करून जाते. 'कितीतरी वर्षांत मी जातो जेव्हा गावी' ह्या कवितेत कवीने गावखेड्यांची पडझड मोठ्या प्रत्ययकारी शब्दांत चितारली आहे :

**'यदूबाबा न् रंभाईच्या ओस पडलेल्या घराच्या**
**पापण्या ओल्या झाल्याहेत**
**चिमानानाच्या घरानं मला**
**पाहताच फोडला हंबरडा**
**सीतावहिनीचं घर मोडून पडलय**
**संतू न्हाव्याचं घर दिसत नाहीये**
**आवडाईच्या घराचं अंगण कुणी खोदून नेलय?**
**राधाईचं ओट्यासकट**
**तुळशीवृंदावन गायब झालंय.'**

हे विषण्ण करणारे वर्णन कोणत्याही गावखेड्याला तंतोतंत लागू पडते. विस्कटलेल्या गावखेड्याची उदासी चराचराला व्यापून उरली आहे. 'साळुंक्या रडताहेत/ विहीर रडते आहे/ गाय रडते आहे/ बैल रडतो आहे' ही उदासी वाचकांपर्यंत पोहोचविण्यात ऐश्वर्य पाटेकर यांची कविता कमालीची यशस्वी झाली आहे. 'वर्तमानाची ही गिचमीड लिपी' साक्षराला निरक्षर ठरवू पाहते आहे. एक भाकर पृथ्वीएवढी वाटण्याचा हा कराल कालखंड आहे. पृथ्वीच्या उकिरड्यावर राज्यकर्त्यांच्या बुद्धीची टरफलंच टरफलं साचली आहेत. इतकेच नाही, तर

**स्मशानात परावर्तित होऊन गेलीय अवघी पृथ्वी**
**आणि आपण पाहतोय ज्या ईश्वराची वाट**
**न जाणो त्याचं आधीच स्वर्गात**
**स्मशान झालं असेल तर!**
**आणि हे काय अचानक कोणी फोडला हंबरडा**
**ईश्वराच्या नावानं?**

अशा शब्दांत ही बंडखोर कविता ईश्वर ह्या संकल्पनेच्या अस्तित्वालाच थेट आव्हान देते. एवढं बोलून ही कविता थांबत नाही. ती वास्तवाचा शोध घेऊन त्याचे तथ्य समोर आणते. 'गाव तोंडावर गोधडी ओढून सूर्य सामसूम झाल्यासारखा तोंड लपवून' असे चित्र कवीला दिसते आहे. सूर्याला तोंड लपवण्याची वेळ कुणी आणली? 'जेव्हा राज्यकर्ते जास्तच उद्दाम होतात' हे त्याचे सडेतोड उत्तर आहे. बिकट परिस्थिती सर्वसामान्यांवर लादलेल्या व्यवस्थेचा बरोबर समाचार पाटेकरांची कविता घेते. ह्या बाजारू

व्यवस्थेनं सामान्य जीवाच्या जगण्याची अक्षरश: 'खुरमुंडी' केली आहे, ही परिस्थितीच मोठी केविलवाणी आहे. जागतिकीकरणाने सामान्य माणसाच्या जगण्याचे 'मार्केट' करून टाकले आहे. 'बाजार' करून टाकला आहे. माणसाची जणू 'खेळणी' झाली आहेत. कृषिसंस्कृतीचा बीमोड करण्याचे षडयंत्र चारी बाजूंनी सुरू आहे. वावराला 'मृत्युपत्र' लिहावं लागतंय यातच सारं आलंय. तरी कवीला कृषिसंस्कृती नष्ट होऊ नये असे वाटते. तो नष्ट होऊ नये यासाठी कसोशीने प्रयत्न करतो. 'वावराचं मृत्युपत्र' ह्या कवितेच्या शेवटी कवी लिहितो :

**'माझ्या मृत्युपश्चात तुम्ही**
**विकलंच मला बिगर शेतकऱ्याला**
**माझा तळतळाट भोवल्याशिवाय**
**राहणार नाही.'**

वावराचा हा तळतळाट संवेदनशील वाचकाच्या काळजाला करवत लावून जातो. या सगळ्या ससेहोलपटीत कवीच्या दृष्टीने कविता हाच एकमेव दिलासा आहे. नव्हे 'नष्ट होत जाणाऱ्या शेवटच्या माणसास आता कविताच वाचवणार आहे!' असा कवीचा दुर्दम्य आशावाद आहे. हीच कविता कवीला पदराआड घेऊन पान्हा पाजते. हीच कविता कवीला उचलून घेते कडेवर. कवीला जडलेलं कवितेचं दुखणं फक्त कवीच्या आईलाच समजतं. सभोवताल सगळा अंधार दाटला आहे. 'अंधाराची म्हैस गाव अंगाखाली घेऊन सुस्त' पडली आहे. अशा परिस्थितीत कवीला प्रश्न पडतो :

**'आता या अंधाराचं काय करू?**
**म्हणून कवितेची वही पुढ्यात घेतली**
**तर पान उलटताच कवितेतून भपकन**
**बाहेर पडला उजेड'**

कविता हाच कवीच्या आयुष्यातला एकमेव कवडसा आहे. कवीनं तो निष्ठेनं जपला आहे. गावखेडी, शेतीमाती, नांगर आणि फावडं, भूक आणि भाकरी, शहराच्या घशात चाललेली खेडी, बिगरशेती होत चाललेली शेतजमीन, गायीगुरांचा हंबरडा, कष्टकरी महिला, मातीच्या वाटा-पायवाटा, शेण-शेणकूर, जात्यावरचं दळण, भावनेचं अर्थशास्त्र कवटाळून बसलेली आवडाई, सासुरवाशिणींना पदरात घेणाऱ्या कोरड्या विहिरी, आत्महत्या करणारी झाडं, वारंवार पडणारे दुष्काळ आणि त्यामुळे उद्ध्वस्त होत चाललेली खेडी, डोळे रोखून आणि चोची परजून बसलेली गिधाडे, मानवाचे झालेले वस्तूकरण, चहूकडे दाटलेला अंधार, जीएसटीची कात्री, राज्यकर्त्यांचा उद्दामपणा, समाजमाध्यमांचं ढुमकं हे सगळे ह्या कवीचे आणि कवितेचे आस्थाविषय आहेत. ह्या सगळ्या जगण्यातील ताणेबाणे कवीने छान टिपले आहेत. कवीने समाजमाध्यमांचा निष्क्रिय वाचाळपणा नेमकेपणाने अधोरेखित केला आहे.

'कासरा' हे मर्यादित अर्थाने कवीचे आणि अमर्याद अर्थाने समकालीन समाजजीवनाचे आत्मकथन आहे. पदोपदी अनुभवलेल्या ठेचांची ठसठस ह्या कवितेत आहे. ही कविता म्हणजे एका युगाचा आत्मशोध आहे. 'कासरा' ही व्यथित करणारी आठवणींची जत्रा आहे. हल्ली कवितेच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर कंपोझिंग चालू आहे. त्या पार्श्वभूमीवर 'कासरा'मधील कविता तिच्यातील अंगभूत अस्सलतेमुळे उठावदारपणे उठून दिसते. कवीच्या अंतःकरणातील अस्वस्थता वाचकांपर्यंत पोहोचविणारी 'कासरा'तील कविता ही एकविसाव्या शतकाची कविता आहे.

---

**डॉ. सुरेश सावंत**
'मथुरेश बंगला' राज मॉलच्या पाठीमागे
आनंदनगरच्या जवळ, शाहूनगर, नांदेड- ४३१६०२
संपर्क : ९४२२१७०६८९ sureshsawant2011yahoo.com



# एकांकिका वाटचाल आणि वैशिष्ट्ये



**डॉ. विजयकुमार अंबादास जोशी**

एकांकिका हा नाटकाचा एक उपप्रकार आहे. इतर साहित्यप्रकारापेक्षा भिन्न असा साहित्यप्रकार म्हणजे एकांकिका होय. अगदी सोप्या भाषेत सांगायचे तर एकांकिका म्हणजे एकअंकी नाटक.

एकांकिका या साहित्यप्रकाराची मुळे आपल्याला इ.स.पूर्व पहिल्या व दुसऱ्या शतकातील प्राचीन संस्कृत नाटकांमध्ये दिसून येतात. भारतीय नाट्यशास्त्रामध्ये नाटक या कलाप्रकारास 'रूपक' असे म्हटले आहे आणि रूपकाच्या दहा विविध प्रकारांना 'दश रूपके' म्हणतात. या दश रूपकांपैकी भाण, वीथी, व्यायोग आणि उत्सृष्टिकांक हे प्रकार एकांकी आहेत. महाभारताच्या आधारे लिहिलेली भासांची पाच रूपके एकांकी आहेत. सतराव्या शतकापासून ते एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंतच्या काळात तंजावरमध्ये मराठी एकांकिकांचे लेखन व प्रयोग होत असत. 'श्री लक्ष्मीनारायण कल्याण' व 'पार्वती कल्याण' या एकांकी रचना विशेष उल्लेखनीय आहेत. तंजावरी परंपरा ही प्रामुख्याने राजाश्रयावर अवलंबून होती. त्यामुळे राजसत्ता गेल्यावर ही नाट्यपरंपरा खंडित झाली. अठराव्या शतकातील भारतात उदयास येणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यामुळे पाश्चिमात्य साहित्य व इंग्रजी भाषेमुळे मराठी एकांकिका नव्या रूपात होत होती.

एकांकिका या साहित्यप्रकाराचा उगम होण्यापूर्वी भारतात एकांकिका सदृश्य प्रकार मनोरंजनासाठी, धार्मिक कारणास्तव किंवा प्रबोधन करण्याकरिता सादर करण्यात येत होता. यात लोकनाट्य, तमाशा, ललित, कीर्तन, कठपुतळीचे खेळ, वासुदेव, गोंधळी, रामलीला, दशावतार, भारूड, बहुरूपी यातूनच नाट्यसदृश्य कलाप्रकार लोकांना आकर्षित करू लागले. यामध्ये वग, प्रहसन, फार्स, नाटिका, संगीतिका, पथनाट्य, लघुनाटक इत्यादी कलाप्रकार समाविष्ट होतात.

इ.स.१८४३ मध्ये विष्णुदास भावे यांनी मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली. त्या काळात रंगभूमीवर दीर्घलांबीची पौराणिक नाटके सादर होत असत. या नाटकाच्या सुरुवातीला आणि मध्यंतरामध्ये लघुनाटिका सादर होत होत्या. नाटकाच्या सुरुवातीला 'कर्टन रेझर' तर मध्यंतरातील लघुनाटिका 'इंटरल्यूड' या नावाने सादर केल्या जात होत्या. यालाच पुढे 'प्रहसने' किंवा 'फार्स' म्हणून ओळखले जाऊ लागले. १९ जानेवारी १८५६ रोजी अमरचंद वाडीकर नाटक मंडळीने पहिला फार्स सादर केला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये गाजलेल्या एकांकी फार्सपैकी 'ढेरपोट्याची फजिती', 'बासुंदीचा मनोरंजक फार्स', 'नारायणराव पेशवे यांच्या मृत्यूचा फार्स', 'ढोंगी बैराग्याचा फार्स', 'गुलाबछकडीचा

फार्स’ इत्यादी फार्स सादर झाले. १९११ मध्ये हरिभाऊ आपटे यांनीदेखील ‘जबरीचा विवाह’ हे एकांकी प्रहसन लिहिले होते.

याच काळात राम गणेश गडकरी यांनी ‘सकाळचा अभ्यास’ ही मराठीतील पहिली एकप्रवेशी स्वयंपूर्ण व प्रयोगक्षम एकांकिका लिहिली. शंकर काशिनाथ गर्गे ऊर्फ दिवाकर यांनी ‘महासर्प’, ‘सुट्टी! शाळेला सुट्टी’, ‘ऐट नको करूस’, ‘हे दोघे कोण’ अशा नाट्यछटांना एकांकिकेचे स्वरूप दिले. ना. के. बेहरे यांच्या ‘दोन चित्रे’, ‘आजकालची पोरे’ या एकांकिका उल्लेखनीय आहेत.

१९३० पर्यंत एकांकिका लेखन फार थोड्या प्रमाणात झाले. यात काही रूपांतरीत एकांकिकाही सादर झाल्या. उदा. ‘संशयी जिजाबाई’, ‘घटकेची नाटके’, ‘आठवणीचे खंदक’.

१९३० ते १९५० हा काळ एकांकिका या साहित्यप्रकारासाठीही स्थित्यंतराचा होता. सांस्कृतिक अभिसरणामधून १९४० च्या दशकात नवसाहित्य आकार घेत होते. या कालखंडात माधव मनोहर, अनंत काणेकर, मामा वरेरकर, मो. ग. रांगणेकर, पार्श्वनाथ आळतेकर यांनी प्रयोगक्षम एकांकिका लिहिल्या. सत्यकथा, हंस, मौज, साधना या नियतकालिकांमधून एकांकिका प्रकाशित झाल्या. साहित्य संघ, नाट्यमन्वंतर, नाट्यनिकेतन या संस्थांनी एकांकिकांचे यशस्वी सादरीकरण सुरू केले.

भारतीय विद्याभवन या मुंबईतील संस्थेने १९५०-५१ मध्ये सर्वप्रथम एकांकिका स्पर्धा सुरू केल्या. युवक महोत्सव, पुरुषोत्तम करंडक, आंतर बँक नाट्य स्पर्धा, उन्मेश अशा अनेक स्पर्धा उदयाला आल्या. एकांकिकांची मागणी वाढू लागली. तरुण लेखक स्पर्धेसाठी आधारस्तंभ झाले. विजया मेहता, अरविंद देशपांडे, सुलभा देशपांडे, अरुण काकडे, डॉ. श्रीराम लागू अशा नाट्याकर्मींची फळी तयार झाली. एकांकिका या साहित्यप्रकाराचा गांभीर्याने विचार होऊ लागला व लेखनही मोठ्या प्रमाणात होऊ लागले.

इ.स. १९५० ते १९७० या कालखंडात नवीन स्वातंत्र्याने नवी उमेद, नवी दिशा व नवीन समस्या याचे चित्रण साहित्यप्रकारातील सर्व घटकांत उमटू लागले. एकांकिकेसाठीचे नवीन विषय, नवीन कल्पना आणि नवीन लेखक लिहिते झाले. विजय तेंडुलकर, पु. ल. देशपांडे, रत्नाकर मतकरी, वसंत सबनीस, शं. ना. नवरे, वसंत कानेटकर, विजय दळवी, चिं. त्र्यं. खानोलकर असे अनेक लेखक एकांकिकांमधून नवीन शैली रुजवू लागले. तेंडुलकरांनी विपुल एकांकिका लेखन केले. ‘चार दिवस’, ‘अजगर आणि गंधर्व’, ‘बळी’, ‘बेबी’, ‘मादी’, ‘भेकड’ अशा त्यांच्या एकांकिकांची मोठी यादी तयार झाली.

पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेल्या एकांकिकांत नाट्यविषयक नवी जाणीव प्रतिबिंबित होते. ‘सारं कसं शांत शांत’, ‘छोटे मासे मोठे मासे’, ‘विठ्ठल तो आला आला’, ‘सदू आणि दादू’ इ. गंगाधर गाडगीळ (बंडू, रहस्य आणि तरुणी), वसंत सबनीस (प्रेक्षकांनी क्षमा करावी, चोर आले पाहिजेत, बायकात पुरुष लांबोडा) याच कालखंडात तारा वनारसे, सरिता पदकी, लीला फळसाळकर, गिरिजा कीर, वसुधा पाटील अशा मोजक्या स्त्रियांनी एकांकिका लेखन केले.

१९७० ते १९९० या कालखंडात सामाजिक चित्र बदलले आणि याचे पडसाद एकांकिकालेखनात दिसू लागले. महेश एलकुंचवार, सतीश आळेकर यांनी वास्तववादी, चौकटीबाहेरील विषय लिखाणात आणले. वृंदावन दंडवते, चं. प्र. देशपांडे, सुहास तांबे, दिलीप परदेशी, वामन तावडे, प्रदीप राणे, शफाअतखान, ज्योती म्हापसेकर, रमेश पवार, अच्युत वझे, विनोद हडप यांचे एकांकिका लिखाण वैशिष्ट्यपूर्ण ठरले.

साठोत्तरीनंतर दलित रंगभूमीवर नवनवीन प्रयोग झाले. दत्ता भगत, प्रेमानंद गज्वी, चंद्रकांत पवार, डॉ. सोमनाथ मुटकुळे, इ. मो. नारनवरे, योगीराज वाघमारे, अविनाश डोळस, डॉ. गंगाधर पानतावणे, टेक्सास गायकवाड यांनी दलित वेदना, दलित प्रश्न,

प्रायोगिक रंगभूमीवर ताकदीने मांडले. या एकांकिका स्पर्धेतून सर्व तळागाळापर्यंत पोहोचल्या. १९९० च्या दशकात आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत मूलगामी बदल झाले. एकांकिका हा साहित्यप्रकार विषयाच्या अनुषंगाने प्रगल्भ झाला. शिरीष हिंगणे, श्रीहरी जोशी, देवेंद्र पेम, डॉ. दीपेश करमरकर, चेतन दातार, परेश मोकाशी, सचिन कुंडलकर, किरण यज्ञोपवीत, गिरीश जोशी, इरावती कर्णिक यांनी एकांकिका या साहित्यप्रकारास भरीव योगदान दिले.

२१ व्या शतकात संगणक युग आले आणि एकांकिका साहित्यप्रकार यंत्र आणि तंत्र याचा आधार शोधू लागली. एकांकिका सातासमुद्रापार झेप घेऊ लागली. अमेरिका, कॅनडा, टोरँटो, न्यूयॉर्क या देशात मराठी एकांकिका स्पर्धा, महोत्सव, संमेलनाद्वारे देशाटन करू लागली.

एकांकिका ही मर्यादित अवकाशात प्रभाव साधणारी नाट्यकला असल्याने महाविद्यालयीन युवकवर्ग या साहित्यप्रकाराकडे चटकन आकर्षित झाला. 'Short but sweet' या उक्तीप्रमाणे युवक महोत्सव, एकांकिका स्पर्धा याचे पीक येऊ लागले आणि मग एकांकिकेचा मूळ गर्भित अर्थ म्हणजे समाजप्रबोधन याचा विसर काही लेखकांना पडला. एकांकिका साहित्यप्रकाराची मूळ वैशिष्ट्ये सामाजिक जाणीव जागृती याऐवजी दिखावा आणि बक्षीसपात्र एकांकिका विपुल प्रमाणात दिसू लागल्या. बाजारीकरण आणि आर्थिक स्रोत म्हणून काही कलाकार याकडे बघू लागले.

नाटक, चित्रपट, मालिका, वेबसिरीज यांच्यापेक्षा एकांकिका या साहित्यप्रकाराचा प्रभाव जलद आणि जास्त परिणामकारक असल्याने अनेक विषय लेखक हाताळू लागले. तृतीयपंथीयांची समस्या, कुष्ठरोग्यांचे जीवन, समलिंगी विषय, संयुक्त महाराष्ट्र या विषयावर एकांकिका सादर होऊ लागल्या. मनोविश्लेषणात्मक विषय, राष्ट्रीय मूल्य सांगणारे विषयही एकांकिकेत आले आहेत. सरोगेट मदर, लिव्ह अ‍ॅण्ड रिलेशनशिप, जात, आरक्षण, सेक्स एज्युकेशन, सेक्स वर्कर हेही विषय लेखकांनी लिहून समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कोणतीही सादरीकरणाची कला ही मनोरंजन आणि प्रबोधन याच मूल्यांवर आधारित आहे आणि एकांकिका कलाप्रकार संहितामूल्य आणि प्रयोगमूल्य या गोष्टीचा विचार करून सामाजिक जाणीव जागृत ठेवून मानवी जीवनाचे दर्शनकरणारा साहित्यप्रकार म्हणून ओळखला जाऊ लागला.

थोड्या वेळात जास्त संदेश देणारा साहित्यातील वाङ्मयप्रकार म्हणजे एकांकिका होय. आज अनेक युवकवर्ग एकांकिका हा कलाप्रकार महाविद्यालयीन रंगमंचावर सादर करून नाट्यकला जोपासत आहे आणि अभिनयाच्या क्षेत्रात चंचूप्रवेश करून अनेक कलाशिखरं पादाक्रांत करत आहे. हेच या एकांकिका साहित्यप्रकाराचे फलित आहे.

**संदर्भग्रंथ :**


१) रा. श्री. जोग मराठी वाङ्मयाचा इतिहास, म.सा.प. पुणे, द्वितीय आवृत्ती १९७३, खंड चौथा.
२) वि. भा. देशपांडे मराठी नाटककार काळ आणि कर्तृत्व, खंड तिसरा.
३) श्री. रं. कुलकर्णी, भालबा केळकर एकांकिका वाटचाल, सोमैय्या पब्लिकेशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९६९.
४) दीपेश करमरकर – मराठी एकांकिका कालची आणि आजची, आपला परममित्र, दिवाळी विशेषांक २००६.

---

**डॉ. विजयकुमार अंबादास जोशी**
२०२, अमृतवेल डी, बोरुडे मळा,
बालिकाश्रम रोड, अहमदनगर ४१४००३.
संपर्क : ९२२६१२६५०३, ८२०८६६०९७१
vijaykumarjoshi1969@gmail.com

# जाणीवनिष्ठ अंतरंगाचा प्रवास: 'या तहानेला तळ नाही'

**डॉ. प्रिया निघोजकर**




पुस्तकाचे नाव : **या तहानेला तळ नाही (कवितासंग्रह)**
कवी : **हेमकिरण पत्की**
प्रकाशक : **सृजनसंवाद प्रकाशन, ठाणे**
मुखपृष्ठ : **शिरीष घाटे**
मूल्य : २००/–

कवीचे काव्यात्म संवेदन त्याच्या भावजीवनाशी, अस्तित्वगाभ्याशी आणि मूलकंदाशी जितके एकवटलेले असेल; तितकी त्याची काव्यप्रतिभा बहरते, डवरते आणि चिवटपणाचा अनुभव देते. तिच्या चैतन्य पालवीने वाचकहृदयातही वसंतोत्सव होतो. मराठी काव्यसृष्टीत असेच एकात्म संवेदनेने, अंतःस्फूर्तीने चार दशकांहून अधिक काळ कवितालेखन करणारे, समकालीन कवींहून वेगळ्या जाणिवेचे, प्रवृत्तीचे एकांतप्रिय भावकवी म्हणजे हेमकिरण पत्की होत. विशुद्ध चेतनेचा ध्यास घेतलेले ते कवी आहेत. याचा प्रत्यय त्यांच्या आजवर प्रकाशित झालेल्या सर्वच लेखनातून येतो. हेमकिरण यांनी काही प्रमाणात ललितगद्य लेखन, रसग्रहणात्मक लेखन, जीवनभाष्यपर लेखन केलेले असले तरी त्यांची अंतःस्फूर्ती काव्यलेखनातच अधिक रमलेली दिसते. म्हणूनच त्यांची कविता वाचताना वाचकांना आत्मदर्शी भावकाव्याचा प्रत्यय येतो. कवी माधव ज्यूलियन, म. म. देशपांडे, ना. घ. देशपांडे यांच्या परंपरेतील हेमकिरण पत्की यांची कविता आहे; मात्र

या थोर कवींचे त्यांच्या काव्यात अनुकरण नसून कवींच्या वृत्तीचे अनुसरण आहे. नुकताच त्यांचा 'या तहानेला तळ नाही'हा पाचवा काव्यसंग्रह वाचकांच्या भेटीस आला आहे. 'सृजनसंवाद प्रकाशना'ने प्रकाशित केलेला ऐंशी पृष्ठसंख्येचा व सहासष्ट कविता असलेला हा संग्रह म्हणजे एक अक्षरवाङ्मय आहे. कुणा रसज्ञाने काळीजकुपीत साठवावे, त्यातला एकेक शब्दगंध जाणिवेतून अंतरंगात उतरवावा आणि त्याची संवेदनेची फुले उमलावीत, भावोत्कटतेने त्याचे हृदय उचंबळून यावे, मिटल्या डोळ्यांनी आपल्याच ठायी ही ऊर्जस्वल स्थिती अनुभवावी, हा शब्दातीत अनुभव जगण्याचा आशय व्हावा.... इतके सामर्थ्य या पुस्तकात आहे. गर्दीतूनही स्वतःपाशी येऊन कवितालेखन करणारे सन्मित्र हेमकिरण पत्की यांची आणि माझी काव्यलेखनासंबंधीची भूमिका एकच आहे. ती म्हणजे, 'कवितेचं लेखन स्वतःसाठी असलं तरी ते दुसऱ्यात रुजल्यावर अधिक अर्थपूर्ण होतं...' हा ज्येष्ठ कवी द. भा. धामणस्कर यांचा सहजोद्गार हेमकिरण पत्की यांची काव्यसृष्टी समजून घेण्याच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचा आहे. चित्रकार शिरीष घाटे यांच्या कलात्मक दृष्टीतून साकारलेले प्रस्तुत पुस्तकाचे मुखपृष्ठ वाचकांचे मन वेधून घेणारे आहे. द. भा. धामणस्करांची पाठराखण, हेमकिरण यांनी म.म.देशपांडे यांचे अर्पणपत्रिकेतून केलेले कृतज्ञ स्मरण, पुस्तकाच्या प्रारंभीच जे.कृष्णमूर्ती, कैसरूल जाफरी आदींची उद्धृत केलेली व संग्रहाच्या अंतरंगाचे सूचन करणारी काव्य अवतरणे वाचकाची दिठी अन्यत्र ढळूच देत नाहीत. हेमकिरण यांची स्वतःची काही रेखाचित्रे या संग्रहात आहेत. ती रेखाचित्रे पुस्तकाला निव्वळ आकार आकृतीचे सौंदर्य बहाल करणारी नाहीत; तर कवीच्या सौंदर्योत्सुक वृत्तीचे, निसर्ग प्रतिमांतून गुंफलेल्या त्यांच्या ठायीच्या संवेदनचित्राचे कलात्मक दर्शन घडविणारीही आहेत. एका प्रवासात मी प्रस्तुत पुस्तक हातात घेतले आणि त्यात अगदी रमून गेले. सलग वाचन केल्यावर लक्षात आले की, एका वाचनात बाजूला सारावे असे हे पुस्तक नाही. जीवनाच्याच प्रवासात अनेकवार साथसंगत करील, आपल्या संवेदनेची कोवळीक जपेल असे हे पुस्तक आहे. खरे पाहता एकदा वाचून संपते ती कविताच नव्हे. हेमकिरण यांची मूळ संवेदना, भावना आणि विचार ह्यांच्या तिपेडीतून त्यांच्या अनुभवाची वीण घट्ट होत गेल्याचे त्यांच्या कवितांमधून जाणवते. निसर्ग प्रतिमा हे त्यांच्या काव्याभिव्यक्तीचे अविभाज्य अंग आहे. आकाश, भूमी, ढग, उन्ह, पाऊस, वारा, सूर्य, झाड, अंगण, माती, वाळवंट, पाखरू, नदी, रान, तळं, दरी अशा एक ना अनेक निसर्ग प्रतिमा त्यांच्या कवितांमधून ठायी ठायी दृश्यरूप लेऊन अवतरतात, सचेतन होतात आणि आपली अवघी दिठीच निसर्गमय करतात. ही प्रतिमासृष्टी खूपच अर्थवाही आहे. कविमनाच्या तन्मयतेचा, केवल प्रेमभावाचा, समर्पणाचा आणि निरागसतेचा प्रत्यय या प्रतिमा निखळपणे देतात. चेतनगुणोक्ती अलंकरणानं सजलेल्या या प्रतिमा कवितागत 'मी'सोबत वाचकांनाही चैतन्यानुभव देतात. अनेक कवितांमधून डोकावणारी कविमनाची दृष्टी नकळत वाचकाचीही होऊन जाते. कवितागत 'मी'चे मन गतकाळाची स्मरण जपण्यात रमते आणि ही अनुभूती काव्यरूपात अवतरते. ती अशी; अंगणात उतरलेलं आभाळ एकट्यानंच वेचायचो, कडुनिंबाच्या झाडावर, खारीगत सरसर चढून, पुन्हा तेच आभाळ निरखायचो, कधी किरणांच्या पायऱ्यांनी भुईवर उतरायचं ('अंगणातलं आभाळ', पृ.२०), जीवनार्थाच्या गाभ्याची ओढ असलेले कविमन 'झाड'या प्रतिमारूपातून वाचकाला आत्मचिंतनाची नवी भूमी दाखवते. ते म्हणते, दाहक पावलांनी ऊन थेट मुळापर्यंत पोहोचल्यावर झाडाला प्रश्न पडतो, ती पाखरभेट, सळसळत्या पानांचं हिरवंगार स्मरणरंजन होतं, की काळानं बांधलेली एक आकाशी घटना होती? उन्हाचा रंग माखून, झाड आपल्याच सावलीत बुडून जातं... ('झाडाला प्रश्न पडतो', पृ. २५)

निवेदनप्रधान काव्य हेही या संग्रहाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य सांगता येईल. अनेक कवितांमध्ये हा कवितागत 'मी'त्याच्यासोबतच वाचकालाही चिंतनाची डूब देतो. आपण या जगात असतो. जगाबरोबर जगत असतो. जग आपले आणि आपण जगाचे अशा भावनेतून आपल्या जीविताचा प्रवास पुढेपुढे होत असतो; पण हे सारे जग सदोदित आपल्या सोबत असते का? अशी प्रश्नांकितता कविमनात डोकावते. प्रतिकूल भवतालासोबत, भ्रान्तमय स्थितीत जगत असताना दूरवरची आश्वासक साथ कवितागत 'मी'ला खुणावते आणि तो लिहितो; नुसत्या नुसत्याच मातीनं आटलेल्या तळ्यानं, दरीत विरल्या उजेडानं, पडलेल्या वाऱ्यानं, निळेपण नसल्या नभानं उच्चारलेले सदाहरित शब्द.. 'आपण सोबत आहोत.' (सदाहरित शब्द, पृ. १८.) जीवनातील खऱ्या साथसंगतीचा व्यापक आशय उजळवणारी अशी ही अल्पाक्षरी कविता आहे. या कविमनाला प्रियेची चिरंतनासाठी ओढ आहे, चिरमीलनाची आस आहे. प्राणसखीच्या तनुस्पर्शापेक्षाही हृदयस्पर्शाची आस गडद आहे. कवितागत 'मी'ला सतत 'तू'ची जाणीव आहे, आंतरिक ओढ आहे. लोकांतात त्याला केवळ 'तू'चेच तीव्रतेने स्मरण आहे. उभयतांत कधी भौगोलिक दुरावा आहे, तर कधी मानसिक दुरावा आहे. प्रत्यक्षात दूर असूनही एक असल्याचा भाव आणि प्रत्यक्षात जवळ असूनही आंतरिक दूरस्थपण असल्याचा भाव कवीला कधीकधी जाणवतो. मात्र अशी कितीही विचार-भावनांची आंदोलने झाली तरी अंतिमतः या कविमनाला शाश्वत सोबतीचीच ओढ आहे, साथसंगतीची, अनन्यतेची आस आहे. म्हणूनच असे भावविभोर कविमन म्हणते, 'ऋतुचक्र हे एवढंच, ऊनपाऊस होण्याचं, दृश्य गळून पडलं की, काकड्यात तुला पांघरण्याचं...' (ऋतुचक्र, पृ. १६) प्रियेच्या विरहासक्तीतील आर्त चित्र म्हणजे ही 'ऋतुचक्र' कविता आहे. कविमनाच्या सौंदर्यपर्युत्सुक मनाची प्रचीती ही कविता देते. या कवितेच्या



अंतरंगात प्रवेश केल्यावर जाणिवेचा एकेक पदर उलगडत जातो आणि आपण केवळ अनुभूतीला प्राप्त होतो. 'मी'चे 'तू'शी असलेले उत्कट, तरल संवेदनशील नाते अशा अनेक कवितांमधून प्रतिबिंबित होते. अशा कविता वाचताना वाचकमन कधी 'मी' होते तर कधी 'तू' होते आणि या मी-तू पणाच्या बोळवणीतून एकात्म संवेदनेचा आनंद घेते. अगदी दिठीतल्या उजेडासारखं तुझंच होऊन राहायचंय मला या कविमनाच्या भावस्थिती इतकाच... किती सुंदर आहे ही भावस्थिती! कविमन जसे 'तू'शी संवादी आहे तसेच स्वतःशीही.

अंतरीच्या संवादातूनच कवीला स्वत्व उलगडत जाते. कविमन म्हणते, एक खेळ आहे, सदैव उजेडाचा अंधाराशी चाललेला आणि देखणा लपंडावही मनाचा अंतर्मनाबरोबर असलेला (दर्शन, पृ. ६७) 'प्रत्ययकारिता' हा आणखी एक लक्षणीय काव्यगुण हेमकिरण यांच्या कवितांमधून अनुभवास येतो. 'पाठवतोय मी तुला' आणि 'तिकडं रात्रभर पाऊस', 'मन लागत नाही' या अशाच प्रत्ययकारी, अद्भुतरम्य

संवेदनाचित्र असलेल्या कविता आहेत. येथे मन भावविभोरही होते आणि 'फूल असते ओंजळीत पण परके त्याचे अंग' वाचताना कातरही होते. आपलं मन सदैवच स्वस्थतेचा, आनंदाचा अनुभव घेऊ इच्छिते; पण शांततेशिवाय स्वस्थता कशी लाभणार! ही शांतता भौतिक जगातली नाही तर आपल्याच भावविश्वातली, अंतरंगातली आहे. ती सृजनानंतरची रसमुग्ध शांतता आहे. ती नीरव नाही, तिथे शांतलं हृदय आपल्याच ठायी रुणझुणते गाणे गातेय... अशा उच्च कोटीतल्या, विशुद्ध अस्तित्वाचे सूचन करणाऱ्या शांततेची कविमनाला आस आहे म्हणूनच ते म्हणते, 'शांतता असते शब्द विसर्जित झाल्यानंतरचं रितं रितं मन, मनापलीकडचं मोहन.' (शांतता, पृ. ३३) प्रस्तुत काव्यसंग्रहात 'आई', 'मित्रा', 'अप्पा' अशी व्यक्तिपर कवितांची त्रिपुटी आहे. यांतूनही कवीच्या काव्यप्रतिभेचे, भावोत्कटतेचे लोभस व भावपूर्णदर्शन घडते. नात्यातील अपार जिव्हाळ्याचे दर्शन घडते. कवितागत 'मी' हा सार्वत्रिक असतो. कदाचित कविता जन्माचं एखादं घटित असेलही, त्याला एखाद्या भौतिक घटनेचा आधार असेलही; पण जेव्हा ती कविता विशुद्ध कविता म्हणून आकाराला येते तेव्हा ते कवीचे चोख कवितापण असते. हेमकिरण यांना प्रत्यक्ष अनुभवायला असा कलात्मक घाट देणे, कवितानुभवात त्याचे रूपांतरण करणे नेमके साधले आहे. जीवनानुभवाचे काव्यानुभवात रूपांतरण यामध्ये फारसा कालावकाश हे कविमन ठेवताना दिसत नाही. अस्तित्वाच्या गाभ्याला भिडणारा अनुभव कवितारूप घेताना दिसतो. त्यामुळेच अनेक कवितांचे बाह्यरूप त्यांच्या अंतरंगाशी इतके तद्रूप होऊन गेले आहे की, त्यातल्या रूपकात्मकतेने कवितेचा घाट सौंदर्यपूर्ण बनवला आहे. 'काय गावे आता...' (पृ.७८) आणि 'गाभा' (६५) या कविता अशा सौंदर्यपूर्ण घाटाचे उत्तम उदाहरण आहेत. प्रातिभशक्तीचे बीज उपजतच हेमकिरण यांच्या ठायी आहे. संथपणे, संयतपणे द्वैतातून तद्रूपतेची अत्युच्च पातळी गाठण्याचे सामर्थ्यही या कविमनात आहे. चांगली कविता ध्यानावस्थेतच होते आणि तीच वाचकालाही ध्यानावस्थेत नेऊ शकते. प्रस्तुत संग्रह वाचताना वाचकाला हीच अनुभूती येते. 'द पोएटिक प्रिन्सिपल' या ग्रंथात 'पो'ने विशुद्ध कवितेचा सिद्धान्त मांडलाय. तो म्हणजे काव्य म्हणजे सौंदर्याची लयबद्ध निर्मिती तर जॉर्ज मूरच्या मते, विशुद्ध काव्य विचारांपासून मुक्त असते आणि आविष्काराच्या माध्यमासाठी ती शब्दांच्या अंतःसंगीतावर पूर्णतः अवलंबून असते. हेमकिरण यांची कविता अशी विशुद्ध जाणिवेचा, सेंद्रिय एकात्मतेचा विषय आहे. मूलतः रस ही आपल्या चित्तवृत्तीची स्थिती आणि चर्वणास्वाद हा तिचा आत्मा आहे. अशी आस्वाद्यता ज्या ज्या विषयाच्या चिंतनातून लाभते, त्यातून आपले रसज्ञपणही उन्नत होत जाते. प्रस्तुत कविता हाच उन्नयनाचा आनंद आपल्याला देतात. हे कविमन अनेक अनाकलनीय, गूढरम्य वाटांवर वाचकांना घेऊन जाते. कधी चकवते, कधी अर्थाच्या गाभ्याशी जाईतोवर थकवते, भ्रमवते; पण एकदा का भाव उकलला की, मग ते आनंदाचा ठावच होऊन जाते. तद्वत वाचकांचे भावजीवन शाश्वत आनंदाने उन्नत करणारी, जाणिवा विकसवणारी, स्वतःत अपरिहार्यपणे डोकवायला लावून चिंतनशील करणारी, एकांताचा समृद्ध आशय दर्शवणारी, संवेदना खुलवणारी हेमकिरण यांची कविता मराठी काव्यकलश भावसंपन्न करणारी आहे. इतकेच नव्हे तर जाणत्या वाचकांचे, काव्यरसिकांचे पुस्तकविश्व समृद्ध करणारे असे हेमकिरण यांचे सर्वच काव्यसंग्रह आहेत. अशा समृद्ध भांडाराने कवीप्रमाणेच आपलाही जाणीवनिष्ठ अंतरंगाचा प्रवास पूर्णत्वाच्या दिशेने जाईल यात शंका नाही.

---

**डॉ. प्रिया निघोजकर**
पुणे, संपर्क : ९८९०६४२१६१



# देवदान पावलं

**डॉ. शैला जगदंबे**

झोपेतून डोळे चोळत- चोळत मी बाहेर दरवाज्याच्या ओट्यावर येऊन उभी राहिले. थंडीमुळे सकाळचे कोवळे ऊन खायला खूप छान वाटत होते. स्वेटर मोठे असल्यामुळे जरा जास्तच उबदार जाणवले. आमच्या दरवाज्याच्या बाहेरचा ओटा ही माझी सगळ्यात आवडीची जागा होती. मी हात, तोंड उन्हाला शेकून घेत होते.. सकाळच्या प्रहरी कुठून तरी लांबवरून टाळ वाजत असल्याची किणकिण ऐकू आली. मग त्या दिशेने माझे कान चाहूल घेत होते... रडल्यासारखा बारीक स्वरही ऐकू येत होता. असे टाळ वाजवत कोण रडतं? म्हणून मी पुन्हा लक्षपूर्वक ऐकत होते.. टाळ वाजवत रडक्या सुरात कुणीतरी भजन गात होतं.. पण इतक्या सकाळी कुणाच्या घरी भजन होत असेल? सकाळी सकाळी कोणता कार्यक्रम असेल.. काकड आरतीसुद्धा पहाटे पाचलाच असते. मला फारच आश्चर्य वाटले.. इतक्यात आतून आजीचा आवाज आला. आजोबांना चहा नेऊन देण्यासाठी आईने आत बोलावलं होतं.अंघोळ झाल्यावर मी पुन्हा ऊन खाण्यासाठी बाहेर दरवाजाच्या ओट्यावर येऊन थांबले; तर पुन्हा तोच टाळाचा आवाज येऊ लागला. पण.. जरा मोठ्यानेच येऊ लागला. कुणी माणूस देवाची गाणे म्हणत.. ताला, सुरावर टाळ वाजवत असल्याचा आवाज होता तो.. मात्र आता स्पष्ट ऐकू येत होता.. आमच्या रंगू आत्या मी का उभी आहे अशी? म्हणून पाहायला बाहेर आल्या तेव्हा मी त्यांना विचारलं, ''हे देवाचं भजन कुणाकडे चालू आहे? मी उठल्यापासून असा टाळाचा आवाज ऐकू येतोय. पूर्वी लांबून ऐकू आला आणि आता जवळून येतोय.'' त्यावर आत्या, ''अगं भजन नाही, गावात वासुदेव आलाय. भल्या सकाळीच तो प्रत्येकाच्या घरी येत असतो. तू बाहेर उभी राहिलीस तर शाळेला जायला उशीर होईल..'' त्यांचे बोलणे ऐकून, शिवाय शाळा म्हटलं की, वरटी शंकर मामा डोळ्यासमोर आला.. आणि मला धस्स झाले. तो आमच्या शाळेचा सेवक होता.. शंकर मामा अतिशय कडक स्वभावाचा, शिस्तीचा, पांढरी धोती, शर्ट, खांद्यावर मोठा रुमाल, पायात जोडा असा त्याचा पोशाख. मामा उंच, काटक, गोल- गोल डोळ्याचा, दोन्ही गाल खोल गेलेले खोबऱ्यासारखे.. काळा कुळकुळीत म्हातारा होता. शाळा सकाळी दहाला होती; पण तो नऊ वाजल्यापासून हातात छडी आणि दुसऱ्या हातात धोतीचे टोक धरून, घराघरात जाऊन, सगळ्या

मुलांना शिव्या देऊन, वेळेवर शाळेत जाण्यास सांगायचा.. गावभर त्याची सकाळची फेरी असायची. शंकर मामाची स्वारी आमच्या वाड्यात साडेनऊला असायची. गावातील उंच ऐसपैस बुरुजावर आमचे १५ घरं म्हणजेच वाडे होते. गावातील श्रीमंत, प्रतिष्ठित लोकांचा हा बुरुज आणि हे वाडे होते. लोक कामाशिवाय आमच्या वाड्यात सहसा कोणी फिरकत नसत.. अपवाद होता तो फक्त शंकर मामाचा.. शेकोजी पाटलाच्या अंगणातूनच त्याचे मोठमोठे आवाज आमच्या वाड्यापर्यंत यायचे, ''शाळेची वेळ झाली तरी निघाल्याच नाही का.. पोरींचं गंध पावडर संपतच नाही. चला लवकर.'' असा मोठ्या आवाजात खेकसायचा.. वाड्यातील आठ दहा मुलींना, सगळ्यांनाच त्याचे बोलणे ऐकू यायचे. शेकोजी पाटलाच्या अंगणात आडापाशी एक आवाज द्यायचा. तसाच आमच्या वाड्याच्या बाहेरील अंगणातूनही ओरडायचा. मामाच्या आवाजाला आम्ही सगळ्याच खूप घाबरत असू. आमच्या शेजारच्या निमू आत्या, मी, माझी बहीण, शेकोजी पाटलाच्या वाड्यातील सूक्षमा, पद्मीन त्यांच्या समोरच्या मानकऱ्याच्या वाड्यातील नंदा, गौराजी पाटलाच्या वाड्यातील कमल, त्यांच्या बाजूच्या माळकऱ्याच्या वाड्यातील सुनीता, कावेरी, अनिता इतक्या आम्ही मुली होतो. कुठूनही शंकर मामाने ओरडले तरी आम्हाला वाड्यात बरोबर ऐकू यायचेच. आमच्याकडून शंकर मामा आमच्या पाठीमागच्या बेरोळ्याच्या वाड्याकडे जात. तिकडे गौराजी आणि पंपू होते.. उशीर झाला की, ते शाळेत धावत, पळत सुटत. हे कित्येक वेळा मी त्यांना असे आमच्या दारातून पाहिले होते.. आणि मामा त्यांच्या मागे हातात हिरवी छडी घेऊन सुटलेला.. असा मामाचा अवतार पाहून, आम्हाला खूप भीती वाटायची. आत्याने शाळा म्हटलं की, मला हे सगळं आठवलं आणि मी पटापट आवरून शाळेसाठी तयार झाले. शाळेचं दप्तर पाठीवर मी दाराजवळ येताच-एक विचित्र प्राणी येताना दिसला; पण तो प्राणी नसून माणसासारखा, माणसाचे शरीर; पण डोक्यावरती मोराचे पंख फुटलेले दिसले... मी पुन्हा पाहिले तर तो माणूसच दिसत होता. चित्र-विचित्र 'बहिरूपी' सारखा. मी पूर्वी कधीतरी हा शब्द आजोबांकडून ऐकला होता. तो आमच्या वाड्याच्या पायऱ्या चढून वर येत होता. त्या व्यक्तीला मी आश्चर्याने पाहतच राहिले आणि घाबरून मी दाराजवळ बाजूला जाऊन उभी राहिले. त्याने ढाळजत येऊन स्वतःची झोळी, हातातील खूप साऱ्या नवीन कपड्यांच्या घड्या, टाळ खाली ठेवला, आणि स्वतःला आवरून त्याने व्यवस्थित ठाण मांडून बसला. झोळीतून एक उपरणं काढून, त्यात ते नवीन कपडे ठेवून, त्याचं एक गाठोडं केलं आणि पलीकडे आजोबा दिसताच पाटील राम राम म्हटला. आजोबांनी त्याची फार आपुलकीने विचारपूस केली. ''सगळं आनंद आहे जी'' असे तो बोलला. मी त्याला लांबूनच पाहत होते. मला त्या बहिरूपीच्या जवळून जायला भीती वाटत होती. शाळेत जायचे आहे उशीर होतोय; पण हा विचित्र माणूस बसलाय.. त्याच्याजवळून जावेच कसे?असा प्रश्न पडला. तेवढ्यात आजी अंगणातून आली. तिने मला ''भिऊ नको हा वासुदेव आहे. चल पुढे ये.'' म्हणून माझा हात धरून तिने वाड्याबाहेर आणून सोडले. ''अगं तो देवाचा माणूस असतो. देवाची गाणी गाऊन, आपल्याकडून वर्षाचं धान्य घेऊन जातो आणि आपल्याला आशीर्वाद देतो.'' असं आजीने सांगितलं; परंतु असा वासुदेव नावाचा प्राणी मी पहिल्यांदाच पाहिला.

डोक्यावर मोरपंखाचा मोठा टोप घेऊन, पायऱ्या चढून, वाड्यात हा कसा आला असेल? मोरपंख त्याच्या डोळ्यापर्यंत आलेले, त्याचा चेहरा त्यामुळे झाकून गेलेला.. डोळ्याला दिसलंही नसेल.. मग येताना ठेच कशी लागली नसेल?.. असा विचार करत असतानाच मी चक्क रावसाहेब पाटलाच्या वाड्याजवळ आले.. त्यांच्या वाड्यासमोरूनच बुरुजावरून खाली जाणारा एक ऐसपैस घसरगुंडी सारखा दगडी रस्ता होता. छोट्या-मोठ्या, दगडा

दगडातून खाली उतरताना खूप भीती वाटली.. हे लहान मोठे दगड म्हणजे आमच्या वाड्यातील प्रत्येक व्यक्तीचे पाऊलच जणू! जेवढी माणसे तेवढेच दगड.. बाहेर ओट्यावरच आजी दिसल्या.. हळू जा म्हणाल्या.. म्हणून मग मी वाड्याच्या चिरेबंदी ओट्याच्या मदतीने सावकाश खाली उतरले... एकदम हायसे वाटले.. हा भीतीदायक रस्ता खरा परंतु रोज रावसाहेब पाटलाच्या वाड्याबाहेर, ओट्यावर किंवा दारात पणजी, कृष्णाआजी, रावसाहेब आजोबा दिसायचेच.. त्यामुळे मला खाली उतरताना काही भीती नसतेच. त्यांच्या घरचे, रोज मला कोणी ना कोणी हळू जा, पडशील असं म्हणायचे. आता शाळेपर्यंतचा रस्ता हा सरळ मोकळाच होता.. वाटले आमचा वाडा हा एक गाव आणि बुरुजाचा खालचा हा दुसरा गाव... असा विचार करून मी शाळेत आले. इंटरव्हल झाली तेव्हा काही मुली काल आमच्या घरी वासुदेव आला होता; म्हणून वर्गात चर्चा करू लागल्या. त्याच्या मोरपंखी पिसाऱ्याच्या टोपाविषयी सांगू लागल्या तसेच आमच्या घरी त्याने कोणकोणते गाणे म्हटले? तो किती वेळ आमच्या घरी होता.. वगैरे. मी त्या मुलींमध्ये जाऊन सगळी चर्चा ऐकली. वाटले आपल्या नशिबात वासुदेवाचे गाणे ऐकायचे नव्हतेच.. या मुली जे सांगत आहेत ते सारे खरे असेल का, तो एक तास प्रत्येक घरी थांबत असेल का, सगळ्यात शेवटी देव दान पावलं हे गाणं म्हणत असेल का? यामुळे आता माझ्या मनातली वासुदेवाविषयीची भीती थोडी दूर झाली आणि मला त्याच्याविषयी खूप कुतूहल निर्माण झाले. मधल्या सुट्टीत मी जेवायला घरी आले; तेव्हा जेवत-जेवत आजी, आजोबांना वासुदेवाविषयी विचारलं. वर्गातल्या मैत्रिणी जे सांगत होत्या, ते खरं की खोटं म्हणून शहानिशा करून घेतली. ''आजी मला वासुदेवाला पाहायचे होते, मला त्याचे गाणे ऐकायचे होते.. आपल्याकडे तो रविवारी यायला हवा होता.'' आजी ''हां.. हो..'' म्हणाली. शाळेमुळे मला वासुदेवाच्या गमती-जमती पाहता आल्या नाहीत म्हणून फार वाईट वाटले. मी आजोबांना म्हटले, ''आजोबा, तुम्ही त्याला रविवारी परत बोलवा ना.'' यावर आजोबा म्हणाले की, तो काही भिकारी नाही.. आपल्याकडे पुन्हा यायला.. आजोबा वासुदेवाविषयी सविस्तर माहिती सांगू लागले, ''तो देवाचा भक्त आहे. देवाची भक्ती, गुणगान करणारा, गोसाव्यासारखा तो देव माणूस आहे. शेतातले धान्य घरी आले की, तो गावोगाव जाऊन वर्षाचे धान्य मागून घेतो आणि आपल्याला खूप आशीर्वाद देतो. देवाचे गाणे गाऊन तो आपल्यावर कृपादृष्टी ठेवायलाही देवाजवळ विनंती करतो. शिवाय आपल्या कुळाचा उद्धारही तो करतो बघ. आता तो पुढच्या वर्षीच आपल्या घरी येईल.'' वासुदेवाचा परिचय समजावून घेऊन, मी जेवण आटोपून पुन्हा शाळेत गेले. तेव्हा वर्गातल्या एका मैत्रिणीकडे वासुदेव आला होता, असे तिने सांगितले. सबब तिला शाळेत यायला उशीर झाला. ''मी वासुदेवाचे गाणे संपेपर्यंत घरीच होते'', असे तिने म्हणताच.. मी हो का? म्हणून मान डोलवली.. पण काही फायदा नाही असे वाटून मी नाराज झाले. तेव्हा तिने सांगितले की, वासुदेव सकाळ ते दुपारी १२:०० वाजेपर्यंतच, जेवढ्या घरी जाता येईल तेवढीच घरं मागतो. तो कालच आपल्या गावात आलाय, रोज फार तर पाच ते सहा घरच मागत असेल. अजून तो पंधरा दिवस तरी आपल्या गावात असणारच आहे. तेव्हा तू तुझ्या मामाच्या आळीत केव्हा जाईल लक्ष ठेव, तिकडे गेला की, मामाच्या घरचा नंबर येईलच; तेव्हा तू मामाच्या घरी जाऊन त्याला पाहून घे. तिचे हे बोलणे मला पटले.

माझ्या मामाचे घर गावातच होते. आमच्या वाड्याच्या खाली. चावडीच्या पुढच्या, मठाच्या बाजूच्या आळीत मामाचे घर होते. शाळा सुटल्यावर मी तडक मामाच्या घरी गेले. वासुदेवाविषयी आजीला सांगितलं. वासुदेव आमच्या आळीला आला की आजी सांगते म्हणाली. आजीकडे शेव, लाडू खात बसल्याने मला घरी जायला उशीर झाला. दारातच आजोबा माझी वाट पाहत बसले होते. मी आणखी

घरी कशी आले नाही.. वाड्यातल्या सगळ्या मुली तर आल्या; म्हणून ते बाहेरच माझी वाट पाहत उभे होते. आजोबांना मी वासुदेवाविषयी सर्व काही सांगितलं. ''हात तिच्या'' म्हणून आजोबांनी कपाळावरच हात ठेवला. ''बरं.. आजोबा मी शाळेत डुमा मारलं तर चालेल का? पण तुम्ही शंकर मामाला तसं बोला म्हणजे शंकर मामा आमच्या वर्ग शिक्षकांना सांगतील. न सांगताच घरी राहिले तर मार पडेल.'' आजोबांनाही हे पटलं होतं. वासुदेव हा मामाच्या घरी आला की, आपण शाळेत जायचे नाही, असे पक्के ठरले. आजोबांनीही हो म्हणून दुजोरा दिला; ''पण.. तुझी आई रागवेल शाळेत नाही गेलीस तर.'' मग आजीने माझी बाजू घेतली. आजी आईला बोलते म्हणाली. मग आता माझा वासुदेव पाहण्याचा प्रश्न सुटला होता. बाबांना उमरीहून शाळेतून यायला उशीर होतो. त्यांना सांगून काही फायदाच नाही. बरे झाले आजोबा आपल्याला नाही म्हणत नाहीत; म्हणून खूप बरे वाटले.

दोन दिवसांनी आमच्या वाड्यातली 'कमल' तिच्या मोठ्या बाबांकडे गेली. त्यांचे घर माझ्या मामाच्या घरासमोरच होते. आजीने तिच्याबरोबर निरोप दिला की, वासुदेव येणार आहे. घरी ये. तिने प्रार्थनेच्या वेळीच मला सांगितले. पहिला तास सुरू झाला. माझे वर्गात लक्ष लागेना. व्हटकर बाईंनी कॅलेंडरवरची गाणी म्हणून घेतली. त्या गाण्यात काही रस वाटत नव्हते. तास कधी संपेल असेच झाले. दुसरा टोल ऐकू आला. दुसरी तासिका गणिताची, नलबलवार सर एका मागून एक गणितं फळ्यावर लिहून समजावून सांगत होते; पण लक्षच लागत नव्हते वासुदेव मामाकडे आला तर नसेल ना... कमल आधीच भेटली असती तर मी शाळेत आलेच नसते; पण आता पर्याय नाही म्हणून मी इंटरवल व्हायची वाट पाहत होते. तेवढ्यात घंटाच ऐकू आली. झाली एकदाची इंटरवल म्हणून मी दप्तर घेऊन सरळ मामाच्या घरी निघाले. वाटेत रावसाहेब पाटलाच्या पायऱ्यांजवळ वाड्यातलं कुणी भेटू नये म्हणून देवाचे नाव घेतले. भीतभीत चावडीच्या थोडे.. पुढे, ढगे मामांच्या घरासमोरून, डावीकडे वळून मामाच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्यावर आले आणि सुटकेचा निःश्वास टाकला. बरं झालं वाड्यातलं कुणी पाहिलं नाही ते. भेटलं असतं तर.. शाळा बुडवून कुठे निघालीस? म्हणून पुन्हा शाळेत पाठवलंच असतं. आजी अंगणात काहीतरी काम करत होती. वासुदेव मामाकडे तर दिसतच नव्हता. आजीने तो अजून आलाच नाही असे सांगितले. आता मात्र खूप छान वाटले. वर्ग चालू असताना जर वासुदेव आला असता तर मला काही पाहायला मिळाला नसता. अशी आजीशी बोलत मी ढाळजत आले नि पाहते तर काय, मामाच्या घरासमोरच्या घरी, बाबू तात्याकडे, मोरपिसाचा टोप घातलेला एक माणूस लहान दारातून खाली वाकून जाताना दिसला. हा वासुदेवच असणार म्हणून मी बाहेरच्या ओट्यावर येऊन त्यांच्या दारातून आत पाहिलं. वासुदेव खाली बसलेला तो तिथल्या आजीशी काहीतरी बोलत होता. मग त्याने टाळ वाजवायला सुरुवात केली. मैत्रिणीने वर्गात जे काही सांगितले त्यावरून हा नक्की वासुदेवच आहे हे कळाले.. वाटले त्यांचे घर झाले की, तो लगेच मामाच्या घरी येणार; म्हणून मी खूप खुश झाले. मामाचे आणि बाबू तात्याचे दार हे एकमेकांसमोरच होते. त्यामुळे बाहेरील ओट्यावर बसून मी वासुदेव पाहत राहिले. अर्धा तास गाणी म्हणून झाल्यावर आजीने त्याला धान्य, धोती, काही कपडे दिले. ताटात काहीतरी दिसत होते. बहुधा पूजेचे ताट होतं. पंचपाळही त्यात होतं. त्याने आजीला कुंकू लावलं. दानाचा स्वीकार केला. तसेच ताटाला हात लावून पाया पडला. त्यात आजीने पन्नास रुपये ठेवले. मग त्याने 'देवदान पावलं' हे गाणं म्हणायला सुरुवात केली. मला लगेच मैत्रिणीची आठवण झाली; कारण देवदान हे गाणं खूप खास आहे, असं तिने मला सांगितलं होतं. तेव्हा ते गाणं ऐकायला फार मजा वाटली. आता तो सर्व काही घेऊन, त्यांच्या घरातल्या आजोबा, पणजोबा यांचे नाव घेऊन, देवदान पावलं;

म्हणून त्यांच्या कुळाचा उद्धार केला, आणि निघण्यासाठी उठला. ते पाहून मी लगेच ओट्यावरची उठून त्वरित ढाळजतल्या ओट्यावर जाऊन बसले. घरासमोरच्या दारातून टोपाला एक हात लावून,मान खाली वाकून, एकेक पायरी हळुवार उतरून तो शेवटच्या पायरीवर आला आणि तिथून एका उडीच्या टांगेत आमच्या शेवटच्या पायरीवर आला. मला नवलच वाटले. काखेत झोळी, एका हातात कपड्याचे गाठोडे, दुसऱ्या हातात टाळ, डोक्यावर मोर टोप घालून, इतके ओझे घेऊन वासुदेव उडी मारतो, म्हणजे.. काय आश्चर्यच आहे! पण आजीने सांगितलं ना तो देवाचा माणूस आहे. हां.. म्हणूनच त्याला हे असं उडी मारणे शक्य झाले असेल. देवाच्या माणसाला असं काहीही शक्य असतं. बरोबरच आहे. वासुदेव टोपाला हात न धरता, न वाकताच आत आला; कारण मामाच्या घरचे दार खूप मोठे होते. ढाळजतल्या ओसरीवर येऊन तो बसला. मला त्याची जवळून भीती वाटत असल्यामुळे मी ढाळजतल्या ओट्यावर लांब जाऊन त्याच्याकडे पाहत होते. ''अनशा माय, बरे हाय काय?'' म्हणून त्याने आजीला विचारलं. ''हो'' म्हणून आजीने त्याच्या घरची, त्याच्या बायको, मुला- बाळांची चौकशी केली. त्यांचे हे बोलणे ऐकून मला वाटले, तो आपल्यासारखाच माणूस आहे. देव माणूस असला तरीही आपल्यासारखाच तो बोलतोय, आजीही त्याला पूर्ण ओळखते. त्याची बायको, लेकरं ही आपल्यासारखीच असणार. मग झाले तर.. पण.. त्याची मुलंही छोटे वासुदेवच असतील का? त्यांच्याही डोक्यावर छोटे- छोटे मोर टोप असतील का? छोट्या बाल वासुदेवाचे रूप माझ्या डोळ्यासमोर आले. शाळेच्या नाटकातील छोटा बालकृष्ण जसा असतो तसाच छोटा वासुदेव पण असणार.. बरोबरच आहे. गाईचं छोटं वासरू गाईसारखंच, मांजरीची पिल्ले मांजरीसारखीच, रस्त्यात कुत्र्याची पिल्ले ही कुत्र्यासारखीच दिसतात तसेच वासुदेवाची लेकरं वासुदेवासारखीच ..अशी सगळ्यांची पिल्लं माझ्या डोळ्यासमोर तरळत होती. छोटे- छोटे वासुदेव ह्या मोठ्या वासुदेवाच्या भोवताल, मागेपुढे करत, खेळत असल्याचा भास झाला; पण त्या छोट्या वासुदेवांना एवढी लांबलचक गाणी येत असतील का? देव दान पावलं हे गाणं त्यांना तोंडपाठ झालं असेल का? असे अनेक प्रश्न मनात येत होते. मी वासुदेवाला लांबूनच पण पूर्ण पाहून घेतलं. त्याचे गाणे ऐकले. मान हलवत, देवदान पावलं हे गाणं त्याच्याकडे पाहून ऐकायला भारीच मजा आली होती. आपल्याच तंद्रीत, डोळे बंद करून, मान हलवत, टाळ वाजवत, तोंड वेडेवाकडे करत,

**पांडुरंगाच्या नावानं देव दान पावलं**
**दत्तप्रभूच्या नावानं देव दान पावलं**
**बालाजी देवाच्या नावानं देव दान पावलं**
**शंकराच्या नावानं देव दान पावलं**
**खंडेरायाच्या नावानं देवदान पावलं..**

असे जीव ओतून, कितीतरी देवांची नावं घेऊन मात्र डोळे मिटूनच देवदान पावलं हे गाणं म्हणत होता, आणि सरते शेवटी ''हरी विठ्ठल, पांडुरंग, हरी हरी वरदे. हरे कृष्ण.. पांडुरंग पाटलाचा वाडा भाग्याचा होवो. धनधान्य पिकून पांडुरंगाच्या कृपेने बरकत येवो. वाडवडिलांच्या पुण्याईने सुख समृद्धी लाभो.'' असे खूप काही काही बोलून तो थांबला. मग माझ्या असे लक्षात आले की, तो इतका वेळ असे भजन करतो, गाणे गातो, म्हणूनच याचे गाल बसलेले असावेत. खोल खोल गेलेले आमच्या शंकर मामासारखेच. आजीने त्याच्यासाठी जेवणाचे ताट आणले; पण तो न जेवता सगळं काही बांधून घेतलं. ''आता वरटी रामाकडे माझं बिऱ्हाड आहे. तिथे गेल्यावरच खातो माय.'' म्हणून सगळं आवरून, पाणी मागून प्यायला. मामीजी त्याच्यासाठी दोन लुगडे, एक साडी, एक धोती, मोठा रुमाल, चार पाच ब्लाउजपिस असं काय काय घेऊन आल्या आणि तिकडून आजीने ज्वारी, गहू, तांदूळ, डाळ असे धान्य आणून दिले; पण त्याचं काही मन समाधान होईना. त्याने बायकोला बांगड्या भरायला पैसे मागितले मग मामीजींनी शंभर रुपये

त्याला दिले.. तेव्हा कुठे त्याच्या चेहऱ्यावर चांगले भाव दिसले. मी हे सगळं ओट्यावरून दुरूनच पाहत होते. त्याच्याजवळ जायचे काही धाडस होत नव्हते; पण आजी, मामीच्या धाडसाचे मला नवल वाटले. त्या दोघीही घाबरत नव्हत्या. झोळी, गाठोडे घेऊन तो दारातून आनंदाने निघून गेला. वासुदेवाला पाहायचे स्वप्न आता पूर्ण झाले होते खरे, मात्र जवळून मी काही वासुदेवाला पाहू शकले नव्हते.

या वर्षी चौथीला बोर्ड परीक्षा असते म्हणून रोजचा अभ्यास रोज करायचा आमचा धुमधडाका चालू होता. रोज सकाळी सहा वाजता आई बरोबर उठणे. दोन तास अभ्यास करणे. हे नित्य नियमाने चालू होते. दिवाळी झाली आता परीक्षा लवकरच येतील; म्हणून अभ्यासाचा वेळ वाढवला होता. माझ्या अभ्यासाचे आजी-आजोबांना फार कौतुक वाटायचे. बापासारखी पोरगी निघणार म्हणून आजोबा खुश राहायचे. आज शनिवार असल्यामुळे सकाळी उठायची घाई नाही; म्हणून मी रात्री फार वेळ जागून गणितं सोडवत बसले होते. तिथेच कधी डोळा लागला हे कळलेदेखील नाही. आई सकाळी लवकर उठून पाहते तर काय मी तशीच चटईवर झोपलेली. आईने मला उठवून वरती पलंगावर झोपवलं. मी आज रविवार असल्यामुळे उशिरा उठले. डोळे चोळत-चोळत ढाळजत आले; आणि पाहते तर काय चक्क वासुदेव बसलेला. आजोबांशी त्याचे बोलणे चालू होते. त्याचा रिकाम्या चहाचा कप बाजूलाच दिसला.. म्हणजे तो खूप वेळेचा आलेला दिसतोय; पण तो तसाच पूर्वीसारखाच दिसत होता. मी त्याच्याकडे पाहतच राहिले. त्याचा मोरपंखी टोप खराब झालेला नव्हता. अजूनही छानच दिसत होता. भली मोठी मोराची पिसे असलेली टोपी, मोरपिसांच्या पांढऱ्या काड्यांची गोल गोल पैशाची डिझाईन केलेली, सगळ्यात वर मंदिराच्या कळसाप्रमाणे पितळी कळस, त्यात मोर पंखाच्या काड्याने हा मोर टोप बनवलेला दिसला. त्या टोपातून त्याचे बारीक तोंड दिसत होते. फ्रॉकसारखा पांढरा कुर्ता, धोती, कमरेला लाल मोठा रुमाल बांधलेला.. गळ्यात रंगीत मण्यांच्या माळा.. कपाळावर विठ्ठलासारखे रेखीव पिवळे अष्टगंध. कानावर, गळ्यावर चंदनाचे पांढरे पिवळे ठिपके, जणू गोल टिकल्याच दिसू लागल्या. उंच गव्हाळ वर्णाचा.. सरळ ताठ बसलेला तो मला दिसला. ''दिदीची झोप झाली वाटते. जा दूध पिऊन या. आई बोलवायली तुम्हाला.'' म्हणून त्याने मला काढून दिले. देवाचे नाव घेऊन, हातात टाळ घेऊन त्याने गाणे म्हणायला सुरुवात केली. मी लगेच ढाळजत वासुदेवा समोर येऊन बसले. तो खूप तल्लीन होऊन गात होता. डोळे मिटून गाताना तोंड सारखे वेडेवाकडे होत होते, भुवया, कपाळ उंचावत होते तर कधी मान फिरवून, दिशा बदलत होती. मी मामाकडे जे लांबवरून त्याला पाहिले होते; पण मला आता त्याच्या चेहऱ्यावरच्या भावांसह अगदी जवळून पूर्ण पाहता आले. म्हणून वासुदेव मला चांगलाच कळाला. आता पूर्वीसारखी मला वासुदेवाची भीती वाटत नव्हती. कितीतरी वेळ मी त्याचे गाणे ऐकत समोरच बसले. मध्येच मला त्याने आजोबांच्या वडिलांचे नाव काय? असे विचारले. मी म्हटले, ''मला माहिती नाही.'' मग मी आजोबांकडे जाऊन विचारून आले. 'ईरबा पाटील' आहे असे त्याला सांगितले. तेव्हा तो नवीन गाण्यातून पणजोबा, आजोबा, बाबा सगळ्यांचे नाव घेऊन कुळाचा उद्धार करत होता. हे ऐकून मला खूप छान वाटले. आपल्या कुटुंबाबद्दल इतकं महान कुणीतरी बोलत आहे. हे ऐकूनच खूप भारी वाटत होतं. घराचा उद्धार करतोय हा.. वासुदेव खरंच किती चांगला आहे.. म्हणून मला त्याच्याबद्दल खूप आदर निर्माण झाला. दिलेले धान्य, पैसे घेऊन, पटकन गाणं उरकून, तो निघून जात नाही. तर तो सगळ्या देवांचे गाणे म्हणून आळवणार, विनंती करणार, मग नेहमीप्रमाणे शेवटी दत्तराम पाटलाचा वाडा सुख समृद्धीत राहो म्हणणार. हे सगळं खूपच वेगळं पुण्याचं काम वाटत होतं. आजी, आजोबा, बाबा त्यामुळेच वासुदेवाला आदराने बोलत असतील. त्याने मागेल ते त्याला मिळत असे. आता त्याचा मोर्चा बाबांकडे वळवला. ''थंडी खूप पडली

आहे यावर्षी तुमचं एक स्वेटर द्या गुरुजी..'' आणि मला म्हणाला की, ''तुमचे बाबा तुमच्या एवढे होते, तेव्हापासून मी तुमच्या घरी येतो..'' आजोबांनीही ''बरोबर आहे'' असे म्हटले. बाबांनी अलमारीतून स्वतःचे एक नवीन स्वेटर त्याला दिले. ''गुरुजीसारखे दानशूर माणसं खूप कमी आहेत पाटील.. गुरुजी नाही कवा म्हणणारच नाहीत.'' असं तो आजोबांना बोलत होता. ''फक्त तुमच्याच वाड्यात काही मिळते. बाकी वाड्याच्या खाली गावात कोणी दान देत नाहीत. दिलं तेवढंच घ्यावं लागते. तुमच्यासारखे ओळखणारे फार कमी लोक आहेत जी!'' तो फार कळवळ्याने बोलत होता. ''माझ्या वाट्याला तुमचं गाव आलंय गुरुजी; पण पोरांना असे घरोघर मी जाऊन मागावं वाटत नाय बघा. बंद करा मागणे म्हणले; पण या निमित्तानं सगळ्यांच्या भेटीगाठी होतात. जोवर शरीर साथ देते तोवर यावं. आपली ही परंपरा हाय; म्हणून मी आपला येतो.'' मध्येच आजोबा म्हणाले, ''या वर्षी उशिरा आलास दरवर्षी दिवाळीच्या आधीच येत होतास.'' यावर ''काय करू पाटील मुलं नाहीच म्हणत होते. तब्येत बरी रहात नाही माझी आता पहिल्यासारखी. वझं घेऊन घरोघर जाणं आता झेपत नाय.. शिवाय एक– एक महिना घराभाहीर राहाव लागतंय; म्हणून बायको पण जाऊच नका म्हणत होती; परंतु तेवढंच आपलं हक्काचं आहे. म्हणून आलो पाटील.'' आजोबा त्याचं बोलणं लक्षपूर्वक ऐकत होते. ''आता भावाच्या वाटण्या झाल्या तुमचं गाव पिंपळगाव, हरेगाव, गुजरी हे गावं माझ्याकडे आहेत आणि आटाळा, येल्लापूर हे वरचे गाव भावाच्या वाट्याला गेले. भाऊ आता कुठे जात नाही मागायला; परंतु भावाचा मुलगा मात्र दरवर्षी जातो. माझा पुतण्या आमची परंपरा सांभाळतो बघा. माझ्याच मुलांना मात्र हे आवडत नाय.'' तो फार तळमळीने सांगत होता.. भरभरून बोलत होता. माझ्या आजीला तो ''तुमचे चार–पाच घर सोडले तर इतर घरी लोकं फार काही चांगले लुगडे, खणं देत नाहीत... पाटलीन माय, तुम्ही देलेलं लुगडं बायको वरिसबर घालते बघा. तुम्ही प्रेमानं विचारपूस करता, बोलता म्हणून पहिल्यांदा वाड्यावरच यावं वाटते. हक्कानं इथेच मागतो माय तुम्हाला. मागच्या वरसी तुम्ही दिलेलं लुगडं बायकोनं मुलाच्या लग्नात घातलं.. दुसरं कोणी इतकं चांगलं लुगडं देत नाय.'' त्याचे बोलणे मी लक्षपूर्वक ऐकत होते. आईने त्याला चहा दिला. खरंच वासुदेवाचे वागणे भिकाऱ्यासारखे अजिबात नाहीये.. तो भिकारी नसून देवाचा माणूस आहे. याची खात्री झाली. रोज दारावर भिकारी येतात. काही दिलं की पटकन घेऊन निघून जातात; पण वासुदेवाचे तसे नाही. हा खूपच वेगळा आहे. अशी मी मनोमन तुलना करीत होते. त्याच्या चेहऱ्याकडे पाहत होते. तो खूप समाधानी दिसला. ''पाटील आता नीट चालता येत नाही मला पुडल्या वरसी आल्यावर मातर काटी द्या...'' आजोबा ''ठीक आहे'' म्हणाले, ''पाटील राम राम, पाटलीन माय येतो.'' म्हणून तो निघून गेला.

शाळा सुटल्यावर मी दुपारी मामाच्या घरी जेवायला गेले. तेव्हा थोड्या वेळात वासुदेव हा मामाच्या घरी आला. शेजारच्या घरी टाळ वाजल्याच्या आवाजानेच मामीजींनी त्याला जे काही द्यायचे त्याची सगळी तयारी करून ठेवली होती. मामाकडे आल्यावर वासुदेवाचे एक गाणे संपले तोच मामीजींनी त्याला सगळं दान दिलं. ''पुरे झालं आता घेऊन जा.'' म्हणून त्याला मुद्दामहून आवरतं घ्यायला लावलं.. लहाने मामा जेवण करून त्याच्या बाजूने राम राम म्हणून निघून गेले; परंतु त्याची विचारपूस केली नाही किंवा त्याला प्रेमाने बोलले नाही.. त्याच्या येण्याने, त्यांना कुणाला फार आनंदही झाल्याचे दिसत नव्हते. त्याने आवरतं घेऊन.. कमीच वेळात आशीर्वाद देऊन निघून गेला. मला खूपच आश्चर्य वाटले.. मामाचं श्रीमंत घर म्हणून त्याने आजी नसल्यानेही फार काहीच बोलला नाही. मामीजींनी कामं आहेत म्हणून त्याला पटकन दान देऊन घालवून दिलं. यामुळे मला माझे आजी, आजोबा, आई, बाबा आठवले. वासुदेव आल्यावर जणू पाहुणा आल्यासारखं, त्याला किती मान देतात. मान

सन्मानाने त्याला हवं ते दिलं जातं. चहा, जेवण विचारलं जातं. एक तासभर तो मनसोक्त गाणे म्हणतो. त्याच्या पद्धतीप्रमाणे, जशी त्याची पूर्वापार परंपरा आहे तशी. त्याला भिकाऱ्यासारखं असं कुणी आमच्या घरून कधीच हाकलून देत नाहीत. मामाकडे मात्र अशा लोकांची काहीच किंमत नाही हेच खरं, असे वाटून माझा माझ्या आजी-आजोबांबद्दलचा आदर फार वाढला. आमचे घर फार माणुसकी जपणारे.. माणसाची किंमत करणारे आहे.. असे कित्येक लोक म्हणतात. अनेक महानुभाव संन्यासी, गुरू आमच्याकडे नेहमी येतात. त्यांचं यथोचित आदरातिथ्य आमच्याकडे होतं; पण या उलट मामाच्या घरी, दान पुष्कळ देतील; पण फार काही आपुलकीने बोलणार नाहीत, विचारपूस करणार नाहीत. कुणी दारावर आलं की, दान देऊन लगेच काढून देतात. मी यावर आईला एकदा विचारलेच, ''मामाच्या घरी असे का वागतात?'' तर आई म्हणाली, ''मामाच्या घरी दोन्ही मामा नसतात. मामीजी एकट्याच असतात. त्यांना खूप कामं असतात; म्हणून ते लवकर काढून देतात.'' हे वासुदेव मामाच्या घरूनही घेऊन जातात आणि फाट्यावर आजोबाकडून पैसे, कपडे, चादरी, घोंगडी असं हवं ते मागून घेतात. मला नवलच वाटले म्हणजे घरी मामीजीकडून आणि फाट्यावरून आजोबाकडून असे एकाच घरातून तो एवढं मोठं काही काही घेऊन जात असतो. खूपच हुशार आहे मग वासुदेव.. यावर ''गरीब असतात गं बिचारे, त्यांनी मागितल्यावर द्यावंच लागतं. या वेळी फाट्यावरच्या आजोबांकडून तो आजोबांची जुनी पितळी मुठीची काठी घेऊन गेला.'' असं आई बोलली पण काही असो.. फाट्यावरचे आजोबा पुष्कळ दान देत असतील; पण आमच्या घरच्या आजोबासारखे निश्चितच नाहीत. वासुदेवाशी मामाकडे कोणी बोललं नाही.. याचेच राहून राहून वाईट वाटत होते.

लहानपणी 'वासुदेव' हा आमच्या सगळ्यांचा आवडता होता. मी पुस्तकातही त्याचे चित्र पाहिले होते. आता तो मला विचित्र प्राणी नाही वाटत, तर तो देव माणूसच वाटतो; कारण गावात त्याच्या येण्याने, घराघरात आनंदी वातावरण व्हायचे. अनेक घरांत त्याला स्वखुशीने पुष्कळ गोष्टी मिळत असत. गावच्या मुख्य रस्त्याला, गावात प्रवेश करताच, आमची शाळा आहे. त्यामुळे आम्हा विद्यार्थ्यांना गावात कोण येते, जाते सर्व काही माहिती होते. शिवाय वर्गातल्या खिडकीतूनही रस्त्यांवरची वाहने दिसतात. गावातील कोणकोण उमरी, धर्माबादला जात आहे, हे कळते. गावच्या पाटीला माणसांची खूप वर्दळ असते. शाळेच्या समोरूनच रस्ता असल्याने लोक ये-जा करताना दिसतात. एकदा वासुदेव आणि त्याचा पुतण्या असे दोघेही गावातून पाटीला येताना दिसले. आम्ही शाळेसमोरच खेळत होतो. दोन्ही वासुदेवांना आम्ही निरखून पाहिलं. पूर्वीसारखाच वेश परंतु त्याच्या पुतण्याने कपाळावर गंध मात्र वेगळे लावले होते. ऑफिसमधून वासुदेवांना कुणीतरी आवाज दिला. तसे वासुदेव शाळेच्या पायरी समोर येऊन उभे राहिले. तशा आम्ही मैत्रिणी वासुदेवा जवळ जाऊन, त्यांना पाहत थांबलो. लगेच शाळेचे मुख्याध्यापक निटुरे सर बाहेर आले. त्यांनी आम्हाला पलीकडे खेळायला सांगितले. सर वासुदेवाशी बराच वेळ बोलत थांबले. मग हळूच खिशातून पाकीट काढून त्यांना काही पैसे दिले. हे आम्ही लांबवरून पाहत होतो. आता मात्र माझी चांगलीच खात्री पटली. वाटलं मला जसा वासुदेव आवडतो तसाच खूप लोकांना तो आवडतो कारण तो चांगलाच असतो.. म्हणूनच.. सरांनी स्वतःहून बोलावून घेतलं, पैसे दिले. आजी, आजोबा म्हणतात ना ते बरोबरच आहे.. गावाचा जणू तो उद्धारक आहे. त्याच्या आशीर्वादानेच शेती पिकते, गाव धनधान्याने वैभवसंपन्न होतो कारण गाण्यातून तो कितीतरी देवांना त्यासाठी प्रार्थना करत असतो; म्हणून लोक त्याला 'देवमाणूस' म्हणतात. 'देवदान पावलं' म्हणून तो आनंदाने निघून जातो. यातच सर्व काही आले. (ललित)

---

**डॉ. शैला जगदंबे**

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
# कार्यवृत्त

### म.सा.प. पुणे शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर, शाखेच्या वतीने आरोग्यविषयक व्याख्यान

सोलापूर : महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर आणि मनोरमा साहित्य मंडळी यांच्या वतीने मनोरमा नर्सरी, विजापूर रोड, सोलापूर येथे 'जागतिक एड्स निर्मूलन दिना'निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी मसाप पश्चिम शाखेच्या उपाध्यक्षा सौ. शोभा मोरे होत्या.

व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून मसाप शाखा पश्चिम सोलापूरचे अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत मोरे, सौ. शोभा मोरे, डॉ. सुमित मोरे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ऋचा पाटील, डॉ. आदित्य पाटील, डॉ. मिताली मोरे, प्रा. डॉ.राजशेखर शिंदे, प्रा. माधव कुलकर्णी, स्मिता पाटील, प्रा. माऊली जाधव आदी उपस्थित होते.

या वेळी डॉ. सुमित मोरे यांनी एड्स या आजाराविषयी माहिती दिली. त्यापासून वाचायचे असेल तर कोणकोणत्या सुविधांचा वापर करावा याविषयी मत व्यक्त केले. डॉ. आदित्य पाटील यांनी एड्स आजाराचे गंभीर परिणाम आपल्या विचारातून त्यांनी व्यक्त केले. सुरक्षित जीवनाची गुरुकिल्ली याविषयी आरोग्याचा मंत्र त्यांनी दिला. डॉ. ऋचा मोरे-पाटील आणि डॉ. मिताली मोरे यांनीही या आजाराचे गांभीर्य ओळखून वेळीच सावध राहण्याचा सल्ला दिला. आजची युवा पिढी ही या आजाराच्या विळख्यात सापडू नये तसेच त्याचे परिणाम काय होतात याविषयी माहिती त्यांनी दिली. या वेळी परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

जयश्री बिराजदार, डॉ. स्मिता पाटील, आरती नायडू, विमलताई माळी, बदिउज्जम्मा बिराजदार साबिर सोलापुरी, दीपमाला जाधव, प्राची गोसावी, कैवल पांढरे, कपिल प्रक्षाळे, अनुपमा पंडित, पुष्पा करे, रेखा कांबळे, साधना घाडगे, अंजली लवाळे, अश्विनी काळे, कवी सिकंदर मुजावर, विद्या भगरे-भोसले, सुरेखा नरके आदींसह शाखेचे सर्व कर्मचारी, अधिकारी उपस्थित होते. प्रारंभी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व्याख्यानास सुरुवात करण्यात आली. सौ. वंदना कुलकर्णी यांनी स्वागत केले, कविता कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. माणिकचंद मोरे यांनी आभार मानले. या वेळी महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. हा कार्यक्रम मसाप शाखा पश्चिम सोलापूर शाखेच्या वतीने घेण्यात आला.

**अध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद**
शाखा – पश्चिम सोलापूर, मनोरमा
प्लॉट नं. ४, ५, ६ कोटणीस नगर,
विजापूर रोड, सोलापूर

### महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा जुळे सोलापूर

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा जुळे सोलापूर, तसेच सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सह. घाऊक आणि किरकोळ ग्राहक भांडार, सुपरबझार, सिद्धांत

प्रतिष्ठान, सोलापूर यांचे संयुक्त विद्यमाने, सहकार महर्षी वि. गु. शिवदारे स्मृती समारोह निमित्त कॉलेज ऑफ फार्मसी सभागृह, जुळे सोलापूर येथील सभागृह निमंत्रित कवींचे कविसंमेलन आयोजित केलेले होते. मसाप जुळे सोलापूरचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, सिद्धेश्वर बँक चेअरमन नरेंद्र गंभिरे फार्मसी कॉलेज विश्वस्त प्रा. भीमाशंकर थेटे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित केलेला होता, प्रास्ताविक पद्माकर कुलकर्णी त्यांनी केले. तर नरेंद्र गंभिरे, प्रा. शेटे सर यांनी मनोगत व्यक्त केले, त्यानंतर ज्येष्ठ कवी माधव पवार यांचे अध्यक्षतेखाली निमंत्रित कवी/कवयित्री यांचा सत्कार झाल्यावर कविसंमेलन सुरू झाले. या कविसंमेलनात डॉ. विद्या देशपांडे, डॉ. क्षमा वळसंगकर, श्री. रामचंद्र धर्मसाले, प्रांजली मोहीकर, मारुती कटकधोंड, गिरीष दुनाखे, वंदना कुलकर्णी, डॉ. सौ. माधुरी भोसले, या सर्वच जणांनी एकापेक्षा एक सरस रचना सादर करून जवळजवळ २ तास सभागृह मंत्रमुग्ध करून सोडले, अध्यक्षीय समारोपात ज्येष्ठ कवी माधव पवार यांनी त्यांच्या कवितांनी अनोखे रंग भरले. अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनीही एक कविता सादर केली. या वेळी मसाप जुळे सोलापूर उपाध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, प्रशांत जोशी, इतर कार्यकारिणी सदस्य, तसेच ग्राहक भांडार चेअरमन सिद्धाराम जोडभावी, महादेव बिराजदार, प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील, प्राचार्य डी. एस. सुगावे, प्राचार्य श्रुती गायकवाड, पूजा बाजपेयी, प्राचार्य जी. के. कापसे, ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे, कैलास माणिकशेट्टी, आदींसह साहित्य रसिक, प्राध्यापक आणि फार्मसी कॉलेजचे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याचे प्रास्ताविक पद्माकर कुलकर्णी, सूत्रसंचालन आणि आभार प्राचार्य यांनी मानले. ज्येष्ठ कवी माधव पवार यांनी या कविसंमेलनाचे सूत्रसंचालन आपल्या विनोदी आणि ढंगदार शैलीत केले.

## महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा – इस्लामपूर

### १. रविवार दि. ०५ मे २०२४

प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांचे काव्यवाचन व मुक्त मनोगत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. दीपक स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सुभाष खोत यांनी तर आभार डॉ. अर्चना मोराज यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी मा. प्रा. शामराव पाटील (आण्णा), प्रा. दशरथ पाटील, कालिदास पाटील, प्रा. शैलजा पाटील, रोझा किणीकर, उदयसिंह पाटील, प्रकाश जाधव व धर्मवीर पाटील उपस्थित होते.

### २) रविवार दि. १९ मे २०२४

शाखेचा ३५ वा वर्धारित व सभासद स्नेहमेळावा - सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने या 'वरिष्ठकार' मा. मनोज बोरगांवकर, नारंडे यांची प्रकट मुलाखत श्री. धर्मवीर पाटील व प्रा. डॉ. अर्चना थोरात यांनी प्रा. डॉ. रणधीर शिंदे, मराठी विभाग प्रमुख शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. दीपक स्वामी सर यांनी केले सूत्रसंचालन डॉ. सुरज चौगुले यांनी केले. तर आभार श्री. उत्तम सावंत यांनी मानले.

सदर कार्यक्रमांतर्गत सदस्य तुकाराम बाबर यांच्या 'हसरी पाने' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ मा. मनोज बोरगांवकर, मा. प्रा. शामराव पाटील (आण्णा), प्रा. डॉ. रणधीर शिंदे, ॲड. बी. एस. पाटील, प्राचार्य आर.डी.सावंत यांच्या शुभहस्ते करण्यात आला. तसेच सदर कार्यक्रमात ज्येष्ठ सदस्य

प्राचार्य आर. डी. सावंत, शहानवाज मुल्ला, डॉ. दीपा देशपांडे, डी. आर. सलगर, एस. टी. पाटील यांचा सत्कार करण्यात आला. 'जीवनगौरव' पुरस्कार प्राप्त केलेबद्दल ॲड. बी. एस. पाटील (आण्णा) यांचा सन्मान करण्यात आला.

**३) सोमवार २७ मे २०२४**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा इस्लामपूर उत्कृष्ट शाखा पुरस्कार महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या ११९ व्या वर्धापन दिनानिमित्त राजन लाखे पुरस्कृत बाबुराव लाखे स्मृतिप्रीत्यर्थ, वैशिष्ट्यपूर्ण शाखा पुरस्कार इस्लामपूर शाखेला देण्यात आला. ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे व सुप्रसिद्ध लेखिका डॉ. मीना प्रभू यांच्या हस्ते कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, कार्याध्यक्ष : मिलिंद जोशी, कार्यवाह सुनिताराजे पवार यांच्या प्रमुख उपस्थित पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

**४) सोमवार २४ जून २०२४**

महाराष्ट्र साहित्य परिषद इस्लामपूर व बाबा भारती प्रतिष्ठान पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षक-विद्यार्थी साहित्य संमेलन' व 'पाली मराठी शब्दकोश' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ मा. डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. शामराव पाटील (आण्णा) यांच्या स्वागताध्यक्षतेखाली संपन्न झाले. या संमेलनात मा. ॲड. बी. एस. पाटील (आण्णा) यांना 'बाबा भारती जीवनगौरव' सन्मान देऊन सन्मानित करण्यात आले याप्रसंगी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेच्या प्रमुख कार्यवाह 'मा. सुनिताराजे पवार, मा. पुरुषोत्तम सदाफुले, प्रा. संभाजी मलगे, ॲड. धैर्यशील पाटील, मा. महेंद्र भारती, इ. मान्यवर उपस्थित होते.

दुसऱ्या सत्रामध्ये मा. चंद्रकांत वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली 'कविसंमेलन' संपन्न झाले. यामध्ये लता ऐवळे, गोसपाक मुलावी, इंद्रजीत धुळे, रमजान मुल्ला, प्रभाकर खंडागळे, सुरज पोगुळे, संतोष काळे, आनंदहरी, उत्तम सावंत, इ. कवींनी आपल्या कविता सादर केल्या. तसेच गजानन पातुस्कर यांचा मिमिक्री कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्ताविक डॉ. दीपक स्वामी यांनी केले तर आभार महेंद्र भारती आणि सूत्रसंचालन मानसी चिटणीस यांनी केले.

**५) रविवार १४ जुलै २०२४**

महाराष्ट्र साहित्य परिषद इस्लामपूरचे माजी अध्यक्ष डॉ. शरद भोसले यांच्या स्मृतिदिना निमित्ताने प्रा. डॉ. संजय थोरात यांचे व्याख्यान राजाराम बापू ज्ञानप्रबोधिनी सभागृहात आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मा. प्रा. शामराव पाटील (आण्णा) यांनी केले तर प्रा. श्रीकांत भोसले यांनी आभार व्यक्त केले.

**६) बुधवार २४ जुलै २०२४**

राजारामबापू ज्ञानप्रबोधिनी व महाराष्ट्र साहित्य परिषद इस्लामपूर यांच्या वतीने राजारामबापू पाटील बँकेचे अध्यक्ष व राजारामबापू ज्ञानप्रबोधिनी परिवाराचे मार्गदर्शक मा. प्रा. शामराव पाटील (आण्णा) यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त सुश्राव्य भावगीते व भक्तीगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी महाराष्ट्र साहित्य परिषद इस्लामपूरच्या वतीने शाल व श्रीफल देऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

**७) सोमवार, ५ ऑगस्ट २०२४**

९३ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ज्येष्ठ साहित्यिक 'आनंदहरी' यांना 'स्मृतिकथा' पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या वेळी

कवी एकनाथ पाटील यांनी काही निवडक कवितांचे सादरीकरण केले. श्री. व सौ. कालिदास पाटील यांनी डॉक्टरेट पदवी प्राप्त केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. त्या वेळी आनंदहरी, डॉ. कालिदास पाटील यांनी आपली मनोगते व्यक्त केली. सदर कार्यक्रमांचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. दिपक स्वामी यांनी केले तर आभार डॉ. अर्चना थोरात यांनी मानले सूत्रसंचालन प्रा. सुनिल पाटील यांनी केले.

**८) गुरुवार, ५ सप्टेंबर २०२४**

शाखेची कार्यकारिणीची सभा ज्ञानप्रबोधिनी सभागृहात आयोजित करणेत आली होती. त्या वेळी 'शिक्षक दिन' निमित्ताने कार्यकारिणीतील व इतर काही शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

**९) शनिवार, दि. ३१ ऑगस्ट २०२४**

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा-इस्लामपूर यांच्या वतीने सुप्रसिद्ध डॉ. शिवाजीराव घोरपडे यांचा स्मृतिदिन आयोजित करण्यात आला होता. यानिमित्ताने सुप्रसिद्ध किडनीतज्ज्ञ डॉ. सुनिल पाटील यांचे किडनी विकार समज व गैरसमज या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे स्वागत डॉ. संजीव घोरपडे यांनी केले, तर प्रास्ताविक डॉ. दिपक स्वामी यांनी केले, तर आभार डॉ. आदित्य घोरपडे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. प्रा. शामराव पाटील (आण्णा) यांनी भूषविले.

## महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे
## शाखा चाळीसगाव

त्रैमासिक अहवाल

(१ जुलै ते ३० सप्टेंबर २०२४)

**लोकमान्य टिळकांसह अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन (१ ऑगस्ट २०२४)**

थोर स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, चाळीसगाव शाखेतर्फे अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. धुळेरोड लगत असलेल्या शाखा कार्यालयाच्या साने गुरुजी सभागृहात मसाप शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेच्या प्रारंभी कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्राचार्य तानसेन जगताप यांच्या हस्ते अनुक्रमे लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. अभिवादन सभेस गणेश आढाव, रामचंद्र गोसावी, बी.एल. ठाकरे, अशोक वाबळे, अशोक ब्राह्मणकार, विजय कदम उपस्थित होते.

मसाप शाखा-चाळीसगावतर्फे गझल मुशायराचे आयोजन (१७ ऑगस्ट २०२४) गझलकारांनी खिळवून ठेवले तरच गझलेची ताकद सिद्ध होते: प्राचार्य शिवाजीराव साळुंखे गझलसम्राट सुरेश भटांनी मराठी गझलेस लोकप्रियता मिळवून दिली आणि अनेक गझलकार लिहिते झाले. गझल लेखन हा काव्यप्रकार वाटतो तितका सोपा नाही. गझल ही तंत्रशुद्ध असावी लागते. गण, मात्रा, रदिफ (यमक) व काफिया (उपान्त्य यमक) यांची नीटनेटकी जुळवणी करुन ती वृत्तबद्ध असली पाहिजे. मग त्या, त्या वृत्ताने गझल लयदार होते. आणि अशी गझल पुन्हा, पुन्हा ऐकाविशी वाटते. तद्वतच गझलकारांनी रसिकांना खिळवून ठेवले तरच त्या गझलेची ताकद सिद्ध होते. असे प्रतिपादन मसाप गझल रंग या मराठी गझल मुशायराचे अध्यक्ष प्राचार्य शिवाजी साळुंके यांनी गझलेबाबत आपले मत मांडताना केले. येथील वाणी मंगल कार्यालयात झालेल्या गझल रंग या महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे,

शाखा चाळीसगाव आयोजित कार्यक्रमात ते मराठी गझल मुशायरा अध्यक्ष या नात्याने बोलत होते. प्रारंभी माजी केंद्रीय ग्रामीण विकास राज्यमंत्री एम. के. पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून गझल मुशायराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मसाप शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप, विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुनील राजपूत, कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे, प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे, कोषाध्यक्ष रामचंद्र गोसावी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**मसाप शाखेतर्फे कार्यक्रमांची मेजवानी**

आपल्या अध्यक्षीय मनोगता सोबतच शिवाजी साळुंखे यांनी स्वलिखित 'घुसमट ऐसी नित्य चालते मनात माझ्या' ही गझल सादर केली.

प्रास्ताविक मसाप चाळीसगावचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप यांनी केले. तदनंतर निमंत्रित रावसाहेब कुँवर (साक्री), जयश्री वाघ (नाशिक), शिवाजीराव जवरे (बुलढाणा), विरेंद्र बेडसे (साक्री), डॉ. ज्ञानेश पाटील (जळगाव), गो. शि. म्हसकर (नगरदेवळा) या सहाही गझलकारांनी प्रत्येकी दोन, दोन गझला सादर करून तब्बल अडीच तास रसिक श्रोत्यांना पुरते खिळवून ठेवले.

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

**(२९ सप्टेंबर २०२४)** त्याग व समर्पणातूनच संस्था आणि शाखेची भरभराट होते.

-प्राचार्य तानसेन जगताप यांचे प्रतिपादन...

ज्ञानातून पैसा आणि पैशातून ज्ञान या भूमिकेतून आमची म. सा. प. शाखा दरवर्षी संत गाडगेबाबा व्याख्यानमालेचे आयोजन करत असते. या सत्कार्यासाठी आमच्या शाखेचे विश्वस्तमंडळ जिव्हाळापूर्वक बांधिलकीने व्याख्यानमालेसाठी भरीव आर्थिक योगदान देते आणि व्याख्यानमाला निश्चिंतपणे संपन्न होत असते. तद्वतच संस्थेच्या व शाखेच्या सहकाऱ्यांच्या त्याग व समर्पणातूनच भरभराट होते. असे महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा-चाळीसगावचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप यांनी प्रतिपादन केले. ते रविवार दि.२९-९-२०२ रोजी राष्ट्रीय सह. कर्मचारी पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित म.सा.प. चाळीसगाव शाखेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना बोलत होते.

ह्या प्रसंगी व्यासपीठावर मसापचे कार्यकारी विश्वस्त तथा ज्येष्ठ पत्रकार किसनराव जोर्वेकर, मसाप शाखेचे कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे, प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे व कोषाध्यक्ष रामचंद्र गोसावी हे उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी कार्याध्यक्ष कवी-मनोहर आंधळे यांनी स्वलिखित मसाप गौरव गीत स्वतः स्वतंत्र चालीत सादर करताच सभासदांनी व मान्यवरांनी आपल्या जागी उत्साहपूर्ण उभे राहून दाद दिली.

कार्याध्यक्ष आंधळेंनी आपल्या मनोगतात, शाखेने घेतलेल्या साहित्यिक उपक्रमांची विविधता व मान्यवर अतिथी साहित्यिकांच्या भेटीचा मणिकांचन योग विशद करून उपस्थीतांनी गीत गायनास दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे यांनी शाखेच्या मागील सभेचे इतिवृत्त व वार्षिक कार्यवृत्त सादर करून सभासदांची मंजुरी घेतली, तर कोषाध्यक्ष रामचंद्र गोसावी यांनी सन २०२३-२४ चे आर्थिक तेरीजपत्रक वाचून सभेपुढे मंजुरीसाठी ठेवले. आजीव सभासद बाळासाहेब वाबळे यांनी मराठी भाषा परीरक्षेच्या फीचा हिशेब तेरीजपत्रकात नसल्याचा आक्षेप नोंदवला. त्यावर अध्यक्षांनी सदर फी पुणे मसाप संस्थेकडे पाठवली जाते. असे सांगून शंका निरसन केले.

मसाप विश्वस्त मंडळाचे कार्यकारी विश्वस्त किसनराव जोर्वेकर यांनी शाखेच्या कार्यप्रणालीचे कौतुक करत ‘शाखेसाठी कवी मनोहर आंधळे यांनी लिहिलेले गीत शाखागीत नसून ते शाखा-गौरव गीत आहे असे भावोद्गार काढून, मसाप चाळीसगाव शाखेने ग्रामीण विचारांचा वारसा जपत नानाविध साहित्य उपक्रम राबवून चाळीसगाव तालुक्याचा सांस्कृतिक वारसा समृद्ध केला आहे’, असे मनोगत व्यक्त केले.

सभासदांपैकी रमेश पोतदार, प्रकाश बाविस्कर व डी. एस. मराठे यांनी सभायोचित मनोगते व्यक्त केली.

सभेचे सूत्रसंचालन कार्यकारिणी सदस्या वंदना रोकडे यांनी; तर शाखेचे उपाध्यक्ष गणेश आढाव यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

सदर सभा यशस्वी होण्यासाठी मसाप शाखा कार्यवाह शालिग्राम निकम, कार्यकारणी सदस्य सुधीर देवरे, बी. एल. ठाकरे, प्रा. अशोक वाबळे, अशोक ब्राह्मणकर, विजय कदम, भाऊसाहेब वाघ यांनी परिश्रम घेतले.

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा डोंबिवली

### शनिवार दि. १३ जुलै २०२४

विनायक सभागृह, गणेश मंदिर, डोंबिवली (पू.) संध्याकाळी ६.०० वाजता श्री. सुधांशू नाईक यांचे व्याख्यान विषय- राजनीतिज्ञ श्रीकृष्ण, आर्य चाणक्य आणि छत्रपती शिवराय या राजनीतीतील तीन धुरंधर महापुरुषांच्या राजनीतीचा तौलनिक अभ्यास या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, पाहुण्यांचा परिचय, आभार प्रदर्शन ही शीतल दिवेकर यांनी केले.

### रविवार दिनांक १८ ऑगस्ट २०२४

सकाळी १०.३० वाजता विनायक सभागृह, गणेश मंदिर, डोंबिवली (पू.) चैताली ढवळीकर कऱ्हाडे यांचा वृक्षगान कार्यक्रम वृक्षांची छायाचित्रे, त्यावरील लेख, कविता गाणी यांची माहिती या कार्यक्रमात सूत्र संचालन, पाहुण्यांचा परिचय, आभार प्रदर्शन ही जबाबदारी डॉ. वृंदा कौजळगीकर यांनी घेतली.

### रविवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२४

सकाळी १०.३० वाजता विनायक सभागृह गणेश मंदिर कला दिग्दर्शक संजय धबडे यांचा ‘माझी कलानगरीची मुशाफिरी’ हा कार्यक्रम. त्यांचा कलाविष्कार असलेली छायाचित्रे दाखवून कार्यक्रम संपन्न झाला. हा मुलाखतीचा कार्यक्रम श्री. विजय जोशी यांनी नाटक सादर केला.

## महाराष्ट्र साहित्य परिषद, ठाणे जिल्हा शाखा

केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचा वृत्तान्त

### दिनांक १५ जून २०२४

‘भाकीत’ कादंबरी प्रकाशन, महाराष्ट्र साहित्य परिषद, ठाणे जिल्हा शाखा आणि सृजनसंवाद प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने शारदा मंदिर, मराठी ग्रंथ संग्रहालय, नौपाडा, ठाणे येथे आदित्य अंकुश संतोषी यांच्या ‘भाकीत’ या कादंबरीचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला होता. या समारंभात खगोल अभ्यासक आणि पंचांगकर्ते दा. कृ. सोमण हे अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ कवी महेश केळुसकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाराष्ट्र साहित्य परिषद, ठाणे जिल्हा शाखेचे कार्याध्यक्ष पद्माकर शिरवाडकर आणि कार्यवाह चांगदेव काळे, गीतेश शिंदे हे व्यासपीठावर उपस्थित होते. ज्योतिषविद्या आणि अंधश्रद्धा निर्मूलन या विषयासंदर्भात असलेली भाकीत ही कादंबरी प्रभावी आहे आणि वाचकाला विचार करायला भाग पाडणारी आहे. सहज सोपी संवाद शैली आणि

विषयाची उत्तम मांडणी, ही या कादंबरीची वैशिष्ट्ये आहेत, असे सोमण यांनी म्हटले. कादंबरी हा साहित्यप्रकार बहुआयामी असतो. लेखकाने भाकीत या कादंबरीमध्ये नरेंद्र दाभोळकर यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी मांडणी केलेली आहे. त्याचबरोबर कोविड संदर्भातील घटनाक्रम मांडलेला आहे. त्यांच्या लेखन प्रवासासाठी शुभेच्छा देत त्यांचे लेखक म्हणून भाकीत उज्ज्वल आहे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी महेश केळुसकर यांनी केले. प्रकाशकाचे मनोगत मांडताना गीतेश शिंदे यांनी सृजनसंवाद या त्यांच्या प्रकाशन संस्थेच्या वाटचालीचे आणि भविष्यातील त्यांच्या उपक्रमांचे संदर्भ देत भाकीत या कादंबरीचे काही पैलू मांडले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने पद्माकर शिरवाडकर, कार्याध्यक्ष, यांनी लेखक आदित्य अंकुश संतोषी यांना सन्मानित केले.

**दि. ३० जून २०२४**

'ऐल तटावर पैल तटावर' महाराष्ट्र साहित्य परिषद ठाणे जिल्हा शाखेचा वर्धापन दिन दिनांक ३० जून २०२४ रोजी साजरा करण्यात आला. हा संस्थेचा ४५ वा वर्धापन दिन होता. यासाठी 'ऐल तटावर पैल तटावर' हा कार्यक्रम मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे येथे सायंकाळी सहा वाजता आयोजित करण्यात आला होता. सुप्रसिद्ध कवयित्री सुनंदा भोसेकर आणि राणी दुर्वे यांनी हा कार्यक्रम सादर केला. साहित्यात असणारे प्रवाह वेगवेगळ्या अंगानी कसे सादर होतात, त्यात अर्वाचीन साहित्य व प्राचीन साहित्य यात कसा बदल होत गेला, अगोदरची साहित्यिक पिढी आणि आताची साहित्यिक पिढी यांच्यात अंतर आहेच तरीदेखील निर्माण होत असलेल्या साहित्यात शाश्वत किती आहे, समाजाचा वेध आणि मानवी जीवनाचा वेध कशा प्रकारे घेतला जात आहे, याची अनेक उदाहरणे देत त्यांनी हा कार्यक्रम सादर केला. यात कथा, कादंबरी, कविता, प्रवास वर्णन अशा साहित्य प्रकारांचा समावेश होता. हा वेगळाच विषय असूनही त्यांनी अतिशय अभ्यासपूर्ण असा आलेख उलगडला. संस्थेचे कार्याध्यक्ष पद्माकर शिरवाडकर यांनी संस्थेच्या आतापर्यंतच्या कार्याचा आढावा थोडक्यात उपस्थित समोर मांडला. त्यांच्याच हस्ते सुनंदा भोसेकर आणि राणी दुर्वे यांचे स्वागत करून सत्कार करण्यात आला. शिरीष सराफ यांनी कार्यक्रमाच्या शेवटी आभार व्यक्त केले.

## महाराष्ट्र साहित्य परिषद
## पिंपरी चिंचवड शाखा

**१) पिंपरी चिंचवड शाखेतर्फे दिनांक २० एप्रिल २०२४** रोजी, मुलांसाठी बालचमूंची गाणी व गप्पा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शान्ता शेळके सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांची मुलाखत रश्मी गुजराथी आणि सीमा गांधी यांनी घेतली. मुलांनी तसेच इतरांनी विचारलेल्या प्रश्नांनी कार्यक्रमाची रंगत वाढत गेली.

**२) दिनांक २७ एप्रिल** रोजी, पिंपरी चिंचवड शाखा आयोजित, वार्षिक साहित्य पुरस्कार सोहळ्यात २०२३ वर्षातील कथा, कविता, कादंबरी, ललित आणि बालसाहित्य या पाच विभागात, ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, ज्येष्ठ साहित्यिक व शिक्षणतज्ज्ञ डॉ. न. म. जोशी यांच्या हस्ते उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**३) दिनांक २५ मे २०२४** रोजी पिंपरी चिंचवड शाखा आयोजित, युगंधरा काव्य संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक दत्तात्रय अत्रे यांनी

भूषवले. सदर कविसंमेलनात ४६ कवींनी सहभाग घेतला.

**४) दिनांक १ जून २०२४** रोजी सायंकाळी ५ वाजता, महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखा आणि पिरॅमिड अटलांटे सोसायटी ताथवडे, यांच्या संयुक्त विद्यमाने 'कवितेच्या गावा जावे' या विषयावर ज्येष्ठ कवी राजन लाखे यांचे व्याख्यान तसेच शहरातील कवींचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले. सदर दोन्ही कार्यक्रमास उदंड प्रतिसाद मिळाला. सदर कार्यक्रमास विलास वानखेडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

**५) दिनांक ९ जून २०२४** रोजी, नाशिक येथील मानसोपचार व योगातज्ज्ञ डॉ. पल्लवी देशपांडे यांचे 'साहित्यिकांची शारीरिक व विचारांची सक्षमता' (व्यायाम - काळजी - पद्धत - प्रात्यक्षिके), या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

त्या वेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे डी. वाय. पाटील विद्यापीठाचे माजी डीन डॉ. दिगंबर इंगोले, अध्यक्ष राजन लाखे, कार्याध्यक्ष विनीता ऐनापुरे आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमास भरघोस प्रतिसाद मिळाला व हा कार्यक्रम पुन्हा आयोजित करावा अशी मागणी साहित्यिकांनी केली.

**६) रविवार, दिनांक ३० जून २०२४** रोजी, पहाटे ५.३० वाजता, मसाप पिंपरी चिंचवड शाखा आयोजित तुकाराम महाराज, पंढरपूर वारी तसेच पालखी दर्शन सोहळ्यात सर्व साहित्यिकांनी आपला सहभाग नोंदवला.

**७) रविवार, दिनांक १४ जुलै २०२४,** रोजी पिंपरी चिंचवड शाखेतर्फे, वर्षा सहल व सरीवर सरी कविसंमेलांचे आयोजन करण्यात आले होते.

कासारसाई धरण, तालुका मुळशी येथील या वर्षा सहलीत एकूण ३६ साहित्यिकांनी सहभाग घेतला होता.

**८) दिनांक ११ ऑगस्ट २०२४** रोजी, सायंकाळी ४. ३० वाजता, आयोजित केलेल्या 'साहित्य भाष्य व संवाद' या कार्यक्रमात ज्येष्ठ लेखिका विनीता ऐनापुरे आणि डॉ. रजनी शेठ यांच्या साहित्यावर डॉ. स्मिता टिल्लू व अश्विनी रानडे यांनी भाष्य केले.


या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शैलेश गुजर उपस्थित होते. तसेच तद नंतर आचार्य प्र. के. अत्रे यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवानिमित्त विडंबन कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचे अध्यक्षपद बंडा जोशी यांनी भूषवले.

**९) दिनांक ३१ ऑगस्ट २०२४** रोजी, गझलकार हिमांशु कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली 'गझल - दरबार' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून म. भा. चव्हाण तसेच उद्योगपती अजय लोखंडे उपस्थित होते. सदर कार्यक्रमात पिंपरी चिंचवड पुणे, चाकण, तळेगाव, मावळ येथील कवींनी वैविध्यपूर्ण गझला सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

सदर कार्यक्रमात हिमांशु कुलकर्णी यांच्या गझल संग्रहाचे प्रकाशन झाले.

■■







# पुस्तक सूची

- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ : रु. ५००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग १) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग २) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ४ : रु. ४००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग १) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग २) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग १) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग २) : रु. ३००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग १) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग २) : रु. ८००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ३) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ४) : रु. ७००/-
- भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य : रु. ८००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड १ : रु. ५००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड २ : रु. ३००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड ३ : रु. २००/-
- म. सा. पत्रिका लेख - सूची : रु. ४००/-

## सर्व खंड २५ टक्के सवलतीत !

## महाराष्ट्र साहित्य परिषद

**डिमांड ड्राफ्टने आगाऊ पैसे पाठविल्यास संपूर्ण संच** आमच्या खर्चाने रेल्वे अगर एस.टी. पार्सलने पाठवू. (वरील संचातील सुटे भाग हवे असल्यास ग्रंथविक्रेत्यांना २५ टक्के सूट. व्यक्तिगत ग्राहकांना व संस्थांना १५ टक्के सूट. टपालखर्च वेगळा.)

मागणीसाठी संपर्क : महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०
दूरभाष : ०२०- २४४७ ५९ ६३